कृषीवल
रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
१९३७-२०२६ ९० वर्ष
रायगड रविवार । दि. २३ ऑगस्ट २०२६ । अंक ७८ । पृष्ठे १० । किंमत ५ ₹
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in

पेण न्यायालयाबाहेर दोघा भावांना मारहाण

पेण : पेण न्यायालयात सुरू असलेल्या दाव्याचा राग मनात धरून दोघा भावांना न्यायालयाबाहेर पकडून शिवीगाळ व मारहाण केल्याची घटना २१ ऑगस्ट रोजी दुपारी १ वाजता घडली.फिर्यादी आणि त्यांचा भाऊ कामानिमित्त पेण न्यायालयात गेले होते. काम पूर्ण करून न्यायालयाबाहेर येत असताना आरोपी क्रमांक एकने आरोपी क्रमांक दोनला फोन करून बोलावून घेतले. त्यानंतर दोघांनी आणखी दोन अनोळखी व्यक्तींच्या मदतीने फिर्यादी आणि त्यांच्या भावाला पकडून ठेवले. आरोपींनी दोघांना शिवीगाळ करून हाताबुक्क्यांनी मारहाण केली. याप्रकरणी पेण पोलीस ठाण्यात गुन्हा करण्यात आला आहे.

पत्रकार आमीर तारलेकर यांचे अपघाती निधन

पोलादपूर : अपूर्ण म्हाप्रळ भोर ते पंढरपूर मार्गावरील एका पुलाच्या बांधकामासाठी पर्यायी रस्त्यावर एका स्वीफ्ट कारची स्कुटरला समोरासमोर धडक बसून झालेल्या भीषण अपघातात पोलादपूर तालुक्यातील सवाद येथील पत्रकार आमीर तारलेकर यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या अपघातात स्कूटरवरील आमीर तारलेकर यांचे भाऊ गंभीररित्या जखमी झाले आहेत. महाड व पोलादपूर तालुक्याच्या सीमेवरील म्हाप्रळ भोर ते पंढरपूर मार्गावर गेल्या काही वर्षांपासून रस्त्यासह पुलांचे बांधकाम अपूर्णावस्थेत आहे. त्यामुळे या रस्त्यावर •➤पान २ वर

जिल्हा क्रीडा संकुलात निधीचा ‘खेळ’

२२ कोटींचा प्रस्ताव लालफितीत

खेळाडू मूलभूत सुविधांपासून वंचित

। प्रमोद जाधव ।
। रायगड ।

दुर्लक्षामुळे अलिबाग येथील जिल्हा क्रीडा संकुलाची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत असताना, विविध दुरुस्तीच्या कामांसाठी पाठविण्यात आलेला तब्बल २२ कोटी रुपयांचा प्रस्ताव शासनाच्या मंजुरीच्या प्रतीक्षेत आहे. जिल्हा क्रीडा कार्यालयाकडून हा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला असला तरी अद्याप त्याला मंजुरी मिळालेली नाही. त्यामुळे संकुलाच्या दुरुस्तीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

क्रीडा संकुलातील विविध सुविधांची दुरुस्ती आणि देखभाल रखडल्याने खेळाडूंना मूलभूत क्रीडा सुविधांपासून वंचित राहावे लागत आहे. विविध स्पर्धांसाठी जिल्हा क्रीडा संकुलात येणाऱ्या खेळाडूंनाही उपलब्ध सुविधांच्या अभावामुळे गैरसोयींचा सामना करावा लागत असल्याची चर्चा आहे.

रायगड जिल्ह्यातील भौगोलिक रचना खेळाडूंसह उच्च शिक्षण घेणाऱ्यांसाठी पोषक असल्याचे कायमच बोलले जाते. कबड्डीसह वेगवेगळे खेळ रायगड जिल्ह्यामध्ये गाव पातळीवर खेळले जातात. शाळा, महाविद्यालयांमध्ये वेगवेगळ्या •➤पान २ वर

(छायाचित्र : समीर मालोदे)

रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन, तळा, म्हसळा, माणगाव, महाड, पेण, पनवेल, रोहा, सुधागड या नऊ तालुक्यातील क्रीडा संकुलांची दुर्दशा झाली आहे. त्यामुळे या क्रीडा संकुलासाठी प्रत्येकी तीन कोटी अशा एकूण २७ कोटी रुपयांच्या निधीचा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आल्याची माहिती जिल्हा क्रीडा कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

तीन क्रीडा संकुलांसाठी जागेचा प्रश्न ऐरणीवरच

प्रत्येक तालुक्यामध्ये क्रीडा संकुल असावे, ग्रामीण भागातील खेळाडू हक्काचे मैदान मिळावे, म्हणून प्रत्येक तालुक्यात क्रीडा संकुल बांधण्याची संकल्पना शासनाने प्रत्यक्षात उतरविण्याचा प्रयत्न केला. मात्र, अलिबाग, मुरूड व पोलादपूर तालुक्यात क्रीडा संकुलसाठी जागाच मिळत नसल्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे तालुक्यातील खेळाडू सुविधांपासून व खेळापासून दूर असल्याची माहिती समोर येत आहे.

जागा असूनही संकुलाचा अभाव

रायगड जिल्ह्यातील उरण, खालापूर, कर्जत या तीन तालुक्यांमध्ये तालुका क्रीडा संकुलसाठी जागा उपलब्ध झाली आहे. या ठिकाणी अद्ययावत क्रीडा संकुल उभारण्यासाठी निधीच्या मान्यतेसाठी जिल्हा क्रीडा कार्यालयाकडू प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. उरणमधील क्रीडा संकुलसाठी पाच कोटी, कर्जत आणि खालापूरसाठी प्रत्येकी तीन कोटी अशी एकूण ११ कोटी रुपयांच्या निधीची गरज आहे. शासनाकडून वेळेवर निधीची मान्यता मिळत नसल्याने जागा असूनही संकुलाचा अभाव अशी परिस्थिती या तालुक्यात झाली आहे.

> अलिबागमधील जिल्हा क्रीडा संकुलाच्या दुरुस्तीसाठी शासनाकडे २२ कोटी रुपयांच्या निधीचा प्रस्ताव मान्यतेसाठी पाठविण्यत आला आहे. उरण, कर्जत, खालापूर या तालुक्यांमध्ये क्रीडा संकुलाची इमारत उभारण्यासाठी जागा आहे. शासनाकडे निधीचा प्रस्ताव मान्यतेसाठी पाठविला आहे. तसेच नऊ तालुक्यांतील क्रीडा संकुलाच्या दुरुस्तीसाठी निधीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे. शासनाकडून निधीचा प्रस्ताव महिन्याभरात प्राप्त झाल्यास दोन महिन्यांत कामांची निविदा काढून तातडीने दुरुस्तीची व नव्या संकुलाची कामे केली जातील. जिल्हा क्रीडा संकुलाच्या दुरुस्तीसाठी साधारणपणे १५ कोटी रुपयांचा प्रस्ताव मंजूर होण्याची अपेक्षा आहे.
>
> – प्रकाश वाघ, जिल्हा क्रीडा अधिकारी, रायगड

लाडकी बहीण योजना

अपात्रांना ९,६०५ कोटींचा लाभ!

माहिती अधिकारामधून धक्कादायक माहिती

। मुंबई । प्रतिनिधी ।

विधानसभा निवडणुकीपूर्वी मोठ्या गाजावाजात सुरू करण्यात आलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या अंमलबजावणीवर आता गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. माहितीच्या अधिकारातून समोर आलेल्या आकडेवारीनुसार, जून २०२६ पर्यंत तब्बल ९२ लाख अपात्र लाभार्थ्यांना ९ हजार ६०५ कोटी रुपये वितरित करण्यात आले. विशेष म्हणजे, ही रक्कम ३१ मार्च २०२५ रोजी पीएम केअर्स निधीत असलेल्या ८ हजार ४५२ कोटी रुपयांच्या शिल्लक रकमेपेक्षाही अधिक आहे. त्यामुळे सरकारी यंत्रणेच्या पडताळणी प्रक्रियेवर तसेच हजारो कोटींच्या सार्वजनिक निधीच्या वापरावर मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

एका वृत्तपत्राने माहितीच्या अधिकारातून मिळवलेल्या माहितीनुसार, लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी यादीत गेल्या दोन वर्षांत अनेक वेळा सुधारणा करण्यात आली. त्यानंतर मोठ्या संख्येने अपात्र लाभार्थी यादीतून वगळण्यात आले. मात्र, त्यापूर्वी अशा लाभार्थ्यांच्या खात्यात मोठ्या प्रमाणात निधी वितरित झाल्याचे आकडेवारीतून स्पष्ट होत आहे.

त्यामुळे एका बाजूला राज्याच्या तिजोरीवर योजनेचा वाढता आर्थिक भार असल्याची चर्चा होत असताना, दुसऱ्या बाजूला •➤पान २ वर

वेधक

मुलीवर अत्याचार; आरोपीवर गुन्हा

रेवदंडा : रेवदंडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका अल्पवयीन मुलीचा गैरफायदा घेत तिच्याशी संबंध ठेवल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. आरोपीने पीडित मुलीशी प्रेमसंबंध निर्माण करून ऑगस्ट २०२५पासून तिच्याशी संबंध ठेवल्याचा आरोप आहे. त्यातून पीडित मुलगी सात महिन्यांची गर्भवती राहिल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. पीडित मुलगी अल्पवयीन असल्याची माहिती असतानाही आरोपीने तिचा गैरफायदा घेतल्याचा आरोप आहे. याप्रकरणी रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक नामदेव आंगज करीत आहेत.

अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार

नेरळ : नेरळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत २० ऑगस्ट रोजी पहाटे साडेचारच्या सुमारास अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याची गंभीर घटना घडली. पीडित मुलीची आई दळण आणण्यासाठी गिरणीत, तर वडील झाडांवर फवारणी करण्यासाठी गेले असताना आरोपीने मुलगी अल्पवयीन असल्याची माहिती असतानाही तिला जवळ बोलावून तिच्यावर अश्लील कृत्य केल्याचा आरोप आहे. याप्रकरणी नेरळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेनंतर पोलिसांनी कारवाई करत आरोपीला २१ ऑगस्ट रोजी पहाटे ३.५२ वाजता अटक केली. या गुन्ह्याचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. वरोटे करीत आहेत.

तरुणाला लोखंडी सळईने मारहाण

कर्जत : तालुक्यातील चारफाटा येथील हॉटेल कोल्हापुरी वाडा परिसरात जुन्या भांडणाचा राग मनात धरून एका व्यक्तीला दोघांनी हाताबुक्क्यांनी तसेच लोखंडी कडी आणि सळईने मारहाण केल्याची घटना २१ ऑगस्ट रोजी दुपारी एकच्या सुमारास घडली. फिर्यादी हॉटेलमध्ये कामावर असताना दोन्ही आरोपी तेथे आले. जुन्या वादाचा राग मनात धरून त्यांनी शिवीगाळ आणि दमदाटी केली. त्यानंतर हातातील लोखंडी सळईने मारहाण केल्याने फिर्यादीच्या डोक्याच्या मागील बाजूस तसेच डाव्या बाजूस दुखापत झाली. याप्रकरणी कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

... तर सरकारला पाय ठेवू देणार नाही!

- ‘तिसऱ्या मुंबई’साठी जमीन संपादनाविरोधात शेतकऱ्यांचा आक्रमक पवित्रा
- २५ हजार हरकतींकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप
- शासन निर्णय रद्द करण्याची मागणी

। अलिबाग । प्रतिनिधी ।

‘तिसऱ्या मुंबई’च्या नावाखाली उरण, पनवेल आणि पेण तालुक्यातील शेतजमिनीवर सरकारने डोळा ठेवला असून, २५ हजार हरकती दाखल करूनही त्यावर सुनावणी न घेता जमीन संपादनाचा निर्णय लादला जात असल्याचा संताप शेतकऱ्यांनी व्यक्त केला आहे. सरकारने हा निर्णय मागे घेतला नाही, तर उरण, पनवेल आणि पेण तालुक्यात सरकारला पाय ठेवू देणार नाही, असा थेट इशारा एमएमआरडीए केएससी नवनगर (तिसरी मुंबई) विरोधी समितीचे कार्याध्यक्ष संतोष ठाकूर यांनी दिला आहे.

रायगड जिल्ह्यातील उरण, पनवेल आणि पेण तालुक्यांमध्ये ‘तिसरी मुंबई’च्या रूपाने नवीन शहर वसवण्याची अधिसूचना सरकारने मार्च २०२४ मध्ये जारी केली. या अधिसूचनेला स्थानिक शेतकऱ्यांनी तीव्र विरोध दर्शवत सुमारे २५ हजार हरकती दाखल केल्या. मुख्यमंत्री आणि नगरविकास मंत्र्यांकडे निवेदने देऊनही प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप समितीने केला आहे.

आश्वासन नको, जमीन वाचवा!

शेतकऱ्यांच्या हजारो हरकतींवर सुनावणी न घेता घेतलेले निर्णय मागे घ्यावेत, अन्यथा आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशारा समितीने दिला आहे. जमीन ही शेतकऱ्यांच्या अस्तित्वाचा प्रश्न असून, विकासाच्या नावाखाली ती हिरावून घेण्याचा प्रयत्न खपवून घेतला जाणार नाही, असा स्पष्ट इशारा संतोष ठाकूर यांनी दिला.

सरकारच्या या भूमिकेविरोधात १५ ऑगस्टरोजी स्वातंत्र्यदिनी तिन्ही तालुक्यांतील शेकडो शेतकऱ्यांनी कोकण आयुक्तालयावर निदर्शने केली. शेतकऱ्यांचा वाढता विरोध लक्षात घेऊन अखेर सरकारला त्यांच्याशी संवाद साधण्यासाठी बैठक आयोजित करावी लागली.

२० ऑगस्ट रोजी मंत्रालयात अतिरिक्त मुख्य सचिव असीम कुमार गुप्ता आणि एमएमआरडीएचे अतिरिक्त आयुक्त पी. वेलारासू यांच्या उपस्थितीत संघटनेच्या प्रतिनिधींसोबत बैठक झाली. यावेळी शेतकऱ्यांनी ‘तिसऱ्या मुंबई’ला आपला ठाम विरोध असल्याचे स्पष्ट केले.

२५ हजार हरकती दाखल झाल्यानंतरही सुनावणी न घेता १६ मार्च २०२६ रोजी •➤पान २ वर

रायगड जि.प.त सोलर घोटाळा?

। रेवदंडा । विशेष प्रतिनिधी ।

रायगड जिल्हा परिषदेच्या सोलर संच खरेदी प्रकरणाने आता गंभीर वळण घेतले आहे. अधिकृत कागदपत्रांमध्ये नमूद असलेल्या कंपनीचा दिलेल्या पत्त्यावर मागमूसही नसल्याचा दावा समोर आल्याने तब्बल १ कोटी ४ लाख १६ हजार रुपयांच्या पुरवठा आदेशावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ७० अंगणवाड्यांसाठी सोलर संच आणि अंतर्गत विद्युत वायरिंगच्या नावाखाली हा आदेश देण्यात आला असताना संबंधित कंपनीची प्रत्यक्ष पडताळणी झाली होती का, काम प्रत्यक्षात झाले आहे का आणि सरकारी निधीचा विनियोग नेमका कुठे झाला, असे अनेक सवाल आता उपस्थित झाले आहेत.

सामाजिक कार्यकर्ते संजय सावंत यांनी माहिती अधिकारातून मिळालेल्या कागदपत्रांच्या आधारे हा प्रकार समोर आणल्याचा दावा केला आहे. त्यांनी संबंधित कंपनीच्या पत्त्यावर प्रत्यक्ष पाहणी करून कंपनीचे कार्यालय किंवा व्यावसायिक आस्थापना आढळून आली नसल्याचे सांगत राज्याच्या मुख्य सचिवांकडे तक्रार दाखल केली आहे.

■ अस्तित्वात नसलेल्या कंपनीला १ कोटी ४ लाखांचा पुरवठा आदेश?

संजय सावंत यांनी २०२३ ते २०२६ या कालावधीतील खरेदीविषयक माहिती माहिती अधिकार कायद्यांतर्गत मागवली होती. त्यामध्ये ८ जानेवारी २०२६ रोजीचा पुरवठा •➤पान २ वर

दिलेल्या पत्त्यावर कंपनीच नाही?

पुरवठा आदेशात ‘ग्रीन एनर्जी सिस्टीम’चा पत्ता शॉप नं. ०१, ग्राउंड फ्लोअर, शिवराम भास्कर सोसायटी, शेषनाथ वाडेकर रोड, बाजारपेठ, अलिबाग असा नमूद करण्यात आला आहे. मात्र, सावंत यांनी या पत्त्यावर प्रत्यक्ष पाहणी केली असता कंपनीचे कार्यालय किंवा संबंधित व्यावसायिक आस्थापना आढळली नसल्याचा दावा केला आहे. यामुळे सरकारी यंत्रणेने कंपनीची पात्रता, नोंदणी, कार्यालयाचा पत्ता आणि प्रत्यक्ष अस्तित्व यांची पडताळणी केली होती का, असा सवाल उपस्थित झाला आहे. कंपनीच अस्तित्वात नसेल तर एवढ्या मोठ्या रकमेचा पुरवठा आदेश नेमका कोणत्या आधारावर देण्यात आला? हा या प्रकरणातील सर्वात महत्त्वाचा प्रश्न ठरला आहे.

हजारो लीटर पाण्याचा अपव्यय

स्थानिक प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

अलिबाग–रोहा मार्गावरील नवघर पुलाजवळ पाईपलाईन लिकेज झाली आहे. त्यामुळे पाण्याचा अपव्यय मोठ्या प्रमाणात होत आहे. हजारो लीटर पाणी वाया गेले आहे. स्थानिक प्रशासनाकडून या प्रश्नाकडून तात्काळ दखल घेतली नसल्याने मोठ्या प्रमाणात पाणी वाहून गेल्याची माहिती समोर आली आहे.

जिल्ह्यात पाऊस पडल्याने धरणे, नदी, तलाव पाण्याने भरली आहेत. मात्र गेली अनेक दिवस पावसाने लपंडाव सुरु केला आहे. कधी ऊन, तर कधी पाऊस तर कधी रिपरीप सुरु आहे. भातलावणीची ९९ टक्क्यांपर्यंत पूर्ण ही झाली आहेत. परंतु, पाऊस नसल्याने लावणी केलेल्या भात पिकांवर परिणाम होण्याची भीती निर्माण झाली आहे. पावसाचा हंगाम असतानाही जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये पाणीटंचाई निर्माण झाली आहे. एक ते चार दिवस आड पाणीपुरवठा केला जात आहे. त्यामुळे पाण्याचा दुष्काळ भरपावसात जाणवत आहे. जिल्ह्यातील अनेक भागात पाण्याचा दुष्काळ असताना अलिबाग–रोहा मार्गावरील नवघरजवळ पाण्याचा अपव्यय मोठ्या प्रमाणात होत आहे. नवघर पुलाजवळ पाईप लिकेज झाल्यामुळे हजारो लीटर पाणी वाया गेल्याचे दिसून आले. करंजाचे स्वरूप निर्माण झाले. मात्र, त्यावर ठोस उपाययोजना करण्यास स्थानिक प्रशासन उदासीन ठरले. पाणी वाया जाऊ नये म्हणून काही स्थानिकांना प्लास्टिक अवरण तसेच उच्च दाबातून बाहेर पडणारे पाणी थांबविण्यासाठी बाजूला दगड लावण्याचे काम केले.

वायशेतमधून घरफोडीचे आरोपी गजाआड

नाशिक आणि अलिबाग पोलिसांची संयुक्त कारवाई

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

घरफोडी गुन्ह्यातील आरोपींना वायशेतमधीस काटा गेटबाहेर गजाआड करण्यात आले. अलिबाग आणि नाशिक येथील पोलिसांनी संयुक्त कारवाई करीत त्यांना जेरबंद केले. ही घटना गुरुवारी (दि.२०) दुपारी घडली. नाशिकमध्ये घरफोडी करून हे दोघेजण त्यांच्या नातेवाईकांकडे लपून बसले होते, अशी माहिती समोर येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नाशिकमध्ये घरफोडीचा गुन्हा दाखल झाला होता. या गुन्ह्यातील अज्ञात आरोपींचा शोध नाशिक पोलीस घेत होते. घरफोडी करणारे दोघेजण अलिबागमध्ये त्यांच्या नातेवाईकांकडे लपून बसल्याची माहिती नाशिक पोलिसांना मिळाली. नाशिक पोलिसांच्या पथकाने गुरुवारी अलिबाग गाठले. अलिबाग पोलिसांच्या मदतीने लपलेल्या दोन चोरट्यांचा नाशिक पोलिसांनी शोध घेतला. हे दोघेजण वायशेत परिसरात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. वायशेत येथील काटा गेटच्या बाहेर त्यांना सकाळी साडेअकरा ते दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास सापळा रचून ताब्यात घेण्यात आले. अलिबाग आणि नाशिक पोलिसांनी संयुक्तरित्या छापा टाकून दोघांना •➤पान २ वर

घराच्या पायऱ्या तोडण्यावरून वाद

■ महिलेचा विनयभंग

। महाड । प्रतिनिधी ।

महाड तालुक्यातील अप्पर तुडील येथे घराच्या पायऱ्या तोडल्याचा जाब विचारण्यासाठी गेलेल्या महिलेला मारहाण करून तिच्याशी अश्लील कृत्य केल्याचा गंभीर प्रकार २१ ऑगस्ट रोजी सकाळी साडेअकराच्या सुमारास घडला. फिर्यादीच्या घराच्या पायऱ्या शेजारी राहणाऱ्या आरोपीने तोडल्याचा आरोप आहे. याबाबत जाब विचारला असता आरोपीने महिलेला कानाखाली मारून तिचा गळा धरला आणि जमिनीवर पाडल्याचे तक्रारीत नमूद आहे. त्यानंतर तिच्याशी अश्लील कृत्य करून तिच्या मनास लज्जा उत्पन्न केल्याचा आरोप आहे. यावेळी आणखी दोन महिलांनी फिर्यादीचे केस ओढून तिला •➤पान २ वर

अंबा नदीत तरुणाची आत्महत्या

। नागोठणे । प्रतिनिधी ।

नागोठणे येथील मोदी पार्क इमारतीत पहिल्या मजल्यावर राहणारा अविवाहित तरुण रविराज माणिक साळुंखे (२७) मूळ रा. मानसी प्राइड, फ्लॅट नं.एस २, तिसरा मजला, घुमाळ आळी, सह्याद्री अभ्यासिकेजवळ ता.जि. सातारा या तरुणाने अंबा नदीवरील वाकण येथील जुन्या पुलावरून नदीत उडी घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. या तरुणाचा •➤पान २ वर

साखरेसह गॅस, दुधाच्या दरात मोठी वाढ | सर्वसामान्यांच्या खिशाला बसणार कात्री

मिठाई वीस टक्क्यांनी महागणार?

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

गॅस, दुधासह साखरेच्या दरात भरमसाठ वाढ करण्यात आली आहे. या वाढत्या दराचा फटका जिल्ह्यातील सर्वसामान्यांना बसणार आहे. आता चहा पिण्यासाठी आणि सणासुदीच्या काळात मिठाई खरेदी करण्यासाठी ग्राहकांना अधिक पैसे मोजावे लागणार आहे. याचा आर्थिक भार मिठाई विक्रेत्यांनाही सोसावा लागणार आहे. त्यामुळे सणासुदीमध्ये मिठाईच्या दरामध्ये साधारणतः दहा ते वीस टक्क्यांची वाढ होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

जिल्ह्यामध्ये चहा बनविण्यापासून मिठाई व इतर पदार्थ तयार करण्यासाठी गॅसची मोठ्या प्रमाणात गरज निर्माण झाली आहे. जिल्ह्यात मिठाई, चहा व इतर खाद्य पदार्थ तयार करण्यासाठी गॅसची आवश्यकता मोठ्या प्रमाणात लागते. पुर्वी गॅस सिलेंडरची अठरा किलोचा बाटला बाराशे ते दीड हजार रुपयांना मिळत होता. आता त्यामध्ये दुपट्टीने वाढ झाली आहे. तीन हजार रुपयांमध्ये हा बाटला मिळत अल्याचे विक्रेत्यांकडून सांगण्यात आले आहे. आता या बाटल्यासाठी अधिक पैसे मोजावे लागत आहे.

गॅस सिलिंडरच्या दरानंतर दुधाच्या दरामध्येही भरमसाठ वाढ केली आहे. म्हशीचे दूध पूर्वी ८० रुपये लीटरने मिळत होते. ते आता ८५ रुपये लीटरने बाजारात विकले जात आहे. म्हशीचे दूध पूर्वी ६० रुपये लीटर होते. आता त्यामध्ये पाच रुपयांनी वाढ करून ६५ रुपये करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे.

> गॅससह दूध तसेच साखरेच्या दरात भरमसाठ वाढ केली आहे. चहाबरोबरच मिठाईच्या दरातही प्रचंड वाढ होण्याची शक्यता आहे. दहा ते वीस टक्क्यांनी मिठाईच्या दरात वाढ होऊ शकते. या महागाईचा परिणाम व्यवसायावरही होण्याची भीती आहे. खरेदी कमी होण्याची शक्यता आहे.
>
> – हरिपाल कुशवाह, राधिका स्वीट, वावे

साखर हा सर्वसामान्यांच्या जीवनातील अविभाज्य भाग आहे. लहान मुलांना साखर खायाला भरपूर आवडते. चहा बनविण्यासाठी साखरेचा वापर केला जातो. तसेच वेगवेगळ्या दुकानांमध्ये मिठाई बनविण्यासाठी दुधासह साखरेचीही मागणी अधिक असते. मात्र, साखरेच्या दरात दुपटीने वाढ केल्याने सर्वसामान्यांसह •➤पान २ वर

डबल डेकर कंटेनर वाहतुकीला वेग!

। उरण । प्रतिनिधी ।

जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरणाच्या (जेएनपीए) माध्यमातून होणाऱ्या कंटेनर रेल्वे वाहतुकीला आता आणखी वेग मिळणार आहे. जेएनपीए ते दिल्ली दरम्यान लांब पल्ल्याच्या डबल-स्टॅक कंटेनर रेल्वे वाहतुकीचा नवा टप्पा सुरू झाला असून, एका फेरीत अधिक प्रमाणात मालाची वाहतूक करणे शक्य होणार आहे. त्यामुळे बंदरातून कंटेनरची जलद वाहतूक, आयातदारांचा वेळ वाचणे आणि वाहतूक खर्चात बचत होण्याची अपेक्षा आहे.

- **दिल्लीपर्यंत मालवाहतूक जलद होणार**
- **आयातदारांचा वेळ व खर्च वाचणार**

जेएनपीएच्या खासगी बंदरांपैकी पीएसए संचालित बीएमसीटीपीच्या माध्यमातून डबल-स्टॅक रेल्वे वाहतुकीला सुरुवात करण्यात आली आहे. पहिल्या लांब पल्ल्याच्या डबल-स्टॅक प्रवासामुळे जेएनपीएची दिल्ली आणि देशाच्या अंतर्गत बाजारपेठांशी रेल्वे जोडणी अधिक सक्षम होणार आहे.

डबल-स्टॅक पद्धतीमुळे एकाच रेल्वे रेकमध्ये नेहमीच्या तुलनेत अधिक कंटेनर वाहून नेता येतात. त्यामुळे रेल्वे मालवाहतुकीची क्षमता वाढणार असून, मोठ्या प्रमाणातील आयात-निर्यात मालाची बंदरातून जलद निर्गतता शक्य होणार आहे.

जेएनपीएहून देशाच्या विविध भागांत जाणाऱ्या कंटेनर मालाची वाहतूक अधिक कार्यक्षम करण्यासाठी ही सुविधा महत्त्वाची ठरणार आहे. विशेषतः दिल्ली आणि उत्तर भारताशी जोडणी मजबूत झाल्याने बंदरावरील मालाची हाताळणी आणि पुढील वाहतूक सुलभ होण्यास मदत होणार आहे. रेल्वे मालवाहतुकीची क्षमता वाढल्याने बंदरात कंटेनर पडून राहण्याचा कालावधी कमी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आयात मालाची जलद निर्गतता होऊन आयातदारांचा वेळ व लॉजिस्टिक खर्च वाचण्यास मदत होईल.

लांब पल्ल्याच्या दुहेरी-स्तरीय रेल्वे वाहतुकीमुळे रस्ते वाहतुकीवरील अवलंबित्वही कमी होऊ शकते. परिणामी मोठ्या प्रमाणातील माल देशाच्या अंतर्गत बाजारपेठांपर्यंत अधिक वेगाने पोहोचवता येणार आहे.

जेएनपीएची वाढती रेल्वे पायाभूतसुविधा आणि उच्चक्षमतेच्या डबल-स्टॅक रेल्वे वाहतुकीची सुविधा देशाच्या आयात-निर्यात व्यापारासाठी महत्त्वाची ठरणार आहे. बंदरातून मालाची जलद निर्गतता, वाहतुकीतील अडथळे कमी करणे आणि पुरवठा साखळी अधिक सक्षम करणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.

जेएनपीए ते दिल्ली या लांब पल्ल्याच्या रेल्वे जोडणीमुळे भारतीय व्यापाराला अधिक वेग, उद्योगांना कमी लॉजिस्टिक खर्च आणि आयात-निर्यात मालाला जलद बाजारपेठ मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

उपसरपंचपदी सपना गुरव बिनविरोध

रसायनी : ग्रुप ग्रामपंचायतीच्या सरपंच रवींद्र कुंभार तसेच ग्रामपंचायत अधिकारी विश्वास वारे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत नऊ सदस्यांच्या परवानगीने सपना मनोज गुरव यांची शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने बिनविरोध निवड करण्यात आली. ग्रामपंचायत स्तरावर सर्व सदस्यांच्या सहकार्याने आणि एकमताने ही निवड पार पडली. निवडीनंतर उपस्थित सदस्य व ग्रामस्थांनी सपना मनोज गुरव यांचे अभिनंदन करून पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

ग्रामपंचायतीच्या माध्यमातून गावाच्या विकासाला प्राधान्य देत नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे नवनिर्वाचित सपना मनोज गुरव यांनी सांगितले. तसेच ग्रामस्थांच्या सहकार्याने विविध विकासकामे मार्गी लावण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

सुधासरसगड महिला फार्मर्स प्रोड्युसर कंपनीचे भूमीपूजन

। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत आणि उमेदच्या पुढाकाराने जांभुळपाडा येथे सुधासरसगड महिला फार्मर्स प्रोड्युसर कंपनी लिमिटेडचे भूमीपूजन समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. हा समारंभ दि. १८ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आला होता.

या महिला उत्पादक कंपनीच्या माध्यमातून परिसरातील महिलांना शेती, प्रक्रिया उद्योग आणि बाजारपेठेची जोड मिळणार असून, शेतीमालाला चांगला भाव मिळवून देणे, मूल्यवर्धित उत्पादने तयार करणे आणि स्वावलंबी होणे शक्य होणार आहे. त्यांच्या आर्थिक उन्नतीला मोठा हातभार लागणार आहे. कार्यक्रमाच्या शेवटी मान्यवरांनी महिलांच्या या उपक्रमाला शुभेच्छा दिल्या आणि सर्वतोपरी सहकार्याचे आश्वासन दिले. या कार्यक्रमासाठी जिल्हा परिषद सदस्य शर्मिला पाटील, पंचायत समिती सभापती जागृती मानकर, उपसभापती संदेश शेवाळे, जिल्हा परिषद सदस्य शर्मिला बोडके, पंचायत समिती सदस्य प्रणिता परदेशी, जिल्हा व्यवस्थापक शिरीष पाटील, तालुका व्यवस्थापक अभिनव पाटील, तालुका सहाय्यक बीएलओ कैलास आघाव, तिवरे उपसरपंच सी.व्ही. पाटील, कंपनीचे सचिव, अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक रंजना विमकर उपस्थित होत्या.

पान १ वरून

पत्रकार आमीर तारलेकर यांचे अपघाती निधन

अपघातांचे सातत्य कायम आहे. शुक्रवारी रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास आमीर शौकत तारलेकर आणि त्यांचा भाऊ शब्बीर तारलेकर हे दोघेही सुझुकी बर्गमन स्कूटर (क्र.एमएच ०६-सीइ-२३३५) वरून सवाद येथील घराकडे परतत असताना महाड तालुक्यातील भोराव फाट्याजवळ असलेल्या एका अपूर्ण पुलानजीकच्या पर्यायी रस्त्यावर भोरच्या दिशेने समोरून स्विफ्ट कार (क्र. एमएच २४ बीआर ८३७२) भरधाव वेगाने आल्याने दोन्ही वाहनांची समोरासमोर धडक बसली. या अपघातात पत्रकार आमीर तारलेकर यांचा जागीच मृत्यू झाला, तर स्कूटरवर मागे बसलेला त्यांचा भाऊ शब्बीर तारलेकर हा गंभीर जखमी झाला. महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात अपघाताची नोंद करण्यात आली असून, स्वीफ्ट कार चालक गणेश धन्यकुमार देवकाते (रा. सोलापूर) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जिल्हा क्रीडा संकुलात निधीचा ‘खेळ’

स्पर्धांमधून खेळाडू तयार करण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामुळे रायगड जिल्ह्याला खेळाडूंची खाण म्हणून बोलले जाते. जिल्ह्यातील खेळाडूंना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी उभारण्यात आलेल्या या क्रीडा संकुलाची देखभाल वेळेत होणे अपेक्षित असताना, २२ कोटींचा प्रस्ताव मंजुरीच्या प्रतीक्षेत असल्याने दुरुस्तीची कामे रखडली आहेत. शासनाच्या मंजुरीनंतरच संकुलातील विविध कामांना गती मिळणार आहे.

राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय, स्तरावरील खेळाडू तयार व्हावेत, म्हणून अलिबागमध्ये २३ वर्षांपूर्वी जिल्हा क्रीडा संकुल बांधण्यात आले. गोंधळपाडा येथील संगम या परिसरात सुमारे १२ एकर जागेमध्ये हे संकुल बांधण्यात आले. जिल्हा क्रीडा कार्यालयासह खेळाडूंसाठी वसतिगृह, जिमखाना, बॅडमिंटन कोर्ट, प्रेक्षक गॅलरी, धावपट्टी, व्हॉलीबॉल, जलतरण तलाव, लांब उडी, क्रिकेट अशा वेगवेगळ्या इनडोअर व आऊट डोअर खेळांसाठी मैदाने उभारण्यात आली होती.

मात्र, गेल्या काही वर्षांपासून या जिल्हा क्रीडा संकुलाचा वापर निवडणुकीच्या कामांसाठी मोठ्या प्रमाणात वापरण्यात आला. त्याचा परिणाम स्थानिक खेळाडूंना या संकुलाचा फारसा उपयोग झाला नाही. पुरेशी सुविधा, अद्ययावत क्रीडा संकुलाअभावी रायगड जिल्ह्यातील खेळाडू खेळापासून आणि देश, राज्य पातळीवर संधीपासून वंचित आहेत.

जिल्हा क्रीडा संकुलाची इमारत गेल्या अनेक वर्षांपासून नादुरुस्त आहे. धावपट्टी खराब झाली असून, त्याठिकाणी आता गवताने विळखा घातला आहे. वसतिगृह, बॅडमिंटन कोर्ट जीर्ण झाले आहे. काही ठिकाणी गळतीचा त्रास होत आहे. जलतरण तलाव खराब झाले आहे. तेथील लादी निघाली आहे. खेळाडूंसह क्रीडाप्रेमींच्या मागणीनंतर जिल्हा क्रीडा कार्यालयाकडून शासनाकडे दुरुस्तीसाठी प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. सुमारे २२ कोटी प्रस्ताव मान्यतेसाठी पाठविला असल्याची माहिती जिल्हा कीडा अधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे. यामध्ये ४०० मीटरचा सिंथेटीक ट्रॅक, बॅडमिंटन कोर्ट, वसतिगृह, जलतरण तलाव आणि कार्यालयाची दुरुस्ती केली जाणार आहे. मात्र, या क्रीडा संकुलाच्या दुरुस्तीचा प्रस्ताव लालफितीत अडकून बसल्याची माहिती समोर येत आहे. शासनाच्या दुर्लक्षपणाचा फटका खेळाडूंना बसत आहे.

अपात्रांना ९,६०५ कोटींचा लाभ!

अपात्र लाभार्थ्यांना एवढ्या मोठ्या प्रमाणात निधी कसा वितरित झाला, याचा हिशेब सरकारला द्यावा लागणार आहे. लाभार्थी निवड, पडताळणी आणि निधी वितरणाच्या प्रक्रियेत नेमक्या कुठे त्रुटी राहिल्या, याची सखोल चौकशी करण्याची मागणी आता जोर धरू शकते.

कोणत्या कारणांमुळे लाभार्थी अपात्र ठरले?

योजनेची पडताळणी करताना सुमारे ६२ लाख लाभार्थींनी ई-केवायसी पूर्ण केली नसल्याचे आढळले. त्यामुळे त्यांना यादीतून वगळण्यात आले. वार्षिक कौटुंबिक उत्पन्न अडीच लाख रुपयांपेक्षा अधिक असलेल्या सुमारे १६ लाख लाभार्थींनाही अपात्र ठरवण्यात आले. संजय गांधी निराधार अनुदान योजनेचा लाभ घेणाऱ्या सुमारे ३ लाख ६० हजार लाभार्थ्यांना वगळण्यात आले. एका कुटुंबातील दुसऱ्या सदस्याने लाडकी बहीण योजनेचा लाभ घेत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर २ लाख ५० हजार नावे कमी करण्यात आली. तसेच ६५ वर्षांपेक्षा अधिक वय असलेल्या सुमारे १ लाख ८० हजार लाभार्थ्यांना अपात्र ठरवण्यात आले. याशिवाय सरकारी सेवेत असलेल्या सुमारे ४ लाख ५० हजार कर्मचाऱ्यांना योजनेतून वगळण्यात आले. जिल्हास्तरीय पडताळणीनंतर आणखी १ लाख ७० हजार लाभार्थी अपात्र ठरले.

२४ महिन्यांत ७६ हजार कोटींचा खर्च

लाडकी बहीण योजनेवर राज्य सरकारने २४ महिन्यांत तब्बल ७६ हजार २३१ कोटी रुपये खर्च केले आहेत. आरटीआयमधून मिळालेल्या माहितीनुसार, याच कालावधीत अपात्र लाभार्थ्यांच्या खात्यात ९ हजार ६०५ कोटी रुपये वितरित झाले. सध्या सुमारे १ कोटी ६५ लाख महिला या योजनेचा लाभ घेत आहेत. नोव्हेंबर २०२५ पर्यंत सुमारे २ कोटी १ लाख लाभार्थींना या योजनेचा लाभ मिळाला होता. फेब्रुवारी आणि मे २०२५मध्ये लाभार्थ्यांची संख्या २ कोटी ४ लाखांपर्यंत पोहोचली होती. अपात्र लाभार्थी वगळल्यानंतर योजनेच्या मासिक खर्चातही मोठी घट झाली आहे. पूर्वी सुमारे ५ हजार ४५० कोटी रुपये मासिक वितरण अपेक्षित असताना आता हा खर्च ३ हजार ६४० कोटी रुपयांपेक्षा अधिक असल्याचे आकडेवारीतून समोर आले आहे.

पीएम केअर्सच्या शिल्लकीपेक्षाही अधिक निधी

३१ मार्च २०२५ रोजी पीएम केअर्स निधीत ८ हजार ४५२ कोटी रुपये शिल्लक असल्याचे लेखापरीक्षण अहवालातील माहितीत नमूद करण्यात आले आहे. त्या तुलनेत लाडकी बहीण योजनेतील अपात्र लाभार्थ्यांना वितरित झालेली ९ हजार ६०५ कोटी रुपयांची रक्कम सुमारे १ हजार १५३ कोटींनी अधिक आहे.

लाडकी बहीण योजनेचा धक्कादायक हिशेब

९२ लाख अपात्र ठरलेले लाभार्थी
९,६०५ कोटी अपात्र लाभार्थ्यांना वितरित निधी
७६,२३१ कोटी २४ महिन्यांतील योजनेवरील एकूण खर्च
१ कोटी ६५ लाख सध्या लाभ घेणाऱ्या महिला
६२ लाख ई-केवायसी न केल्याने वगळलेले लाभार्थी
१६ लाख उत्पन्न मर्यादा ओलांडल्याने वगळलेले
४.५० लाख सरकारी कर्मचारी लाभार्थी यादीतून वगळले
८,४५२ कोटी ३१ मार्च २०२५ रोजी पीएम केअर्स निधीतील शिल्लक

रायगड जि.प.त सोलर घोटाळा?

आदेश समोर आला. या आदेशानुसार १६ प्रकल्पांतील ७० अंगणवाड्यांमध्ये अपारंपरिक ऊर्जास्रोत म्हणून सोलर संच बसविणे आणि अंतर्गत विद्युत वायरिंग करण्याचे काम ‘ग्रीन एनर्जी सिस्टीम’ या कंपनीला देण्यात आले. प्रत्येक संचाची जीएसटीसह किंमत १ लाख ४८ हजार ८०० रुपये, तर एकूण पुरवठा रक्कम १ कोटी ४ लाख १६ हजार रुपये असल्याचे कागदपत्रांत नमूद आहे.

चौकशीचा चेंडू आता शासनाच्या कोर्टात

कंपनीची प्रत्यक्ष पडताळणी, निविदा प्रक्रिया, पुरवठा आदेश, सोलर संचांची प्रत्यक्ष स्थापना, अंगणवाड्यांची पाहणी, देयकांची अदा प्रक्रिया आणि संबंधित कंपनीची शासकीय नोंदणी यांची सखोल तपासणी झाल्यास या प्रकरणातील सत्य बाहेर येऊ शकते. त्यामुळे शासन आता या आरोपांची निष्पक्ष चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर कारवाई करणार का, की प्रकरण फाईलींच्या ढिगाऱ्यातच दडपले जाणार, याकडे रायगडचे लक्ष लागले आहे.

सोलर संच प्रत्यक्ष बसले की कागदावरच?

कंपनीचे अस्तित्व तपासल्याशिवाय एक कोटीहून अधिक रकमेचा पुरवठा आदेश कसा देण्यात आला? ७० अंगणवाड्यांमध्ये प्रत्यक्ष सोलर संच बसविण्यात आले आहेत की केवळ कागदोपत्री खरेदी दाखवून शासकीय निधीचा अपहार झाला? असा थेट सवाल संजय सावंत यांनी उपस्थित केला आहे.

७० अंगणवाड्यांची नावेही आदेशात नाहीत?

या प्रकरणातील आणखी एक गंभीर मुद्दा म्हणजे ७० अंगणवाड्यांसाठी सोलर संच बसविण्याचा दावा करण्यात आला असला तरी संबंधित अंगणवाड्यांची नावे पुरवठा आदेशात नमूद नसल्याचे समोर आले आहे. त्यामुळे निविदा प्रक्रिया, लाभार्थी अंगणवाड्यांची निवड, कंपनीची पात्रता, प्रत्यक्ष कामाची पाहणी आणि देयक अदा करण्याची प्रक्रिया याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. पुरवठा आदेशावर मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांची स्वाक्षरी असल्याचे कागदपत्रांवरून दिसून येते.

घराच्या पायऱ्या तोडण्यावरून वाद

शिवीगाळ केली. तसेच घराचे काम करू न देण्याची आणि नवीन घर बांधल्यास ते पाडून टाकण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत म्हटले आहे. याप्रकरणी महाड तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस हवालदार महाडीक करीत आहेत.

अंबा नदीत तरुणाची आत्महत्या

मृतदेह बाळसई गावाच्या हद्दीतील अंबा नदीच्या पात्रात शनिवारी (दि.२२) सकाळी आढळून आला आहे. या तरुणाने नैराश्य आल्याने आत्महत्या केल्याचे कारण प्राथमिक तपासात समोर येत आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ निर्माण झाली आहे. याप्रकरणी नागोठणे पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू अशी नोंद करण्यात आली असून, पुढील तपास पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी रवींद्र पारखे यांच्या मार्गदर्शनाखाली नागोठणे पोलीस करीत आहेत.

वायशेतमधून घरफोडीचे आरोपी गजाआड

ताब्यात घेतले. ताब्यात घेण्यात आलेले आरोपी हे मूळचे नाशिक जिल्ह्यातले असून, त्यांचे नातेवाईक आरसीएफ कंपनीमध्ये कंत्राटी कर्मचारी आहेत. ते राहात असलेल्या कॉलनीमध्ये हे दोघेजण लपून राहिले होते. या दोघांची नावे अद्याप स्पष्ट करण्यात आली नाही. अधिक तपासानंतर खरे चित्र स्पष्ट केल जाणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

... तर सरकारला पाय ठेवू देणार नाही!

साडेबावीस टक्के योजना अथवा २०१३ चा भूसंपादन कायदा लागू करून जमीन संपादनाचा मार्ग मोकळा करण्याचा शासन निर्णय हा हुकूमशाही पद्धतीचा असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला. हा शासन निर्णय तातडीने रद्द करण्याची मागणीही करण्यात आली.

‘तिसरी मुंबई’ची अधिसूचना अस्तित्वात असेपर्यंत संबंधित क्षेत्रातील जमीन खरेदी-विक्रीवर बंदी आणावी, एमएमआरडीएकडून कोणत्याही प्रकारचे सर्वेक्षण करू नये, पेण तालुक्यातील सिंचनाखालील ४२ गावे जमीन संपादनातून वगळावीत, तसेच शेतकऱ्यांनी स्वतःच्या जमिनीवर केलेल्या बांधकामांवर हरकती घेऊ नयेत, अशा विविध मागण्या शेतकरी प्रतिनिधींनी बैठकीत मांडल्या.

शेतकऱ्यांच्या आक्रमक भूमिकेनंतर अतिरिक्त मुख्य सचिव असीम कुमार गुप्ता यांनी सरकार कोणत्याही परिस्थितीत शेतकऱ्यांवर जमीन संपादनाची सक्ती करणार नसल्याचे सांगितले. गावठाणाबाहेरील २०० मीटरपर्यंतची घरे नियमित करण्याबाबत सकारात्मक भूमिका घेण्यात येईल आणि शेतकऱ्यांनी स्वतःच्या जागेवर बांधलेली घरे सुरक्षित राहतील, अशी ग्वाही त्यांनी दिल्याचे समितीने सांगितले.

यापुढे शेतकऱ्यांसोबत नियमित संवाद ठेवला जाईल, असेही सरकारकडून स्पष्ट करण्यात आल्याचा दावा समितीने केला आहे. मात्र, केवळ आश्वासनांवर समाधान मानणार नसून ‘तिसरी मुंबई’चा प्रस्ताव आणि जमीन संपादनाच्या निर्णयाविरोधातील लढा सुरूच राहणार असल्याचे समितीने स्पष्ट केले आहे.

बैठकीस समितीचे अध्यक्ष सुधाकर पाटील, कार्याध्यक्ष संतोष ठाकूर, १२४ गाव समितीचे अध्यक्ष अनंत पाटील, कार्याध्यक्ष ॲड. विकास म्हात्रे, सचिव रूपेश पाटील, समन्वयक ॲड. सत्यवान भगत, काशिनाथ पाटील, जिल्हा परिषद सदस्य ॲड. अविनाश ठाकूर, पंचायत समिती सदस्या कविता पाटील, चिरनेरचे सरपंच भास्कर मोकल, प्रकाश पाटील, अजित पाटील, चंद्रशेखर ठाकूर, रत्नाकर म्हात्रे आदी उपस्थित होते.

मिठाई वीस टक्क्यांनी महागणार?

चहा विक्रेते आणि मिठाई विक्रेत्यांचा आर्थिक ताळमेळ बिघडण्याचे संकट निर्माण झाले आहे. ४४ ते ४८ रुपये किलोने मिळणाऱ्या साखरेसाठी ७० ते ८० रुपये मोजावे लागणार आहे. साखरेच्या दरात भरमसाठ वाढ केल्याने सर्वसामान्य नागरिक मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. चहाच्या दरात यामुळे वाढ होण्याची शक्यता आहे. दहा रुपयाला मिळणारा चहा आता १२ ते पंधरा रुपयांना मिळण्याची शक्यता आहे. वीस रुपयांना मिळणारा चहा २५ रुपयांना मिळणार आहे. तसेच पेढे, बर्फी, लाडू, मलाई बर्फी आदी मिठाईच्या दरात दहा ते वीस टक्क्यांनी वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आगामी काळात साजऱ्या होणाऱ्या गणेशोत्सावसह दिवाळी, नवरात्र उत्सवात मिठाई खरेदी करताना ग्राहकांच्या खिशाला कात्री बसणार आहे.

कमी उत्पादन आणि मर्यादित साठ्याच्या नियमांमुळे तसेच ऐन सणासुदीत साखरेला मागणी वाढल्याने दर झपाट्याने वाढले आहेत. तसेच हवामान बदलामुळे ऊस पिकाचे नुकसान झाल्याने उत्पादनात घट झाल्याने साखरेचे दर वाढविल्याचे व्यावसायिकांकडून बोलले जात आहे.

पोस्कोचा शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्याचा प्रयत्न

। माणगाव । प्रतिनिधी ।

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक प्रवास अधिक सुकर व्हावा आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्याला गती मिळावी, या उद्देशाने पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीने आपल्या उपक्रमांतर्गत यंदाही दफ्तर आणि शैक्षणिक साहित्य वाटपाचा उपक्रम हाती घेतला. गेल्या चार वर्षांची यशस्वी परंपरा कायम राखत कंपनीने यावर्षी माणगाव तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य वाटप उपक्रम राबवला. आत्तापर्यंत एकूण ५७१६ शालेय साहित्य संच वितरीत केले आहेत.

वाढती महागाई आणि ग्रामीण भागातील गरजा लक्षात घेऊन कंपनीने यंदा माणगाव तालुक्यातील ८९ शाळांमधील विद्यार्थ्यांना एकूण २,००९ शालेय साहित्य संच अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने वितरित केले. या मदतीमुळे पालकांना आर्थिक दिलासा मिळाला असून, विद्यार्थ्यांमध्ये नवा उत्साह पाहायला मिळत आहे.

- **८९ शाळांमध्ये २,००९ शालेय संचांचे वितरण**

या उपक्रमांतर्गत केवळ साहित्य देण्यापेक्षा विद्यार्थ्यांच्या दैनंदिन गरजांचा अभ्यास करून संच तयार करण्यात आले होते. यामध्ये दप्तर, वह्या, अंकलिपी, १२ पेन्सिलचा संच, पट्टी, रबर, शार्पनर, रंगीत पेन्सिल, चित्रकला वही, स्टीलची पाण्याची बाटली, गिरवायची पाटी यांसारख्या आवश्यक वस्तूंचा समावेश होता.

हा संपूर्ण उपक्रम स्थानिक शाळा आणि शिक्षण विभागाच्या समन्वयाने पार पडला. पोस्को महाराष्ट्र स्टीलच्या विविध विभागांतील अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष शाळांना भेटी देऊन मुलांशी संवाद साधला आणि साहित्य वाटप केले.

रोहा-चणेरा मार्गावर दोन वाहनांची धडक

रोहा : रोहा तालुक्यातील आरे खुर्द गावाच्या हद्दीत जिल्हा परिषद शाळेसमोरील चणेरा-रोहा मार्गावर बोलेरो पिकअपने उभ्या वाहनाला मागून धडक दिल्याची घटना २१ ऑगस्ट रोजी दुपारी १.१४ वाजता घडली. पोलिसांच्या माहितीनुसार, बोलेरो पिकअप चालकाने रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून हयगयीने व बेदरकारपणे वाहन चालवले. यावेळी रस्त्याच्या बाजूला उभ्या असलेल्या ग्रँड विटारा वाहनाला पिकअपने मागून धडक दिली. धडकेनंतर ग्रँड विटारा वाहन रस्त्यालगतच्या झाडावर जाऊन आदळले. या अपघातात दोन्ही वाहनांचे नुकसान झाले असून, ग्रँड विटारा वाहनातील चालक आणि त्यांच्या आईला किरकोळ दुखापत झाली.

भातशेती बहरली, तरी शेतकरी चिंताग्रस्त

। उरण । प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यात भात शेतीची कामे अंतिम टप्प्यात आली आहेत. भातशेतीला पोषक वातावरण आणि पाऊस पडत असल्याने भात शेती बहरली आहे. मात्र उरण, पनवेल आणि पेण तालुक्यातील हजारो हेक्टर भात शेतीवर (एमएमआरडी) तिसऱ्या मुंबईच्या उभारणीसाठी राज्य सरकार बुलडोझर फिरवण्याचा घाट घातलत असल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाल्याचे चित्र दिसून येत आहे.

उरण, पनवेल आणि पेण तालुक्यातील १२४ गावांमधील सुपीक जमीन राज्य सरकार एमएमआरडीएच्या तिसरी मुंबई (कर्नाळा-साई-चिरनेर नवनगर) प्रकल्पाच्या उभारणीसाठी संपादित करण्याचा प्रयत्न करत आहे. त्यामुळे या तालुक्यातील शेकडो शेतकऱ्यांनी तिसऱ्या मुंबईच्या प्रकल्पाला कडाडून विरोध दर्शवून आपल्या शेतजमिनीवर भातशेतीची लागवड केली आहे. सध्या भातशेतीला पोषक वातावरण आणि पाऊस पडत असल्याने भातशेती जोमाने वाढू लागली आहे. एकंदरीत, सुपीक जमिनीचे नुकसान होण्याची शक्यता आहे. उरण, पनवेल आणि पेणमधील हजारो एकर बागायती व शेतजमीन उद्ध्वस्त होऊन स्थानिक संस्कृती संपुष्टात येऊन येथील आगरी, कोळी व कराडी समाजाचे अस्तित्व संपुष्टात येऊन, उपजीविकेचे साधन नष्ट होणार असल्याने आज जरी भातशेती जोमाने बहरत असली तरी राज्य सरकार लादत असलेल्या तिसऱ्या मुंबईच्या प्रकल्पामुळे शेतकरी चिंताग्रस्त झाल्याचे दिसून येत आहे.

आरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

। रसायनी । प्रतिनिधी ।

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या शताब्दी वर्षानिमित्त तसेच शिवसेना सुकापूर शाखेच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून भव्य मोफत आरोग्य व कॅन्सर तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, सुमारे १५० नागरिकांनी सहभाग नोंदवून विविध आरोग्य तपासण्यांचा लाभ घेतला. नागरिकांनी या सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले.

शिबिरामध्ये नागरिकांची विविध आरोग्य तपासणी करण्यात आली. तसेच कॅन्सरविषयी तपासणी व मार्गदर्शन करण्यात आले. नागरिकांना आरोग्याबाबत जागरूक करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमामुळे परिसरातील नागरिकांना मोठा लाभ झाला. या शिबिरास प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हाप्रमुख दीपक निकम, महानगरप्रमुख समाधान काशीद, पनवेल महानगर संघटक निला गरड, डॉक्टर सेल महाराष्ट्र उपाध्यक्ष आशिष बांदेकर, तालुकाप्रमुख संदीप तांडेल, विभागप्रमुख धनंजय पाटील, विभागप्रमुख विशाल भोईर, उपविभागप्रमुख जयंत पाखरे, उपतालुकाप्रमुख रामदास पाटील, पनवेल अधिकारी अजय पाटील तसेच युवा नेते गुरुनाथ भोपी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी हनुमंत खंडागळे, राहुल केणी, ऋषभ मोहिते, विनोद कदम, पुरुषोत्तम पाटील, राम नाकती, अमोल गोसावी यांच्यासह शिवसैनिक उपस्थित होते.

रिसॉर्टच्या बुकिंगच्या नावाखाली ५१.७५ लाखांचा अपहार

। नेरळ । प्रतिनिधी ।

नेरळ-धामोते येथील एका रिसॉर्टमध्ये लग्न समारंभाच्या बुकिंगसाठी ग्राहकांकडून घेतलेली तब्बल ५१ लाख ७५ हजार रुपयांची रक्कम रिसॉर्टच्या खात्यात जमा न करता स्वतःकडे वळवल्याचा प्रकार समोर आला आहे. १४ फेब्रुवारी ते २६ एप्रिल २०२६ या कालावधीत हा प्रकार घडल्याचे पोलिसांनी सांगितले. आरोपी रिसॉर्टमध्ये सेल्स मॅनेजर म्हणून काम करीत होता. ग्राहकांना बुकिंगच्या रकमेत सवलत देण्याचे सांगून त्यांचा विश्वास संपादन करण्यात आला. त्यानंतर एका ग्राहकाकडून ८ लाख रुपये रोख, तर इतर ग्राहकांकडून १५ लाख, १५ लाख ५० हजार आणि ११ लाख २५ हजार रुपये बँक खात्यात घेण्यात आले. याशिवाय २ लाख रुपये रोख घेतल्याचा आरोप आहे. अशा प्रकारे एकूण ५१ लाख ७५ हजार रुपये स्वतःच्या बँक खात्यात आणि रोख स्वरूपात स्वीकारून त्यांचा अपहार केल्याची तक्रार आहे. याप्रकरणी नेरळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक शेंबडे करीत आहेत.

कंपनीच्या शेडमधून ४२ हजारांचा माल चोरीला

खालापूर : खालापूर तालुक्यातील लोहोह्या गावाच्या हद्दीत असलेल्या एका कंपनीच्या शेडमधून ४२ हजार रुपये किमतीचा माल अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना समोर आली आहे. १६ ऑगस्ट रोजी रात्री ११ ते १७ ऑगस्ट रोजी रात्री ११ या २४ तासांच्या कालावधीत सिलिंकरर्स कंपनी प्रायव्हेट लिमिटेडच्या सर्व्हे क्रमांक ३४/४४ येथील शॉप फ्लॉवर शेड क्रमांक एकमध्ये ही चोरी झाल्याचे तक्रारीत नमूद आहे. कंपनीच्या संमतीशिवाय अज्ञात व्यक्तीने लबाडीच्या उद्देशाने कंपनीचा ४२ हजारचा माल चोरून नेला.

कृउबा समितीच्या सचिवांची दडपशाही

- व्यापारांसह शेतकऱ्यांवर अन्याय
- जुन्या जागा परत देण्याची मागणी

| पेण | प्रतिनिधी |

पेण तालुक्यातील कृषी उत्पन्न बाजार समिती ही सर्वसामान्य व्यापारी आणि शेतकऱ्यांसाठी महत्त्वाची बाजारपेठ मानली जाते. मात्र, बाजार समितीचे नवनियुक्त सचिव पुरुषोत्तम पाटील हे व्यापारी, शेतकरी तसेच कर्मचाऱ्यांवर अन्यायकारक अटी लादून मनमानी कारभार करत असल्याचा गंभीर आरोप व्यापारी व शेतकऱ्यांनी केला आहे. या कारभाराला कंटाळून व्यापारी आणि शेतकरी एकत्र येत आपली भूमिका मांडली.

बाजार समितीच्या आवारात नव्याने सिमेंट काँक्रीटीकरण करण्यात आले आहे. या जागेवर ६ बाय ४ फुटांचे चौकोन आखून त्याच मर्यादित जागेत व्यापार करण्याची सक्ती केली जात असल्याचा आरोप व्यापाऱ्यांनी केला आहे. एवढ्या छोट्या जागेत एक हातगाडी उभी केल्यानंतर दोन व्यक्तींनाही व्यवस्थित उभे राहता येत नाही, मग व्यापाऱ्यांनी माल ठेवायचा कुठे आणि ग्राहकांनी खरेदी करायची कशी, असा सवाल व्यापाऱ्यांनी उपस्थित केला आहे.

व्यापाऱ्यांची स्पष्ट मागणी आहे की, ज्या जुन्या जागांवर ते अनेक वर्षांपासून व्यवसाय करत आहेत, त्याच जागा त्यांना पुन्हा उपलब्ध करून द्याव्यात. आजवर व्यापारी एकमेकांशी समन्वयाने आणि गुण्यागोविंदाने व्यवसाय करत आले आहेत. बाजार समितीच्या अडचणी समजून घेत त्यांनी अनेक वर्षे परिस्थितीशी जुळवून घेत व्यवसाय केला. मात्र, आता अचानक कठोर नियम लादून व्यापाऱ्यांना अडचणीत आणू नये, अशी भूमिका त्यांनी घेतली आहे.

पावसाळ्यात बाजार समितीच्या आवारात मोठ्या प्रमाणात पाणी आणि चिखल होत असतानाही व्यापारी व शेतकरी अनेक वर्षे त्याच परिस्थितीत व्यवसाय करत आहेत. त्यावेळी त्यांनी सभापती किंवा संचालक मंडळाकडे कोणत्याही तक्रारी न करता परिस्थितीशी जुळवून घेत व्यवसाय सुरू ठेवला. मात्र, सध्याच्या कारभाराबाबत व्यापारी व शेतकऱ्यांमध्ये नाराजी वाढल्याचे चित्र आहे. सचिवांकडून व्यापारी, शेतकरी तसेच बाजार समितीच्या कर्मचाऱ्यांना योग्य वागणूक मिळत नसल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला आहे. अनेक निर्णय घेताना संचालक मंडळाला विश्वासात घेतले जाते का, याबाबतही व्यापारी व शेतकऱ्यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणात संचालक मंडळाने हस्तक्षेप करून वस्तुस्थिती जाणून घ्यावी, अशी मागणी जोर धरत आहे.

दरम्यान, बाजार समितीच्या आवारात लावण्यात आलेल्या रिफ्लेक्टरच्या स्क्रूबाबतही व्यापारी व शेतकऱ्यांनी नाराजी व्यक्त केली. हे स्क्रू पायाला लागून अनेकांना दुखापत झाल्याचा आरोप करण्यात आला असून, सुरक्षेच्या दृष्टीने त्याकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, व्यापारी आणि शेतकऱ्यांचा रोष संचालक मंडळापेक्षा सचिवांच्या कार्यपद्धतीविरोधात अधिक असल्याचे यावेळी दिसून आले. त्यामुळे संचालक मंडळाने केवळ नियमांची अंमलबजावणी करण्यापेक्षा प्रत्यक्ष व्यापारी आणि शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकून घेऊन त्यावर सकारात्मक तोडगा काढावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. बाजार समिती ही व्यापारी आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी असताना त्यांनाच अडचणीत आणणारे निर्णय घेतले जाऊ नयेत. त्यामुळे सचिव, सभापती आणि संचालक मंडळाने व्यापारी व शेतकऱ्यांची बैठक घेऊन त्यांच्या मागण्यांवर चर्चा करावी आणि सर्वमान्य तोडगा काढावा, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. त्यामुळे व्यापारी आणि शेतकऱ्यांच्या या नाराजीवर बाजार समिती प्रशासन काय भूमिका घेते आणि त्यांच्या मागण्यांवर कोणता तोडगा काढला जातो, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

निवडक

प्रवीण गायकवाड समन्वयकपदी

अलिबाग : जे.एस.एम. महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागातील सहयोगी प्राध्यापक तथा राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. प्रवीण गायकवाड यांची रायगड जिल्हा राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.



त्यांच्या या नियुक्तीमुळे जे.एस.एम. महाविद्यालयाच्या शैक्षणिक व सामाजिक कार्यात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. प्रा. डॉ. प्रवीण गायकवाड हे जेएसएम महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागात सहयोगी प्राध्यापक म्हणून कार्यरत असून, सन २०१९ पासून राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत. यापूर्वी त्यांनी राष्ट्रीय सेवा योजना विभागीय समन्वयक म्हणूनही प्रभावीपणे कार्य केले आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, नेतृत्वगुण, राष्ट्रप्रेम, श्रमप्रतिष्ठा व सामाजिक जाणीव निर्माण करण्यासाठी त्यांनी विविध उपक्रमांचे आयोजन केले आहे. आता त्यांच्यावर रायगड जिल्हा राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक म्हणून जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांमधील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे नियोजन, समन्वय व मार्गदर्शन करण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी असणार आहे. या नियुक्तीबद्दल जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. डॉ. गौतम पाटील, उपाध्यक्षा शैला पाटील आणि कार्यवाह डॉ. साक्षी पाटील यांच्यासह शिक्षकांनी प्रा.डॉ. प्रवीण गायकवाड यांचे अभिनंदन करून त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

गटशेतीतून समृद्धीचा मार्ग

चिरनेर : ''सत्यमेव जयते फार्मर्स कप २०२६'' अंतर्गत पाणी फाऊंडेशन, कृषी विभाग आणि उमेद अभियान यांच्यावतीने उरण तालुक्यातील शेतकरी गटांसाठी ''माझा गट, माझं कुटुंब'' या विशेष प्रशिक्षणाचे आयोजन गुरुवारी (दि.२०) चिरनेर येथील ग्रामपंचायत कार्यालयात करण्यात आले होते. या प्रशिक्षणात उरण तालुक्यातील विविध शेतकरी गटांमधील शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला होता. या प्रशिक्षणात एकट्याने शेती करणे दिवसेंदिवस आव्हानात्मक होत असताना, गटाने शेती करणे हे समृद्धीकडे जाण्याचे पायाभूत पाऊल ठरू शकते, या मुख्य विचारावर प्रशिक्षणाची मांडणी करण्यात आली. एकट्या शेतकऱ्याला भेडसावणाऱ्या मजूर, यंत्रसामग्री, निविष्ठा, भांडवल, तंत्रज्ञान, उत्पादन विक्री आणि बाजारपेठेच्या अडचणींबाबत या प्रशिक्षणाद्वारे कृषी अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला. शेतकरी गटाच्या माध्यमातून सामूहिक नियोजन, सामूहिक खरेदी, यंत्रसामग्रीचा सामूहिक वापर, ज्ञानाची देवाणघेवाण, उत्पादनाचे एकत्रित व्यवस्थापन आणि बाजारपेठेशी सामूहिक जोडणी केल्यास शेतीतील खर्च कमी करून उत्पन्नाच्या संधीत वाढ करता येते. याबाबतचे देखील मार्गदर्शन या प्रशिक्षणातून करण्यात आले. यावेळी मंडळ कृषी अधिकारी शुभम गटकळ, उप कृषी अधिकारी अलका बरकुल, कृषी सहाय्यक अधिकारी अधिक पानसरे, कृषी सहाय्यक अधिकारी सुषमा गायकवाड, विभावरी चव्हाण, सुरज घरत, बीटीएम नमिता वाकळे यांच्यासह मोठ्या संख्येने तालुक्यातील शेतकरी उपस्थित होते.

साडेचार लाखांचा मुद्देमाल जप्त

पनवेल : वावंजे येथील एस.एस. इंजिनिअरिंग कंपनीच्या गोदामातून ४ लाख ५० हजार रुपये किमतीचे १८० मशिन पार्ट्स चोरी करणाऱ्या तिघांना पोलिसांनी अटक केली आहे. त्यांच्याकडून चोरीचा मुद्देमाल तसेच गुन्ह्यात वापरलेली दोन वाहने असा एकूण १२ लाख २ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दि.१४ ते १७ ऑगस्टदरम्यान एस.एस. इंजिनिअरिंग कंपनीच्या गोदामात ठेवण्यात आलेले १८० मशिन पार्ट्स चोरीला गेल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात दाखल झाली होती. पोलिसांनी तांत्रिक तपासाच्या आधारे सापळा रचून मोहम्मद आलीम अली हसन मन्सुरी (४५), मोहम्मद इर्शाद अली हसन मन्सुरी (३३) आणि कैस अनवर पटेल (३२) यांना अटक केली. तसेच, आणखी काही चोरीचे गुन्हे देखील उघडकीस आले आहेत. त्यामध्ये विविध गुन्ह्यांतील एकूण ७ लाख २२ हजार रुपयांचा चोरीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. असा एकूण १२ लाख २ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

केंद्राकडे जाणारा फलक लागला

नागरिकांकडून 'कृषीवल'चे आभार व्यक्त

| कोलाड | प्रतिनिधी |

आंबेवाडी येथील प्राथमिक आरोग्य केंद्र नवीन जागेत स्थलांतरीत करण्यात आले आहे. परंतु, त्या ठिकाणी या केंद्राकडे जाण्यासाठी कोणतेही दिशादर्शक फलक नसल्याने रूग्णांना हे केंद्र शोधताना मोठी धावपळ करावी लागत होती. याबाबतची बातमी 'कृषीवल'ने प्रसिद्ध करताच संबंधित प्रशासनाला जागील आली असून, त्यांनी केंद्राचे नाव दर्शविणारा फलक लावला. त्यामुळे रूग्णांची मोठी गैरसोय दुर झाली असून, असंख्य नागरिकांनी 'कृषिवल'चे आभार मानले आहेत.

आंबेवाडी येथे प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत जिर्णावस्थेत असल्याने तिच्या दुरूस्तीचे काम काढण्यात आले आहे. त्यासाठी या इमारतीतील केंद्र दुसऱ्या ठिकाणी हलविण्यात आले आहे. हे नवीन केंद्र कोलाड-रोहा रस्त्यावरील मराठा पॅलेस समोर सुरू करण्यात आले आहे. पूर्वीचे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ठिकाणाची परिसरातील नागरिकांना माहिती होती. परंतु, हे केंद्र नवीन ठिकाणी आरोग्य केंद्र असल्याचे दिशा दर्शविणारा नामफलक अथवा दिशादर्शक फलक नसल्याने परिसरातील रूग्णांची मोठी गैरसोय होत होती. प्रथमच येणाऱ्या रुग्णांना आरोग्य केंद्र शोधण्यासाठी चौकशी करत जावे लागत होते. तसेच, अपघातग्रस्त नागरिकांना आरोग्य केंद्र शोधण्यासाठी धावपळ करावी लागत होती. त्याची बातमी 'कृषिवल'ने प्रकाशित केली आणि त्याची दखल संबंधितानकडून घेण्यात येऊन दिशा दर्शक फलक लावण्यात आले. त्यामुळे नागरिकांना होणारी गैरसोय दूर झाली आहे.

पनवेलमधून गांजा जप्त

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल शहर पोलिसांनी मालधक्का झोपडपट्टी परिसरात कारवाई करत एका तरुणाकडून तब्बल १ किलो २३६ ग्रॅम गांजा जप्त केला आहे. या गांजाची अंदाजे किंमत ६३ हजार रुपये असल्याची माहिती पोलिसांच्या नोंदीत नमूद करण्यात आली आहे. या प्रकरणी गणेश मनोज चव्हाण (३२) याला अटक करण्यात आली आहे. पनवेल रेल्वे स्टेशनच्या पाठीमागील मालधक्का झोपडपट्टी परिसरात ही कारवाई करण्यात आली. संशयिताकडून हिरवट पाने, फुले, काड्या व बिया असलेला ओलसर व उग्र वासाचा गांजा जप्त करण्यात आला.

वीज रोहित्राला वेली-झुडपांचा विळखा

कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

| चणेरा | प्रतिनिधी |

रोहा शहरातील अष्टमी येथील पेट्रोल पंपासमोरील महावितरणच्या रोहित्र्यासह शहरातील अनेक रोहित्र परिसरात मोठ्या प्रमाणात झाडे, वेली आणि झुडपे वाढल्याने बिघाड दुरुस्ती व देखभालीचे काम करताना वीज कर्मचाऱ्यांना मोठ्या अडथळ्यांचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे त्यांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

रोहा शहरासह परिसरातील वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी महावितरणचे कर्मचारी बिघाड दुरुस्ती, विद्युत वाहिन्यांची तपासणी आणि रोहित्रची देखभाल अशी कामे करतात. अनेकदा या कामासाठी कर्मचाऱ्यांना उंच विद्युत खांबांवर चढावे लागते. मात्र, खांब आणि रोहित्रच्या आजूबाजूला वाढलेली झाडे, झुडपे व वेली तसेच अस्वच्छ परिसरामुळे त्यांच्या कामात अडथळे निर्माण होत आहेत. विद्युत प्रवाहाचा धोका असतानाच वेलीमध्ये अडकणे, घसरून पडणे किंवा अन्य दुर्घटना घडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी महावितरणचे कर्मचारी प्रतिकूल परिस्थितीतही अहोरात्र आपले कर्तव्य बजावत असतात. त्यामुळे त्यांच्या सुरक्षेसाठी रोहित्र परिसर स्वच्छ आणि सुरक्षित ठेवणे अत्यावश्यक आहे.

ईव्हीएम विरोधात शेकापचे आंदोलन

| पनवेल | प्रतिनिधी |

शेतकरी कामगार पक्षाच्या शेतकरी विभागाचे अध्यक्ष अनिल ढवळे यांच्या नेतृत्वाखाली ईव्हीएम हटाओ सेनेने दि.१७ ते ३० ऑगस्ट दरम्यान नवी दिल्ली येथील जंतर मंतर मैदानावर आंदोलन सुरू केले आहे. दरम्यान, आंदोलकांनी दि.१७ ऑगस्ट रोजी ''ईव्हीएम हटाव, मोदी हटाव''च्या घोषणा देत जोरदार आंदोलन केले. या आंदोलनात सहभागी होण्यासाठी देशभरातून असंख्य आंदोलक जंतर मंतरवर आले होते. चार दिवस सुरू राहिलेल्या या आंदोलनाला चांगला प्रतिसाद लाभला.

संविधानातील आर्टिकल ३२८चा उपयोग करून आपआपल्या राज्यांतील मुख्यमंत्री विधानसभा निवडणुकीत बॅलेट पेपरचा उपयोग करू शकतात. २०२७ ला पंजाब, उत्तराखंड, उत्तरप्रदेश या राज्यात होणाऱ्या विधानसभा निवडणुका बॅलेट पेपरवर घेण्यात याव्यात, अशी मागणी इव्हीएम हटावो सेनेने प्रसिद्ध केलेल्या पत्रकात केली आहे. तसेच, ईव्हीएम हटवण्यासाठी प्रधानमंत्री आणि सर्व खासदारांना कोणत्याही इन्स्टाग्राम पोस्ट आणि सोशल मिडीयावरून संदेश पाठवावेत, असे आवाहन देखील ईव्हीएम हटावो सेनेने केले आहे. या आंदोलनात अनिल ढवळे यांच्यासह ईव्हीएम हटाओ सेनेचे शशांक आर्या, सचिन आर्या, सुधाकर लाड, नरेश भगत, विष्णू पाटील, मोहन गवंडी, जयेश पाटील, हर्षद पाटील आदी कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला होता.

धबधबा बंद झाल्याने पर्यटक नाराज

| नेरळ | प्रतिनिधी |

माथेरान येथील शार्लोट लेक तलाव पूर्ण भरून वाहू लागल्यानंतर त्या ठिकाणी धबधबा निर्माण होतो. हा धबधबा माथेरानमध्ये येणाऱ्या पर्यटकांचे सर्वाधिक गर्दीचे ठिकाण बनला आहे. दरम्यान, त्या तलावातील पाणी नगरपरिषदेने सोडून दिल्याने हे तलाव रिकामे झाले आहे. त्यामुळे धबधबा बंद झाला असून, तलावात पाणी नसल्याने पर्यटक प्रचंड हताश झाले आहेत. माथेरानमधील शार्लोट लेक तलाव पावसाळ्यात पर्यटकांनी भरून गेलेला असतो. हे

तलाव पाण्याने भरून वाहिल्यानंतर तेथे धबधबा निर्माण होतो आणि पर्यटक त्या धबधब्यावर वर्षा सहलीचा आनंद घेतात. मात्र, माथेरान नगरपरिषदेकडून दि.१० ऑगस्ट रोजी शार्लोट लेक मधील पाणी सोडण्यात आल्याने येथील धरणात पाण्याचा थेम्ब राहिलेला नाही. त्यामुळे त्यावरील धबधबा बंद पडला आहे. त्यामुळे त्या ठिकाणी येणारे पर्यटक नाराज होऊन निघून जात आहेत. त्यामुळे त्याचा सार्वधिक फटका तेथील व्यवसायिक यांना बसला आहे.

बसथांबे धोकादायक

| पाताळगंगा | प्रतिनिधी |

मुंबई-पुणे मार्गावरील तीन घर चौक परिसरातील अग्रवाल गोदामासमोर असलेले दोन्ही बाजूंचे बसथांबे सध्या असुरक्षित झाले आहेत. रस्त्यालगत असलेला उतार, मोठमोठे खड्डे, साचलेले दूषित पाणी आणि वाढलेल्या गवतामुळे या ठिकाणी अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे संबंधित विभागाने तातडीने लक्ष देऊन बस थांब्यांची स्वच्छता व परिसराची डागडुजी करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

पुलांच्या बांधकामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह

| माणगाव | प्रतिनिधी |

मुंबई-गोवा महामार्गावरील कोट्यवधी रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या माणगाव काळनदी व कळमजे येथील नव्या पुलांवर अवघ्या काही काळातच खड्डे आणि खचलेल्या भरावाची समस्या निर्माण झाली आहे. महामार्ग प्रशासनाकडून सध्या या खड्ड्यांना बुजवण्यासाठी ग्रिट माती टाकून ठिगळ लावले जात आहे. त्यामुळे नवीन पुलांच्या बांधकामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

माणगाव काळनदी पूल, कळमजे पूल आणि कशेडी-चोराडी पूल या तीन नवीन पुलांच्या बांधकामासाठी शासनाकडून तब्बल २३ कोटी ३६ लाख रुपयांची मंजुरी देण्यात आली होती. जानेवारी २०१९ मध्ये या कामांना मंजुरी मिळाल्यानंतर संबंधित ठेकेदाराला २४ फेब्रुवारी २०२२ रोजी कामाची वर्क ऑर्डर देण्यात आली. करारानुसार ही कामे १४ ऑगस्ट २०२३ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र, निर्धारित वेळेत कामे पूर्ण न झाल्याने ठेकेदाराला दंडासह पुन्हा मुदत वाढ देण्यात आली आणि अंतिम मुदत जून २०२६ पर्यंत वाढविण्यात आली. या तीनही पुलांची कामे एकाच ठेकेदाराकडे सोपविण्यात आली होती. त्यापैकी कशेडी येथील चोराडी पूल ३५ मीटर, माणगाव काळनदी वरील पूल १०५ मीटर, तर कळमजे नदीवरील पूल ३५ मीटर लांबीचा आहे. वेळेत काम पूर्ण न झाल्याने नागरिकांमध्ये नाराजी असतानाच पावसाळ्यापूर्वी घाईगडबडीत माणगाव काळ नदी आणि कळमजे येथील पुलांची कामे पूर्ण करण्यात आली. मात्र, काम पूर्ण होऊन काही काळ लोटत नाही तोच या नव्या पुलांच्या बांधकामाच्या गुणवत्ते बाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

रस्ता सुस्थितीत करण्याचा प्रयत्न | दरवर्षी टॅक्सी संघटनेकडून असा प्रयत्न

टॅक्सी चालकांनी भरले खड्डे

| नेरळ | प्रतिनिधी |

माथेरान येथे जाण्यासाठी एकमेव घाटरस्ता म्हणून नेरळ-माथेरान हा रस्ता आहे. माथेरान डोंगरात मोठ्या प्रमाणात पाऊस पडतो आणि त्यामुळे या घाटरस्त्यातील डांबरी रस्ता खराब होतो. त्यामुळे पर्यटक प्रवाशांची ने-आण करणाऱ्या टॅक्सी चालकांना रस्त्यातील खड्डे भरावे लागतात. दरम्यान, तब्बल तीन ते चार फुटाचा एकसंघ दगड भरून खड्डा भरण्याची कसरत केली आहे.

माथेरानमध्ये सर्वाधिक पर्यटक हे पावसाळ्यात येत असतात. माथेरान डोंगरात पावसाळ्यात ५००० मिली पाऊस होतो. शहरातील रस्ते आणि प्रामुख्याने घाटरस्ता जास्त पर्जन्यमानामुळे खराब होतो. त्यामुळे नेरळ-माथेरान टॅक्सी संघटनेचे टॅक्सिचालकांना रस्त्यावरील खड्डे अनेकदा भरावे लागतात. यावेळी घाटरस्त्यातील चांगभले मंदिर भागातील रस्ता सर्वाधिक खराब झाला आहे. त्या भागात पावसाचे पाणी रस्त्यातून

वाहत जात असल्याने रस्त्यावची दुरवस्था झाली आहे. या ठिकाणी वळणावर तीव्र उतार असून, त्याच ठिकाणी ३ फुटाचा खड्डा पडला आहे. त्यामुळे तो खड्डा भरण्यासाठी मालवाहू टेम्पोची मदत घ्यावी लागली. तब्बल तासभर टॅक्सी चालक हे दगड उचलून खड्डे भरण्याची कामे करीत होते. त्यांच्या सेवाभावी वृत्तीमुळे नेरळ-माथेरान घाटातून खासगी वाहनांचा देखील प्रवास सुखकर झाला आहे.

प्रशासनाने लक्ष घालण्याची गरज

माथेरानमध्ये दि.१५ ऑगस्ट रोजी किमान ५० हजार पर्यटक आले होते. तसेच, नगरपरिषदेच्या प्रवासी स्वच्छता कर येथे ४५ हजार पर्यटकांची नोंद झाली आहे. त्या एका दिवसात या सर्व पर्यटकांना नेरळ-माथेरानच्या टॅक्सी संघटनेच्या चालकांनी सेवा दिली आहे. परंतु, येथील घाटरस्त्यावरील खड्ड्यांमुळे चालकांसह पर्यटकांना नाहक त्रास सहन करावा लागला. त्यामुळे संबंधित प्रशासनाने लक्ष घालून नेरळ-माथेरान घाटरस्त्याच्या दुरूस्तीसाठी दरवर्षी प्रयत्न करावेत. त्यामुळे माथेरान हे पर्यटन स्थळ आणखी फुलून येईल आणि सर्वांना व्यवसाय मिळेल, असे नेरळ-माथेरान टॅक्सी संघटनेच्या टॅक्सिचालकांमधून बोलले जात आहे.

रंगीबेरंगी राख्यांनी बाजारपेठ सजली

| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |

रक्षाबंधन सणाला आता अवघे काही दिवस उरले असून, यंदा दि. २८ ऑगस्टला हा सण साजरा होणार आहे. त्यामुळे पनवेलच्या भाजी मार्केटसह विविध बाजारपेठांमध्ये रंगीबेरंगी आणि आकर्षक राख्यांची दुकाने सजली आहेत. लहान मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत प्रत्येकाच्या आवडीचा विचार करून विविध प्रकारच्या राख्या बाजारात दाखल झाल्या आहेत. पारंपरिक रेशमी धाग्याच्या राख्यांसोबतच आकर्षक डिझाइन, मोती, खडे, कार्टूनची चित्रे तसेच विविध रंगसंगती असलेल्या राख्या ग्राहकांचे लक्ष वेधून घेत आहेत. यंदाच्या राख्यांमध्ये लाईट लागणाऱ्या राख्या विशेष आकर्षण ठरत आहेत.

तसेच, काळ्या धाग्याच्या आणि काळे मणी असलेल्या राख्यांनाही ग्राहकांकडून पसंती मिळत आहे. रेशमी धाग्याच्या नाजूक राख्यांपासून ते आकर्षक डिझायनर राख्यांपर्यंत मोठी विविधता बाजारात पाहायला मिळत आहे. पूर्वीच्या काळात काळ्या गोंड्याच्या साध्या राख्या प्रामुख्याने पाहायला मिळत असत. मात्र, बदलत्या काळानुसार राख्यांच्या रूपातही मोठा बदल झाला आहे. पारंपरिकतेला आधुनिकतेची जोड देत बाजारात आता अनेक नवनवीन प्रकार उपलब्ध झाले आहेत.

निवडक

विविध क्षेत्रातील गुणवंतांचा सन्मान

चिरनेर : जनसेवेतून आनंद देणाऱ्या आणि शिक्षण क्षेत्रासह विविध सामाजिक क्षेत्रातील व्यक्तिमत्त्वांच्या गुणवत्तेसाठी कटिबद्ध राहणाऱ्या, उरण तालुक्यातील वशेणी इतिहास संपादकीय मंडळाचा आठवा वर्धापन दिन रविवारी (दि.२३) संपन्न होणार आहे. या निमित्ताने शिक्षण क्षेत्रासह विविध सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या वशेणी गावातील व्यक्तिमत्त्वांना जनसेवा पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात येणार आहे, अशी माहिती वशेणी इतिहास संपादकीय मंडळाचे कार्यवाह मच्छिंद्र म्हात्रे यांनी दिली. विशेषता: गेली सात वर्षे विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या आणि वशेणी गावाचे नाव उंचविणाऱ्या गुणवंत व्यक्तिमत्त्वांचा शोध घेऊन अशा व्यक्तिमत्त्वांचा वशेणी इतिहास संपादकीय मंडळातर्फे जनसेवा पुरस्कार देऊन, त्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. हा नियोजित कार्यक्रम रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील स्व. जगन्नाथ मरू म्हात्रे येथील सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. दरम्यान, जनसेवा पुरस्कार वितरणाचा मुख्य कार्यक्रम रविवारी दुपारी ३.०० वाजता सुरू करण्यात येईल. त्याआधी दुपारी १.०० ते २.१५ या वेळेत श्रोत्यांना भजनाच्या सुरावटी ऐकावयास मिळणार आहेत.

टेमपाले येथे रक्तदान शिबिराचे आयोजन

माणगाव : तालुक्यातील जमातुल मुस्लिमीन टेमपाले यांच्यावतीने ईद-ए-मिलाद-उन-नबी निमित्ताने व साबूसिद्धिक हॉस्पिटल मुंबई रक्तपेढी यांच्या सहकार्याने बुधवारी (दि.२६) सकाळी ८.३० ते सायंकाळी ४.०० या वेळेत जामा मस्जिद टेमपाले येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात जास्तीतजास्त रक्तदात्यांनी सहभाग घेऊन रक्तदान करावे असे अवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे. प्रेषित मोहम्मद पैगंबर यांचा जन्म दिवस म्हणून ईद-ए मिलाद साजरी केली जाते. या ईद निमित्त माणगाव तालुक्यातील टेमपाले येथील मुस्लिम बांधवानी एकत्रित येत आपण समाजाचे काहीतरी देणे करी लागतो हा उद्देश नजरेसमोर ठेऊन सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून सर्व धर्म समभाव मानून टेमपाले येथे रक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे.



प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या कामाला विलंब

खांदा कॉलनी : पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्रमांक १ मधील खिडुकपाडा, आसुडगाव आणि वाकडी या गावांमध्ये मंजूर करण्यात आलेल्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या कामांना होत असलेल्या विलंबाबाबत नगरसेवक शशिकांत शेलके यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. या आरोग्य केंद्रांची कामे तातडीने सुरू करून नागरिकांना स्थानिक पातळीवर आरोग्य सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी त्यांनी केली आहे.पनवेल महापालिका क्षेत्रात समाविष्ट झालेल्या या गावांमध्ये लोकसंख्या झपाट्याने वाढत असून कामगार, मध्यमवर्गीय तसेच स्थानिक भूमिपुत्रांची संख्या मोठी आहे. मात्र, अद्याप नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांची सुविधा पूर्ण क्षमतेने उपलब्ध नसल्याने नागरिकांना किरकोळ आजार, लहान मुलांचे लसीकरण तसेच प्राथमिक उपचारांसाठीही दूरच्या खासगी रुग्णालयांचा आधार घ्यावा लागत आहे. नागरिकांच्या आरोग्याशी थेट संबंधित विषय असल्याने प्रशासनाने विलंब न करता ठोस निर्णय घ्यावा. आरोग्य केंद्रे लवकरात लवकर सुरू झाल्यास परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळेल, अशी भूमिका शेलके यांनी मांडली आहे.

समर्थ पाटील यांच्या भजनाचा कार्यक्रम

अलिबाग : पुत्रदा एकादशी निमित्त पंढरपुर येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात रविवारी (दि.२३) सकाळी ११.०० वाजता अलिबाग येथील समर्थ पाटील यांच्या भजनाचा कार्यक्रम पार पडणार आहे. पंढरपूर येथील कर्मयोगी इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी या संस्थेने हा कार्यक्रम प्रायोजित केला आहे. या कार्यक्रमासाठी तबलासाथ जगदीश पाटील लोणारकर, पखवाजसाथ ओंकार म्हात्रे, तर गंगादेवी भजन मंडळ वायशेत हे कोरस म्हणून साथसंगत करणा आहेत. दरम्यान, या भजन सेवेची संधी मिळाल्याबद्दल समर्थ पाटील यांनी कर्मयोगी टेक्निकल इन्स्टिटयूट्यूटचे शिंदे, फुगे, देवडीकर तसेच देवस्थान कार्यकारिणी समितीचे आभार व्यक्त केले.

रानभाज्यांची लज्जतदार मेजवानी

पाली/बेणसे : श्रावण महिन्याचे आगमन होताच निसर्गाच्या कुशीत वसलेल्या सुधागड-पालीत निसर्गनिर्मित आरोग्यवर्धक रानभाज्यांची मोठी रेलचेल पाहायला मिळत आहे. श्रावणात मांसाहार वर्ज्य करून सात्विक आहाराला प्राधान्य दिले जात असल्याने आणि प्रत्येक दिवशी सण-उत्सवानुसार विशिष्ट भाजी खाण्याची परंपरा असल्याने बाजारात या रानभाज्यांना मोठी मागणी येत आहे. कोणत्याही खताशिवाय व कीटकनाशकाशिवाय पूर्णपणे नैसर्गिकरीत्या उगवणाऱ्या या भाज्या स्थानिक आदिवासी महिलांसाठी रोजगाराचे उत्तम साधन ठरत आहेत. दिवसानुसार रानभाज्यांचे महत्त्व व परंपरा आहे. श्रावणातील प्रत्येक दिवसाला विशिष्ट रानभाजीचे महत्त्व आहे. श्रावण सोमवारी कौला/कैला, शुक्रवारी जिवतीची फुले, तर शनिवारी राजगिरा, कुर्डू, कुळी, टाकळा व आम्ली यांची पंचभेळी भाजी केली जाते. ऋषीपंचमीला देठी, देवभात, भारंगी, शेंडवेल, पाथरी, रानअळू अशा अनेक भाज्यांची मिसळ, गौरीच्या दिवशी केनी व कुर्डू, बैलपोळ्याला चवळीच्या पानांचे मुठे आणि वसुबारसेला सुरण, आळूकंद व काशी कोहळा यांची भाजी करण्याची परंपरा आहे.

गणेशोत्सवात वाहतूक कोंडीचे विघ्न?

• १५ सप्टेंबरपर्यंत मार्गिका सुरू होणे अशक्य • ठेकेदाराच्या कामाच्या गतीवर प्रश्नचिन्ह

| माणगाव | प्रतिनिधी |

गणेशोत्सवाला अवघे काही दिवस शिल्लक असताना मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील माणगाव-इंदापूर बाह्यवळनाचा रखडलेला प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. सद्यस्थिती पाहता दि.१५ सप्टेंबरपर्यंत एकेरी वाहतूक सुरू होणेही अशक्यप्राय असल्याचे चित्र आहे. त्यामुळे यंदाही कोकणच्या दिशेने जाणाऱ्या लाखो गणेशभक्तांना वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे यंदाचे वर्षीही महामार्गावर वाहतूक कोंडीचे विघ्न अटळ आहे.

गेल्या काही काळात सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले, खासदार सुनील तटकरे, महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे तसेच पालकमंत्री भरत गोगावले यांनी महामार्ग व माणगाव बाह्यवळणाच्या कामाची पाहणी करून संबंधित ठेकेदाराकडून कामाचा आढावा घेतला. त्यावेळी गणेशोत्सवापूर्वी किमान एक मार्गिका सुरू करण्याच्या सूचना आणि आश्वासने देण्यात आली. खासदार सुनील तटकरे यांनी दिल्ली येथे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन माणगाव व इंदापूर बाह्यवळणाच्या अपूर्ण कामाकडे लक्ष वेधले. त्यामुळे यंदाच्या गणेशोत्सवात तरी कोकण वासीयांचा प्रवास सुकर होईल, अशी अपेक्षा निर्माण झाली होती. मात्र पाहणी दौरे, बैठका आणि आश्वासनांची रेलचेल सुरू असताना प्रत्यक्ष कामाची गती मात्र नागरिकांच्या अपेक्षे प्रमाणे वाढलेली दिसत नाही. बाह्यवळण मार्गावरील अनेक महत्त्वाची पुलांची कामे अद्याप अपूर्ण आहेत. काही ठिकाणी प्राथमिक स्वरूपाचे बांधकाम झाले असले तरी पुलांचे गर्डर, डेक स्लॅब, जोड रस्ते, मातीचा भराव आणि अंतिम रस्ते बांधणीची कामे बाकी असल्याचे दिसून येते. विशेषतः कोकण रेल्वे मार्गावरील उड्डाणपूल आणि कळमजे फाटा येथील गोधनदी वरील पुलाच्या कामाची गती हा गंभीर प्रश्न ठरत आहे. पुलांचे काम पूर्ण झाल्या नंतरही मोठ्या प्रमाणावर मातीचा भराव, त्याचे योग्य संपीडन, रस्त्याची पातळी निश्चित करणे, डांबरीकरण आणि वाहतुकीच्या दृष्टीने आवश्यक सुरक्षा व्यवस्था करावी लागणार आहे. त्यातच सध्या मुसळधार पावसाचा हंगाम सुरू असल्याने मोठ्या प्रमाणावर भराव व रस्ते बांधणीची कामे वेगाने पूर्ण करण्यास तांत्रिक अडचणी निर्माण होत आहेत.

त्यामुळे गेल्या १७ वर्षांपासून रखडलेल्या माणगाव-इंदापूर बाह्यवळण मार्गाबाबत केवळ तारखांवर तारखा मिळत असल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे. प्रत्येक वेळी नवीन मुदत, नवीन आश्वासन आणि नवीन पाहणी दौरा होतो. परंतु, प्रत्यक्षात मात्र बाह्यवळण वाहतुकीसाठी पूर्ण क्षमतेने खुला होण्याची तारीख पुढेच ढकलली जाते. त्यामुळे लोकप्रतिनिधींनी नुसते आश्वासन देण्यापेक्षा ठेकेदाराकडून प्रत्यक्ष काम करून घेणे अधिक महत्त्वाचे आहे. ठेकेदाराला कामाची मुदत २०२७ पर्यंत असल्याने गणेशोत्सवापूर्वी काम पूर्ण करण्याच्या घोषणा कितपत वास्तववादी आहेत, असा सवाल आता उपस्थित होत आहे.

लोकप्रतिनिधी ठेकेदारांच्या आश्वासनांवर विसंबून

माणगाव-इंदापूर बाह्यवळण हा केवळ रस्ता प्रकल्प नाही, तो कोकणातील लाखो नागरिकांच्या दैनंदिन प्रवासाशी जोडलेला प्रश्न आहे. १७ वर्षांच्या विलंबानंतरही जर प्रत्येक गणेशोत्सवा पूर्वी नव्या तारखा आणि नव्या घोषणा ऐकाव्या लागत असतील, तर या प्रकल्पाच्या नियोजनावर आणि देखरेखीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित होतो. लोकप्रतिनिधींनीही केवळ ठेकेदाराच्या आश्वासनांवर विसंबून न राहता कामाच्या प्रत्येक टप्प्याचे वस्तुनिष्ठ परीक्षण करणे गरजेचे आहे. तसेच, कामाची दिवसागणिक प्रगती तपासावी, अपूर्ण कामांची स्पष्ट यादी जाहीर करावी आणि गणेशोत्सवाच्या वाहतुकीसाठी ठोस पर्यायी नियोजन करावे. कारण या प्रकल्पाची जबाबदारी केवळ ठेकेदाराची नसून, नागरिकांना दिलेल्या आश्वासनांची राजकीय जबाबदारी लोकप्रतिनिधींचीही असल्याचे नागरिकांतून बोलले जात आहे.

खासदारांची उरणच्या ओएनजीसी प्रकल्पाला भेट

| चिरनेर | प्रतिनिधी |

पेट्रोलियम अ‍ॅण्ड नॅचरल गॅस संसदीय स्टॅण्डिंग कमिटीच्या ११ खासदारांनी शुक्रवारी (दि.२१) उरण येथील ओएनजीसी प्रकल्पाची पाहणी केली. प्रकल्पात वारंवार घडणाऱ्या तेल-गॅस गळती, आग, स्फोटासारख्या घटना याबाबत कमिटीने चिंता व्यक्त करताना अशा प्रकारच्या गंभीर घटना प्रकल्पात भविष्यात घडणार नाहीत याची दक्षता घेऊन तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या आहेत. उरण येथील ओएनजीसी प्रकल्पाचा शुक्रवारी पेट्रोलियम अ‍ॅण्ड नॅचरल गॅस संसदीय स्टॅण्डिंग कमिटीने अभ्यास दौरा केला. या दीड दोन तासांच्या अभ्यास दौऱ्यात ११ खासदार सहभागी झाले होते. कमिटीच्या ११ खासदारांनी प्रकल्पाची पाहणी करून कामकाजाचा आढावा घेतला. त्यानंतर कमिटीने रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे, उरण ओएनजीसी मुख्य प्रकल्प अधिकारी अरुण कुमार सिंह, विविध विभागाचे वरिष्ठ अधिकारी यांच्यासोबत झालेल्या बैठकीत पेट्रोलियम क्षेत्रावर जागतिक भू-राजकीय परिस्थितीचा प्रभाव व इतर विविध विषयावर चर्चा केली. उरण येथील ओएनजीसी प्रकल्पात तेल- गॅस गळती, आग, स्फोटासारख्या घटना वारंवार घडत आहेत.वारंवार घडणाऱ्या या गंभीर घटनांबाबत कमिटीने चिंता व्यक्त केली.

पनवेलमध्ये अनोळखी व्यक्तीचा मृत्यू

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल शहरातील टपाल नाका येथील महाराष्ट्र हॉटेलच्या मागील परिसरात एक अनोळखी व्यक्ती बेशुद्ध अवस्थेत आढळून आली. उपचारासाठी रुग्णालयात दाखल केल्यानंतर उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. या व्यक्तीचे वय अंदाजे ५५ ते ६० वर्षे असून, उंची सुमारे ५ फूट ४ इंच, रंग सावळा, चेहरा गोल, अंगाने सडपातळ, डोक्याचे केस बारीक, दाढी वाढलेली आणि पांढऱ्या रंगाची असून, अंगात नेसून काळ्या रंगाची फुल पॅन्ट व चॉकलेटी हाफ टी-शर्ट असा पोशाख आहे.

स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाची बैठक

| पनवेल | प्रतिनिधी |

स्वाभिमानी रिपब्लिकन पक्ष व युथ रिपब्लिकनच्या रायगड जिल्ह्यातील प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक कावळे येथे जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. महाड तालुकाध्यक्ष सुजित जाधव यांचे वडील, ज्येष्ठ बौद्धाचार्य तसेच कावळे गावचे माजी सरपंच गणेश सुदाम जाधव यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीनंतर महेश साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व कार्यकर्त्यांनी महाड येथील ऐतिहासिक चवदार तळ्याची पाहणी केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक चळवळीच्या इतिहासाशी निगडित असलेल्या या स्थळाला भेट देऊन कार्यकर्त्यांनी सामाजिक चळवळीच्या कार्याला अधिक बळ देण्याचा निर्धार व्यक्त केला. या बैठकीला जिल्हा कार्याध्यक्ष विजय धोत्रे, जिल्हा संघटक राजेश हाटे, अमित कांबळे, नितेश हाटे, सहयोग लोखंडे, संतोष कवितकर, सुजित जाधव, सुनील जाधव, भगवान साळवी, प्रशांत सोनवणे, निलेश कांबळे, भारत दाताड आदी उपस्थित होते.

संजय कदम यांना जीवनगौरव पुरस्कार

| पनवेल | प्रतिनिधी |

पत्रकारिता क्षेत्रातील प्रदीर्घ आणि उल्लेखनीय योगदानाची दखल घेत पनवेलचे ज्येष्ठ पत्रकार संजय कदम यांना ऑल जर्नालिस्ट अँड फ्रेंड्स सर्कलच्यावतीने मुंबई येथे आयोजित ''राज्यस्तरीय पत्रकार प्रेरणा पुरस्कार'' सोहळ्यात जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी ऑल जर्नालिस्ट अँड फ्रेंड्स सर्कलचे विश्वस्त गणेश कोळी व अ‍ॅड. मनोज म्हात्रे उपस्थित होते. संजय कदम यांनी पत्रकारिता क्षेत्रात अनेक वर्षे सातत्याने कार्य करत सामाजिक प्रश्न, जनसामान्यांच्या समस्या तसेच विविध सामाजिक आणि सार्वजनिक विषयांना आपल्या लेखणीतून प्रभावीपणे वाचा फोडली आहे. त्यांच्या पत्रकारितेतील योगदानाचा झालेला हा गौरव निश्चितच पनवेलच्या पत्रकारिता क्षेत्रासाठी अभिमानाची बाब आहे. या पुरस्कार सोहळ्यात राज्यभरातील पत्रकारिता आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या विविध मान्यवरांचा पुरस्कारांनी गौरव करण्यात आला. संजय कदम यांना मिळालेल्या जीवनगौरव पुरस्काराबद्दल त्यांच्यावर विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

नेरळमध्ये भटक्या कुत्र्यांचा उपद्रव

| नेरळ | प्रतिनिधी |

नेरळमध्ये भटक्या कुत्र्यांची संख्या आणि त्यांच्याकडून नागरिकांना, महिलांना तसेच लहान मुलांना चावा घेण्याच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी नेरळ विभागात प्राधान्याने श्वान नसबंदी कार्यक्रम राबवण्यात यावा, अशी मागणी रायगड जिल्हा परिषद सदस्या सुनिता मोरे यांनी केली आहे. सुनीता मोरे यांनी या संदर्भात अलिबागचे सभापती वैकुंठ पाटील यांची भेट घेऊन त्यांना निवेदनाद्वारे याबाबतची मागणी केली आहे.

रूट मार्चद्वारे सुरक्षिततेचा संदेश

| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |

पनवेल रेल्वे स्थानकात लोकल पकडण्याच्या घाईत प्रवाशांकडून रेल्वे रुळ ओलांडण्याचे प्रकार घडू नयेत, तसेच अपघाती मृत्यू व दुखापतींचे प्रमाण कमी व्हावे, यासाठी पनवेल रेल्वे पोलिसांकडून 'जीवन रक्षा अभियान' राबविण्यात आले. या मोहिमेदरम्यान प्रवाशांना रेल्वे रुळ ओलांडू नका, रेल्वे नियमांचे पालन करा आणि सुरक्षित प्रवास करा, असे आवाहन करण्यात आले. शुक्रवारी (दि.२१) सकाळी पनवेल रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक २ व ३ च्या सीएसएमटी बाजूला ही जनजागृती मोहीम राबविण्यात आली. लोकल पकडण्याच्या घाईत काही प्रवासी रेल्वे रुळ ओलांडून जाण्याचा प्रयत्न करतात. अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी रेल्वे पोलिसांनी मानव साखळी तसेच स्थानक परिसरात रूट मार्च आणि पोलिसिंग करून प्रवाशांचे लक्ष वेधले. या मोहिमेत ३ पोलीस उपनिरीक्षक, २८ पोलीस अंमलदार आणि १० होमगार्ड सहभागी झाले होते. 'अवाजवी धाडस टाळा, जीवन अनमोल आहे', 'लाइन क्रॉसिंग करू नका, घरी कोणीतरी तुमची वाट पाहत आहे', 'रेल्वेचे नियम पाळा, अपघात टाळा', 'वेळ वाचविण्यासाठी आयुष्य धोक्यात घालू नका', अशा संदेशांच्या माध्यमातून प्रवाशांना सुरक्षिततेचे महत्त्व पटवून देण्यात आले.

मॅरेथॉनला सुपरकॉप कृष्ण प्रकाश धावणार

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल महानगरपालिकेतर्फे आयोजित देशातील पहिल्या खारघर हिल महापौर मॅरेथॉनची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्पर्धेत प्रसिद्ध सुपरकॉप कृष्ण प्रकाश स्वतः सहभागी होणार असून, त्यांच्या उपस्थितीमुळे स्पर्धेची रंगत वाढली आहे. या मॅरेथॉनचे ब्रँड अ‍ॅम्बेसिडर म्हणून प्रसिद्ध मराठी अभिनेते अंकुश चौधरी असणार आहेत. देश-विदेशातून तब्बल ७ हजारांहून अधिक धावपटूंनी यासाठी नोंदणी केली आहे.

ही मॅरेथॉन केवळ एक स्पर्धा नसून खारघरच्या निसर्गरम्य टेकड्यांचा आणि आरोग्याचा उत्सव ठरणार आहे. ऑल इंडिया अ‍ॅथलेटिक्स फेडरेशन ऑफ इंडियाचे प्रतिष्ठेचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यामुळे या स्पर्धेला आंतरराष्ट्रीय दर्जा मिळाला आहे. या स्पर्धेचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे महापौर नितीन पाटील आणि सभागृह नेते प्रकाश बिनेदार यांच्या संकल्पनेतून १०० दिव्यांग बांधवदेखील यात सहभागी होणार आहेत. धावण्याची आवड असलेल्या दिव्यांगांना प्रोत्साहन देण्यासाठी हे विशेष व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले आहे. दरम्यान, २३ ऑगस्ट रोजी होणाऱ्या या मॅरेथॉनमुळे खारघर परिसरातील वाहतुकीत मोठे बदल करण्यात आले आहेत. खारघर वाहतूक शाखेकडून जारी करण्यात आलेल्या अधिसूचनेनुसार, सकाळी ०४:०० ते ११:०० या वेळेत काही रस्ते वाहतुकीसाठी बंद राहतील. पोलीस उपायुक्त डॉ. राहुल खाडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, ही स्पर्धा ३ किमी, ५ किमी, १० किमी, २१ किमी आणि ४२ किमी अशा पाच गटांत पार पडणार आहे.

अध्यक्षपदी चंद्रकांत भगत यांची निवड

| चणेरा | प्रतिनिधी |

वाशी ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या वाशी, महादेववाडी, लांढर व कारिवणे या गावांच्या तंटामुक्त समितीच्या अध्यक्षपदी सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणारे चंद्रकांत भगत यांची बिनविरोध निवड करण्यात आली. वाशी ग्रामपंचायतीच्या सरपंच वंदना वरगुडे यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत ही निवड करण्यात आली. यावेळी ग्रामसेवक तसेच ग्रामपंचायत सदस्य पांडुरंग हंबीर, अंतोष शिर्के, दिपाली धामणसे, हरिश्चंद्र मोरे, संदेश बामणे, नरेश कोकरे आदी उपस्थित होते. दरम्यान, चंद्रकांत भगत यांच्या बिनविरोध निवडीबद्दल वाशी ग्रामपंचायत हद्दीतील वाशी, महादेववाडी, लांढर व कारिवणे येथील ग्रामस्थ, पदाधिकारी व विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

स्वावलंबी अन् आत्मनिर्भर बनविण्याचे कार्य | दिव्यांग विद्यार्थ्यांनी बनवल्या १८ हजार राख्या

विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासाला नवी उभारी

| खरोशी | प्रतिनिधी |

विशेष विद्यार्थ्यांच्या अंगभूत कौशल्यांना योग्य दिशा देत त्यांना स्वावलंबी आणि आत्मनिर्भर बनविण्याचे कार्य आई डे केअर संस्था गेल्या १६ वर्षांपासून अविरतपणे करत आहे. संस्थेच्या व्होकेशनल सेंटरमधील विद्यार्थ्यांनी यावर्षीही आपल्या मेहनत, जिद्द आणि कौशल्याच्या जोरावर उल्लेखनीय कामगिरी केली आहे. यावेळी रक्षाबंधन सणाच्या पार्श्वभूमीवर विशेष विद्यार्थ्यांनी तब्बल १८ हजार राख्या तयार केल्या आहेत.

व्होकेशनल सेंटरमध्ये सध्या ४१ विद्यार्थी विविध प्रकारचे व्यावसायिक काम करतात. त्यापैकी १७ विद्यार्थी स्वतःच्या पायावर उभे राहिले असून, त्यांना दरमहा १ हजार ते ८ हजार रुपयांपर्यंत मानधन मिळते. आपल्या कष्टातून मिळणारे हे उत्पन्न विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासाला नवी उभारी देत असून, त्यांच्या कुटुंबालाही आर्थिक हातभार लागत आहे.

विद्यार्थ्यांची कामाविषयीची आवड आणि उत्साह विशेष कौतुकास्पद आहे. त्यातील एका विद्यार्थिनीची मेहनत विशेष उल्लेखनीय असून, ती दररोज तब्बल १०० ते ११० राख्या तयार करते. योग्य संधी, प्रशिक्षण आणि प्रोत्साहन मिळाल्यास विशेष विद्यार्थीही किती उत्तम कामगिरी करू शकतात, याचे हे प्रेरणादायी उदाहरण आहे. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या राख्या विविध देशांमध्ये अगदी सैनिकांसाठी सियाचीन येथे सुद्धा गेल्या आहेत. यावर्षी विद्यार्थ्यांनी सहा इंच आकाराच्या मातीच्या गणपतीच्या मूर्ती साच्यातून तयार करून त्यांना रंगविण्याचे काम सुरू केले आहे. शिकांत पवार, वंदना पवार, मनोज मेस्त्री, ज्योती मगदूम, सतीश ब्रीद, रवी ब्रीद, जितेंद्र नाले, विजय गोरेगावकर, खिरे, विनायक गोखले, महेंद्र मोहिते यांच्या रिलायन्सचा रिटायर्ड ग्रुप, जाणीव फाऊंडेशन आणि डॉ. यदुनाथ जोशी, मीरा जोशी न्यूट्रिशन फाऊंडेशन ट्रस्ट यांच्यातर्फे सियाचीन येथील सैनिकांना विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या राख्या पाठवण्यात आल्या. या सर्वांचे संस्थेला विशेष सहकार्य लाभत आहे. या स्वयंसेवकांमुळे विद्यार्थ्यांनी मेहनतीने तयार केलेल्या वस्तूंना ग्राहकांपर्यंत पोहोचण्यासाठी योग्य बाजारपेठ मिळत आहे.

> प्रत्येक विद्यार्थ्याची क्षमता आणि आवड लक्षात घेऊन त्यांना विविध कौशल्याचे प्रशिक्षण दिले जाते. विशेष शिक्षक, स्वयंसेवक, काळजीवाहक आणि समाजाच्या सहकार्यामुळे विशेष विद्यार्थ्यांच्या हाताला काम आणि त्यांच्या मेहनतीला योग्य मोबदला मिळण्याचा मार्ग खुला होत आहे. विशेष विद्यार्थ्यांना दया नव्हे, तर संधी, प्रशिक्षण आणि योग्य बाजारपेठ मिळणे गरजेचे आहे. त्यांच्या हातून तयार होणाऱ्या प्रत्येक वस्तूमध्ये त्यांची मेहनत, कौशल्य आणि आत्मविश्वास दडलेला आहे.
> – प्रेमलता पाटील, मुख्याध्यापिका

मोकाट गुरांचा विषय मार्गी लागणार

● मुदत संपताच होणार थेट लिलाव

| कोपोली | प्रतिनिधी |

श्रीवर्धन तालुक्यातील बोर्ली पंचतन आणि परिसरातील मोकाट गुरांचा आणि घोड्यांचा प्रश्न आता कायमचा निकाली निघणार आहे. दिघी सागरी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष आवटी, सुमित सावंत, श्रीकांत शेलार, महेंद्र पाटील, अमित पाटील व बोर्ली पंचतनमधील ग्रामस्थांची या गंभीर विषयावर अत्यंत सविस्तर व सर्वसमावेशक चर्चा झाली आहे. या बैठकीत केवळ कारवाईच नाही, तर अपघातांवर नियंत्रण मिळवण्यासाठी ठोस उपाययोजनाही निश्तित करण्यात आल्या असून शनिवारपासून या मोहिमेला प्रत्यक्ष सुरुवात केली आहे. या मोहिमेच्या संदर्भात प्रशासनाचा कडक इशारा देण्यात येणार आहे. ग्रामपंचायतींना अधिकृत पत्र आणि दोन दिवसांची अंतिम मुदत पोलीस प्रशासनामार्फत त्यांच्या हद्दीत येणाऱ्या प्रत्येक ग्रामपंचायतीला याविषयी लेखी पत्र दिले जाणार आहे. जे मोकाट गुरे व घोड्यांचे मालक आहेत, त्यांनी पुढील दोन दिवसांत आपली जनावरे स्वतःहून बांधून ठेवावीत किंवा घेऊन जावीत. दिलेल्या

मुदतीत मालक पुढे आले नाहीत, तर पोलीस प्रशासन आणि ग्रामपंचायत अत्यंत कठोर कायदेशीर पावले उचलणार आहे. दोन दिवसांनंतर रस्त्यावर किंवा मोकाट आढळणाऱ्या गुरांसाठी तात्पुरता कोंडवाडा तयार केला जाईल व सर्व जनावरे तिथे डांबली जातील. त्यानंतर हे प्रकरण थेट न्यायालयात नेण्यात येईल. संबंधित मालकाला त्याची गुरे सोडवून नेण्यासाठी कोर्टात जाऊन गुन्हा मान्य करावा लागेल, दंडाची रक्कम भरावी लागेल आणि गुरांच्या देखभालीचा झालेला संपूर्ण खर्च जमा करावा लागेल. त्यानंतरच गुरे सोडवली जातील. मुदतीनंतरही कोणी न आल्यास या गुरांची रवानगी गोशाळांमध्ये केली जाईल. मोकाट घोड्यांचा थेट अधिकृत लिलाव होणार आहे. गुरांप्रमाणेच तालुक्यात फिरणाऱ्या मोकाट घोड्यांवरही कडक कारवाईची कुऱ्हाड कोसळणार आहे. मोहिमे दरम्यान सर्व मोकाट घोडे पकडले जातील. वेळप्रसंगी पकडलेल्या या घोड्यांचा कोर्टामार्फत अधिकृत लिलाव करून हा विषय कायमचा मार्गी लावण्याचे ठोस नियोजन पोलीस प्रशासनाने केले आहे.

मोकाट जनावरांमुळे निर्माण झालेली समस्यारस्त्यांवर मोकाट फिरणाऱ्या जनावरांमुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे. रात्रीच्या वेळी जनावरे रस्त्यांवर बसत असल्याने वाहनचालकांना मोठा धोका निर्माण होत आहे. शेतकऱ्यांच्या पिकांचे अतोनात नुकसान होत असून यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप आहे.

बैठकीत ठरल्यानुसार जनावरांच्या मालकांना प्रथम नोटीस देऊन जनावरे बांधून ठेवण्याची सक्त ताकीद दिली जाईल. सूचना देऊनही दुर्लक्ष करणाऱ्या मालकांवर कायदेशीर गुन्हे दाखल केले जातील. मोकाट जनावरे आढळल्यास त्यांच्या मालकांकडून दंडात्मक व कायदेशीर पावले उचलली जातील.

पोलीस प्रशासनाकडून मोकाट गुरांच्या बंदोबस्तासाठी आता अत्यंत आक्रमक आणि कडक पावले उचलली जात असून दोन दिवसांची अंतिम मुदत देण्यात आली आहे. ग्रामपंचायतींना अधिकृत पत्र व्यवहारदिघी सागरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील प्रत्येक ग्रामपंचायतीला पोलीस प्रशासनामार्फत लेखी पत्र पाठवले जाणार आहे. ग्रामपंचायत स्तरावर दवंडी किंवा जाहीर सूचनेद्वारे गुरांच्या मालकांना तातडीने अवगत करण्यात येईल असे सागण्यात आले आहे.

अपघात रोखण्यासाठी 'रेडियम बेल्ट'चे कवच

रात्रीच्या वेळी अंधारात जनावरे रस्त्यावर बसल्यामुळे होणारे भीषण अपघात आणि गुरांची होणारी जीवितहानी टाळण्यासाठी एक कौतुकास्पद उपाय शोधण्यात आला आहे. यासाठी ऋषिकेशजी गोळे यांनी विशेष पुढाकार घेऊन स्वखर्चातून १००० रेडियम बेल्ट मागवले आहेत. हे बेल्ट गुरांच्या गळ्यात लावण्यात येणार आहेत, जेणेकरून रात्रीच्या वेळी वाहनचालकांना जनावरे दुरूनच स्पष्ट दिसतील आणि अपघात टळतील.

काशिनाथ वातेरे यांची तंटामुक्त अध्यक्षपदी निवड

| खांब | प्रतिनिधी |

सामाजिक, कृषी, धार्मिक, तसेच सांस्कृतिक क्षेत्रात सातत्याने सक्रिय राहून समाजहितासाठी योगदान देणारे रोहा तालुक्यातील वैजनाथ गावचे रहिवासी काशिनाथ गणपत वातेरे यांची खांब ग्रा. पंचायतीच्या महात्मा गांधी तंटामुक्त गाव समितीच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. खांब ग्रा.पंचायत कार्यालयात संपन्न झालेल्या सभेत त्यांची निवड करण्यात आली आहे. यावेळी माजी सरपंच रामचंद्र चितळकर, प्रकाश थिटे, मनोज शिर्के, सुरेखा पार्टे, चंद्रकांत जाधव, मानसी चितळकर, रंजना टवळे, कांचन मोहिते, केशव खामकर, दत्ताराम चितळकर, सुरेश चोरगे, राकेश महाबळे, मनोज सावरकर, कल्पेश माने, सदानंद जाधव, किशोर सावरकर, दिनेश निकम आदी उपस्थित होते.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२२ ऑगस्ट

१) श्री.सुरेश परशुराम पित्रे अलिबाग, २२-८-१९५२

२) श्री.विलास विठोबा अलिबागकर मु.वरसोली, अलिबाग, २२-८-१९५४

कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते

कुमुद कमलाकर म्हात्रे , स्मृतीदिन, कांदिवली (गावठान)

जितेंद्र इंगळे-पाटील उपजिल्हाधिकारी पदी

नवीन पनवेल : पनवेलचे अपर तहसीलदार जितेंद्र इंगळे-पाटील यांची उपजिल्हाधिकारी पदी बढती करण्यात आली आहे. उपजिल्हाधिकारी पदी बढती मिळाल्याबद्दल त्यांचे विविध क्षेत्रातून अभिनंदन केले जात आहे. इंगळे त्यांनी कागल, बागलन, वैजापूर, किनवट येथे तहसीलदार म्हणून काम पाहिले आहे. पनवेलमध्ये गेल्या काही वर्षांपासून ते अपर तहसीलदार म्हणून कार्यरत आहेत. २० ऑगस्ट रोजी त्यांची उपजिल्हाधिकारी म्हणून बढती करण्यात आली.

मुरूडमध्ये 'हिरकणी कक्षाचे' उद्घाटन

| आगरदांडा| प्रतिनिधी |

मुरूड एसटी डेपोमध्ये महिलांना प्रवासादरम्यान बाळाला सुरक्षित आणि आरामदायी वातावरणात स्तनपान करता यावे, यासाठी महाराष्ट्र शासनाने मुरूड एसटी डेपोमध्ये हिरकणी कक्ष उपलब्ध करून देण्याचा घेतलेला निर्णय अत्यंत स्वागतार्ह आहे असे मुरूड प्रवासी संघटनाचे अध्यक्ष श्रीकांत सुर्वे यांनी मुरूड एसटी डेपोत हिरकणी कक्षाचे उद्घाटन कार्यक्रमावेळी बोलत होते. यावेळी मुरूड तालुका प्रवासी संघटना अध्यक्ष श्रीकांत सुर्वे, कुणाल सतविडकर, अरविंद गायकर, आगार व्यवस्थापक चिन्मय अंबावकर, प्रकाश दांडेकर, विशाल कोलवणकर, माझीद हुसेनी, मंगेश पाटील, समिधा मुकादम, आशपाक जमादार, चंद्रकांत कारभारी, दिलीप फुगांवकर, शाईश कारभारी, अक्षय भोईर उपस्थित होते.

आयुष हॉस्पिटलतर्फे आरोग्य शिबीर

कोर्लई : नांदगावच्या आयुष हॉस्पिटलतर्फे मुरुड तालुका पंचायत समितीत आयोजित करण्यात आलेल्या सर्वसमावेशक आरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या आरोग्य शिबिरात १०० हून अधिक रुग्ण व त्यांच्या कुटुंबियांची तपासणी करण्यात येऊन गरजू रुग्णांना मोफत औषधांचे वाटप करण्यात आले. या आरोग्य शिबिराला गटविकास अधिकारी, सभापती, उपसभापती, विस्तार अधिकारी, शिक्षणाधिकारी, वन विभागाचे अधिकारी व कर्मचारी, यांच्यासह आसपासच्या गावांतील अनेक नागरिकांनी शिबिराचा लाभ घेतला.

जांभूळपाड्यात कचऱ्याचे साम्राज्य

| पाली | प्रतिनिधी |

जांभूळपाडा येथे कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असून गावातील विविध ठिकाणी कचऱ्याचे ढीग साचल्याचे चित्र आहे. काही नागरिकांकडून अंबा नदीच्या पात्रातच कचरा टाकला जात असल्याने नदीचे पाणी प्रदूषित होण्याचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीने तातडीने कचरा व्यवस्थापनाची ठोस व्यवस्था करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

दरम्यान, मारुती देवस्थानने व्यायामशाळेच्या बाजूला खोदलेल्या खड्ड्यात सांडपाणी साचत असून त्यावर मोठ्या प्रमाणात डासांची उत्पत्ती होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे व्यायामशाळेत येणाऱ्या युवकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. याबाबत आरोग्य विभागाला माहिती देण्यात आली असल्याचे सांगण्यात येत असले, तरी अद्याप संबंधित ठिकाणी ठोस कारवाई झालेली नसल्याची युवकांची तक्रार आहे.

विशेष म्हणजे, इतर गावांमध्ये नदीपात्रात कचरा टाकला जात असल्यास त्याविरोधात आवाज उठविणारेच स्वतःच्या गावात नदीपात्रात कचरा टाकत असल्याने लोका सांगे ब्रह्मज्ञान, आपण कोरडे पाषाण अशी परिस्थिती निर्माण झाल्याची चर्चा ग्रामस्थांमध्ये आहे. ग्रामपंचायतीकडे कचरा संकलन, वर्गीकरण व विल्हेवाटीसाठी ठोस योजना नसल्यामुळे काही नागरिकांकडून निषेध म्हणून जागोजागी कचरा टाकला जात असल्याचेही बोलले जात आहे.

कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न ग्रामपंचायतीसमोर मांडण्याऐवजी नागरिकांनीच सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे सुरू ठेवल्यास त्याचा फटका अखेरीस गावकऱ्यांच्याच आरोग्याला बसणार आहे. कचऱ्यामुळे मोकाट जनावरे व भटक्या कुत्र्यांना सहज खाद्य मिळत असल्याने त्यांची संख्याही परिसरात वाढत असल्याची नागरिकांची चर्चा आहे. या परिस्थितीवर ग्रामपंचायतीने तातडीने उपाययोजना करून नियमित कचरा संकलन, योग्य विल्हेवाट, नदीपात्राची स्वच्छता आणि सांडपाण्याची व्यवस्था करावी, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

साप्ताहिक राशिभविष्य दि. २३ ते २९ ऑगस्ट २०२६

ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग
मोबा.९४०४७९१७९८

माणसे ओळखायला शिका

मेष : राशीधारकांनी या सप्ताहात आपल्या तत्वाला थोडी मुरड घालावी लागेल. जवळचा प्रवास करताना आरोग्याची काळजी घ्या. अकल्पित घटनांना धिटाईने सामोरे जा. कार्यक्षेत्रात नवीन अधिकार मिळतील. आततायीपणा करून चालणार नाही. बोलण्यात खंबीरपणा ठेवावा. तुमच्याबाबत इतरांचा गैरसमज होऊ शकतो. मित्रांची संगत तपासून पहा. आवडत्या व्यक्तीची भेट होईल. काही निर्णयासाठी थांबावे लागेल. वरिष्ठांचा पाठिंबा मिळेल. व्यापारी वर्गाला भागिदारीतून लाभ मिळेल. जोडीदाराचे सक्रिय सहकार्य मिळेल. जोडीदाराच्या मताचा विचार करा. आळसात दिवस ढकलू नका. नवीन ओळखीचा लाभ होईल. दैनंदिन कामात चिकाटी बाळगा. डोके शांत ठेवून काम करावे. नेटाने व्यायाम करावा. मन चंचल राहील. व्यापारी वर्गाला चांगला लाभ होईल. माणसे ओळखायला शिकावे. अधिकाराचा वापर योग्य ठिकाणी करावा. **महिलांना:** भावनिक विचार करू नका. कौटुंबिक सौख्य लाभेल. कुटुंबातील सदस्यांचे मत जाणून घ्या. मानसिक संतुलन बिघडू देऊ नका. आहारावर नियंत्रण ठेवावे. **शुभ दिनांक :** २३,२४.

प्रलंबित कामे पूर्ण करा

वृषभ : राशीसाठी या सप्ताहात आपले दिवस आनंदात जाणार आहेत. लहान प्रवासाची शक्यता आहे. लांबवर जाणे टाळा, मार्गदर्शक व्यक्तींच्या भेटीचा योग आहे याचा चांगला फायदा होईल. कामातील तांत्रिक बाबी जाणून घ्याल. कोणतेही व्यवहार करताना सर्व गोष्टींची खातरजमा करावी. आपल्याला कुटुंबात अधिकार प्राप्त होईल. चांगल्या गोष्टीसाठी पैसा खर्च होईल. व्यवसाय वाढीसाठी तज्ञांचा सल्ला घ्या. महिला सहकाऱ्यांची उत्तम साथ मिळेल. नवीन गोष्टी जाणून घेता येतील. जोडीदाराच्या सद्गुणांनी आनंद मिळेल. कर्ज फेडीचे एक पाऊल पुढे टाकाल. कामाच्या ठिकाणी तुमचा सल्ला मोलाचा ठरेल. तुमच्या सूचनांचे स्वागत केले जाईल. आरोग्याची काळजी घ्यावी. आपल्या माणुसकीची इतरांना कल्पना येईल. धडपड्या वृत्तीवर संयम ठेवावा. आहारावर नियंत्रण ठेवावे. प्रलंबित कामे पूर्ण करावीत. जुन्या मित्रमंडळींशी संवाद होईल. **महिलांना:** आपल्या वागणुकीने वाहवा मिळवाल. जोडीदाराचा सल्ला मोलाचा ठरेल. आर्थिक लाभाचे योग आहेत. हा साप्ताह चांगला जाईल. मानसिक प्रसन्नता लाभेल. **शुभ दिनांक:** २५,२६.

धन संचयात वाढ होईल

मिथुन : राशीसाठी या सप्ताहात मनाची चंचलता वाढू शकते. पूजा-अर्चामध्ये मन रमवाल. आपल्या प्रगल्भ बुद्धिमत्तेचा वापर करा. जवळच्या प्रवासाचा योग येईल. मिळकतीत वाढ होण्याची शक्यता. स्वतःच्या हिंमतीवर विश्वास ठेवा. भागीदारीच्या व्यवसायात वाढ करता येईल. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. कामाची योग्य पावती मिळेल. धन संचयात वाढ होईल. प्रलंबित कामे सामोरी येतील. भावनात्मक विचार करू नका. चुकीच्या गोष्टींना खत-पाणी घालू नका. दिवस धावपळीत जाईल. कष्टाला पर्याय नाही. देणी चुकती करावी लागतील. विद्यार्थ्यांची कामे मार्गी लागतील. पत्नीचे उत्तम सहकार्य मिळेल. कामाचा फार ताण घेऊ नका. विरोधक नरमाईचे धोरण स्वीकारतील. बुद्धिमत्तेचा कस लागू शकतो. मनातील इच्छा पूर्णत्वास न्याल. एकाच गोष्टीवर अडकून राहू नका. मित्रांची मदत लागेल. **महिलांना:** मानापमानाच्या प्रसंगाकडे दुर्लक्ष करा. सासरच्या व्यक्तींकडून लाभ संभवतो. बोलण्यावर मात्र, नियंत्रण ठेवावे म्हणजे गैरसमज होणार नाहीत. प्रकृतीस्वास्थ्य जपा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. **शुभ दिनांक :** २७,२८.

कामाचे कौतुक होईल

कर्क : राशीधारकास या सप्ताहात जोडीदाराचा वरचष्मा राहील. हातातील अधिकाराने कामे पूर्णत्वास जातील. अधिकाऱ्यांच्या सल्ल्याने वागावे. फक्त कामावर लक्ष केन्द्रित करा. काही गोष्टींची तडजोड करावी लागेल. कामाचा मनापासून आनंद घ्याल. सरकारी कामे पुढे सरकतील. तरुण वर्गाकडून नवीन शिकावयास मिळेल. इतरांच्या आनंदात सहभागी व्हाल. सहकाऱ्यांकडून फार अपेक्षा बाळगू नका. दृष्टीकोनात बदल करून पहावा. सामाजिक प्रतिष्ठा जपा. शेअर्समधून लाभ संभवतो. मैदानी खेळाची आवड निर्माण होईल. आर्थिक लाभावर लक्ष केन्द्रित करा. पत्नीशी वाद वाढवू नका. मुलांची बाजू जाणून घ्या. तुमच्या कामाचे कौतुक केले जाईल. तुमची प्रगती इतरांच्या नजरेत खुपू शकते. जवळच्या प्रवासात काळजी घ्यावी. इतरांचा विश्वास कमवावा. भावंडांशी मतभेदाची शक्यता. नवीन संधीकडे बारकाईने लक्ष ठेवा. **महिलांना :** सासरच्या मंडळींकडून लाभ होईल. वादाचे मुद्दे टाळावेत. सौम्य शब्दांत मत मांडा. प्रेम-प्रकरणात सबुरीने वागा. राजकीय क्षेत्रातून लाभ संभवतो. अति तिखट पदार्थ खाऊ नका. करमणुकीत जास्त वेळ घालवाल. **शुभ दिनांक :** २४,२९.

खर्चाची तरतूद करून ठेवा

सिंह : राशीसाठी ह्या आठवड्यात आपण व्यवसाय व संबंधात समतोल साधण्यात यशस्वी व्हाल. स्वभावात थोडा उग्रपणा राहण्याची शक्यता असल्याने संयमित राहण्याचा सल्ला देण्यात येत आहे. ग्रहस्थिती आपल्या व्यापार व व्यवसायास अनुकूल असून आपणास काही फायदा मिळवून देणारी आहे. कष्टाचे फळ मिळत असल्याचे आपणास जाणवेल व अनेक दिवसांपासून जो नफा मिळण्याची अपेक्षा आपण बाळगून आहात ती पूर्णत्वास जाईल. आपण जोमाने पुढील वाटचाल कराल. आर्थिक नियोजनात काहीशी अनिश्चितता निर्माण होणार असल्याने खर्चाची तरतूद करून ठेवावी. हा कालावधी विद्यार्थ्यांसाठी आशादायी आहे. मात्र, प्रवेश किंवा भावी अभ्यासा विषयी निर्णय घेताना काहीसा असमंजसपणा असल्याचे दिसून येईल. आठवड्याच्या सुरुवातीस समाजात आपली विशेष ओळख निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील राहाल. आठवड्याच्या उत्तरार्धात प्रणयी जीवनाकडे आपला कल अधिक होईल. **महिलांना :** या आठवड्यात ध्यान धारणा, प्राणायाम आादींशी संबंधित पद्धतीचा वापर करून आपण रोगमुक्त होऊ शकाल. **शुभ दिनांक :** २७,२८.

दैनंदिन कामे पूर्ण करा

कन्या : राशीसाठी आपले ग्रहमान सुरुवातीस आपल्या व्यावसायिक जीवनात नवीन आव्हाने आल्याने आपली दैनंदिन कामे पूर्ण करण्यासाठी आपणास अधिक परिश्रम करावे लागतील. शक्यतो दुसऱ्या दिवसाच्या दुपारपर्यंत कोणताही महत्वाचा निर्णय घेऊ नये. आठवड्याच्या अखेरीस कामाच्या ठिकाणी आपल्या कामगिरीत सुधारणा होईल. प्रत्येक साहस करण्यात प्रगतीच होईल. भागीदारी व संयुक्त कामांच्या बाबतीत घाईघाईत कोणताही निर्णय न घेण्याचा सल्ला देण्यात येत आहे. आठवड्याच्या सुरवातीस शाळेतील मुलांना अभ्यासात अडचणी व विघ्न आल्याने थोडे नैराश्य येईल. आपण लक्ष केंद्रित करून दृढ मनोबलाने काम केल्यासच आपणास अपेक्षित परिणाम प्राप्त होण्याची शक्यता आहे. उत्तरार्धात अभ्यासात आपण अधिक लक्ष घालू शकाल. व्यवसाईक संबंधाच्या बाबतीत सुरुवात जरी चांगली नसली तरी नंतर त्यात सुधारणा होऊ लागेल. **महिलांना :** वैवाहिक जोडीदाराशी वार्तालाप करून आनंदित व्हाल. प्रणयी जीवनात आपली सक्रियता वाढली तरी आपल्या जोडीदारास थोडा अवधी द्यावा. **शुभ दिनांक :** २३,२९.

कामाचे नियोजन करा

तुळ : राशीसाठी आपले ग्रहमान आरोग्याच्या दृष्टीने आठवड्याची सुरुवात प्रतिकूल असल्याने आरोग्याकडे दुर्लक्ष न करण्याचा सल्ला देण्यात येत आहे. असे असले तरी प्रकृतीत टप्प्या टप्प्याने सुधारणा होऊन उत्तरार्ध आपण आनंदात घालवू शकाल. त्यासाठी आठवड्याच्या सुरुवातीस व्यायाम व आहारातील पथ्य पाळून आरोग्य टिकवून ठेवू शकाल. आठवड्याच्या शेवटच्या टप्प्यात आप्तांसह एखाद्या ठिकाणी फिरावयास जाऊ शकाल. आपल्या काही संवयी दूर करण्यात आपण यशस्वी व्हाल. कौटुंबिक जीवनात सुद्धा बदल घडवून आणण्यासाठी हा आठवडा महत्वाचा आहे. हा आठवडा अधिक नियोजनपूर्वक काम करण्यासाठी उत्तम आहे. वैवाहिक जोडीदाराशी अर्थपूर्ण चर्चा करून समस्यांचे निराकरण होऊ शकेल. **महिलांना :** वैवाहिक जोडीदाराची साथ मिळेल. प्रकृती जपा. मनातील इच्छा पूर्ण होईल. आर्थिक बाजू ठीक राहील. जोडीदाराची साथ मिळेल. पालकांचा सल्ला मोलाचा ठरेल. गूढ गोष्टींबद्दल कुतुहल निर्माण होईल. हातून सत्कर्म घडेल. गृहोपयोगी वस्तूंची खरेदी कराल. आर्थिक व्यवहार जपून करावेत. **शुभ दिनांक :** २४,२८.

तज्ञ व्यक्तीचे मार्गदर्शन घ्या

वृश्चिक : राशीसाठी या आठवड्याची सुरुवात आपण सकारात्मक ऊर्जा व वैचारिक नावीन्याने कराल. पहिल्या दिवशी आपला आत्मविश्वास वाढण्यास मदतरूप ठरेल. काही लाभ होण्याची अपेक्षा सुद्धा आपण बाळगू शकता. असे असले तरी दुसऱ्या दिवसापासून ग्रहस्थितीत होणाऱ्या बदलामुळे पूर्वार्धात व्यक्तीगत व व्यावसायिक जीवनात समतोल साधताना आपणास संघर्ष करावा लागेल. उत्तरार्धात कुटुंबीय व वैवाहिक जोडीदार यांच्यासह सलोख्याच्या संबंधांचा आनंद लुटू शकाल. पूर्वार्धात काही अडचणी आल्या तरी प्रणयी जीवनात संबंधांचे सौख्य उपभोगू शकाल. आठवड्याच्या दुसऱ्या व तिसऱ्या दिवशी आपली प्रकृती काहीशी नाजूक होण्याची शक्यता असल्याने काळजी घ्यावी. या दरम्यान शक्य असल्यास नियमितपणे योगासन व व्यायाम करण्याची सवय लावून घ्यावी. **महिलांना :** आपण तज्ञ व्यक्तीचे मार्गदर्शन घ्यावे, कि जेणे करून आपले आरोग्य उत्तम राहू शकेल. पूर्वार्धात आपली चंचलता वाढली तरी उत्तरार्धात मनशांती होणारे प्रसंग घडणार आहेत, घरात वर्दळ राहणार आहे. **शुभ दिनांक :**२५,२७.

आत्मविश्वासाने वाटचाल करा

धनु : राशीसाठी या आठवड्याच्या सुरुवातीस आपण व्यावसायिक गोष्टींकडे अधिक लक्ष द्याल. आपण उत्साहित राहाल. वाणीचे प्रभुत्व असणाऱ्या क्षेत्रात आपली कामगिरी उत्तम होईल. पूर्वार्धात आपली थकबाकी मिळाल्याने आपली बँकेतील गंगाजळी वाढण्याची शक्यता सुद्धा आहे. आठवड्याच्या मध्यास परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यास शिकावे लागेल. एखाद दुसऱ्या समस्येमुळे आपली शांतता भंग होऊ शकेल. प्रसंगानुसार आपणास कंटाळा किंवा आळस येण्याची शक्यता सुद्धा आहे. आठवड्याच्या उत्तरार्धात एखादे साहस करण्यात यशस्वी झाल्याने आपण आनंदित व्हाल. उत्तरार्धात ग्रहस्थिती आपणास अनुकूल राहिल्याने कोणत्याही कामाचे नियोजन करून त्याची अंमल बजावणी ठामपणे करू शकाल. आता आपणास चिंतामुक्त होऊन आत्मविश्वासाने वाटचाल करता येईल. **महिलांना :** तुम्हाला तुमच्या जवळच्या लोकांपासून लांब जावे लागू शकते. तुमच्या कुटुंबात काही शुभ कार्य होण्याची ही शक्यता आहे. प्रकृतीस्वास्थ्य जपा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. वैवाहिक जोडीदाराशी सामंजस्याने वागावे. **शुभ दिनांक :** २६, २९.

स्वतःसाठी खर्च करा

मकर : राशीसाठी या आठवड्याच्या सुरुवातीपासूनच आपण कामाकडे अधिक लक्ष देऊ लागाल, ज्यात आपला दृष्टिकोन व बरेचसे विचार हे कारकिर्दी केंद्रित असतील. सध्या दूरवरच्या कार्याशी संबंधित असलेल्या व्यक्ती काही निर्णय जलदगतीने घेऊ शकतील. नोकरी करणाऱ्यांना वरिष्ठांशी सलोखा निर्माण होऊन कारकिर्दीत प्रगती साधण्यासाठी त्यांचे पूर्ण सहकार्य व मार्गदर्शन सुद्धा मिळेल. या दरम्यान आपल्या चेहेऱ्यावरील तेज वाढेल व प्राप्तीत वाढ होत असताना स्वतःसाठी खर्च करण्याकडे सुद्धा आपण अधिक लक्ष देण्याची शक्यता आहे. या खर्चात वस्त्रे, आभूषणे किंवा आपल्या गरजेच्या वस्तूंची खरेदी किंवा गुंतवणूक सुद्धा असू शकते. व्यावसायिक आघाडीवर गुंतवणूक करताना अति विचार करण्याच्या नादात हाती आलेली संधी निसटून जाणार नाही ह्याची काळजी घ्यावी. स्पर्धेत आपण यशस्वी होऊ शकाल. **महिलांना :** आरोग्य उत्तम राहील. तरीही मेजवानी पासून लांब रहा अन्यथा पोटाचे विकार त्रस्त करू शकतात. महिलावर्गाला त्यांच्या कला क्षेत्रात अधिक वाव मिळेल. **शुभ दिनांक :** २४,२५.

विचार पूर्वकगुंतवणूक करा

कुंभ : राशीसाठी या सप्ताहातील ग्रहमान पाहता वित्तीय गोष्टींमध्ये तुम्हाला काही संघर्ष करावे लागू शकतात आणि दुसरीकडे खर्चात वृद्धी होईल, तथापि आपल्या बचतीवर लक्ष द्या आणि धन संबंधित गुंतवणूक विचार पूर्वक करा. प्रेमासंबंधी आपल्या राशीच्या मंडळींना सबुरीचा सल्ला देण्यात येत आहे. आपण समाजात मिसळण्याची इच्छा व्यक्त कराल ती फलद्रूप होईल. आपल्या खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. प्रकृती जपा. हाती घेतलेली कामे पार पाडू शकाल. कलाक्षेत्राला उत्तम प्रतिसाद मिळेल, विशेषतः कामात आपला स्वार्थ न बघता इतरांकडे बघण्याचा दृष्टिकोन ठेवल्यास त्याचा आनंद घेऊ शकाल. आप्तेष्टांच्या संपर्कात राहता येईल व त्यांची ख्याली-खुशाली घेता येईल. आर्थिक बाजू ठीक राहील. कौटुंबिक वातावरण बिघडू देऊ नका. विद्यार्थ्यांसाठी पूर्वार्ध अनुकूल आहे, मात्र, उत्तरार्धात चंचलता वाढल्याने अभ्यासाकडे थोडे दुर्लक्ष होईल. **महिलांना :** आठवड्याच्या अखेरच्या तीन दिवसात आरोग्याची अधिक काळजी घ्यावी लागेल. हातात पैसे खेळते राहतील चणचण दूर करू शकाल. **शुभ दिनांक :** २६,२७.

कामाची प्रशंसा होईल

मीन : राशीसाठी आपल्याला या आठवड्याच्या सुरुवातीस आपणास बेचैनी जाणवेल. सुरुवातीच्या दोन दिवसात खर्चात वाढ होण्याच्या शक्यतेमुळे खर्च विचारपूर्वक करावा. वैचारिक वादळांवर नियंत्रण ठेवावे. पूर्वार्धात गूढ व आध्यात्मिक गोष्टींच्या अभ्यासाकडे अधिक लक्ष देण्याची शक्यता आहे. आठवड्याच्या मध्यास मित्र, स्नेहीजन यांच्यासह बाहेर फिरावयास जाण्याचे, सुंदर वस्त्रालंकार परिधान करण्याचे प्रसंग उदभवतील. आपल्या वाक्चातुर्याने कामात यशस्वी होऊ शकाल. भिन्नलिंगी आकर्षणात वाढ होईल. आपल्या प्रियव्यक्तीसह जवळपासच्या रमणीय स्थळी फिरावयास जाण्याची शक्यता सुद्धा आहे. आपण सार्वजनिक कार्यात सहभागी व्हाल. व्यावसायिक आघाडीवर आपल्या कामाची प्रशंसा करण्यात येईल. आजवर केलेल्या कामाचे फळ म्हणून धनलाभ होण्याची शक्यता आहे. **महिलांना :** कौटुंबिक जीवनात सुख-शांती नांदेल. दूरच्या आप्तेष्टांच्या संपर्कात राहाल. त्यांची ख्याली-खुशाली घेता येईल. आर्थिक बाजू ठीक राहील. नवीन खरेदी कराल, मनात शुभ विचारांचे आंदोलन ठेवणे. **शुभ दिनांक :** २८,२९.

वाजेकर महाविद्यालयात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

। उरण । प्रतिनिधी ।

रयत शिक्षण संस्थेच्या विहीर वाजेकर महाविद्यालय, फुंडे येथील विद्यार्थ्यांना वाणिज्य क्षेत्रातील विविध करिअरच्या संधींची माहिती मिळावी तसेच त्यांच्या भविष्यातील करिअरची योग्य दिशा ठरविता यावी, या उद्देशाने C-FY Super Mega Career Counselling Programme - भविष्याची वाटचाल या विशेष करिअर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट ऑफ इंडिया यांच्या करियर समुपदेशन उपक्रमाच्या अनुषंगाने आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमास सुमारे १५० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांना वाणिज्य, सी ए, सी एम ए, एम. बी. ए., वित्त आणि स्टॉक मार्केट यांसह विविध शैक्षणिक व व्यावसायिक क्षेत्रांमधील करिअरच्या संधींबाबत मार्गदर्शन करण्यात आले. सुप्रिया सामंत यांनी विद्यार्थ्यांना शेअर मार्केट, वित्तीय क्षेत्र तसेच विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांमधील करिअरच्या संधींबाबत कोर्स व त्याची तयारी प्रवेश परीक्षा याची सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांनी करिअरविषयक विविध प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले.

प्र. प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर होते. त्यांनी विद्यार्थ्यांना करिअरची निवड करताना योग्य नियोजन, सातत्यपूर्ण प्रयत्न आणि उपलब्ध संधींचा योग्य उपयोग करण्याचे महत्त्व पटवून दिले. उपप्राचार्य डॉ. संदीप घोडके यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत कार्यक्रमाच्या आयोजनाचे कौतुक केले. कार्यक्रमाचे नियोजन प्रा. भूषण ठाकूर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. प्रांजल भोईर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. प्रियांका ठाकूर, प्रा. दिक्षिता म्हात्रे, प्रा. तन्वी कोळी, प्रा. रेणू सरोज आणि प्रा. ऋतुजा म्हात्रे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

विकास साळवी यांना उत्कृष्ट सेवा पदक

। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।

पनवेल तालुका पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस हवालदार विकास साळवी यांना भारत सरकार गृह मंत्रालय यांच्याकडून उत्कृष्ट सेवा पदकाने सन्मानित करण्यात आले. त्यांच्यावर विविध स्तरातून कौतुकाचा वर्षाव केला जात आहे.

साळवी यांनी एपीएमसी, कळंबोली, खारघर, सीबीडी, पनवेल तालुका पोलीस ठाणे येथे कर्तव्य बजावले. त्यांचे वडील प्रभाकर भालचंद्र साळवी हे देखील सेवा निवृत्त पोलीस निरीक्षक आहेत. फरगुशन कॉलेज पुणे येथून ते बीए झाले. त्यानंतर पोलीस सेवेत असताना मुंबई विद्यापीठातून एलएलबी आणि क्रिमिनलॉजी या विषयात मास्टर, एलएलएम शिक्षण पूर्ण केले. एलएलएम परीक्षेत मुंबई विद्यापीठात पाचवा क्रमांक पटकावला. कायद्याचे उत्तम ज्ञान, उत्कृष्ट तपास कौशल्यामुळे आरोपींना शिक्षा मिळाली असल्यामुळे त्यांना उत्कृष्ट सेवा पदकाने सन्मानित करण्यात आले.

शशिकांत कोशे यांचे निधन

। उरण । प्रतिनिधी ।

लोहार समाजाचे सल्लागार शशिकांत कोशे यांचे रविवारी (दि.१६) ऑगस्ट रोजी निधन झाले. निधना समयी त्यांचे वय ६६ वर्षे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, नात, नातू असा मोठा परिवार आहे. कोशे हे एन.ए. डी. येथून सेवा निवृत्त झाले होते. त्यांचा दशक्रिया विधी मंगळवार (दि.२५) रोजी क्षेत्र माणकेश्वर केगाव येथे सकाळी ८ वाजता होणार आहे. तर दिवस कार्य गुरुवार (दि. २७) रोजी रिद्धी-सिद्धी अपार्टमेंट, कुंभार वाडा उरण येथे सकाळी १० वाजता होणार आहे असे नातेवाईकांनी सांगितले आहे.

पोलीस ठाण्यामध्ये ज्येष्ठांना मार्गदर्शन

। श्रीवर्धन शहर । प्रतिनिधी ।

जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनाचे औचित्य साधून श्रीवर्धन पोलीस ठाण्यामध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यामध्ये अनेक ज्येष्ठ नागरिक सहभागी झाले होते. यावेळी श्रीवर्धनचे प्रभारी उप विभागीय पोलीस अधिकारी सुरेंद्र गरड यांनी ज्येष्ठ नागरिकांना मार्गदर्शन केले. ज्येष्ठ नागरिकांना डिजिटल अरेस्टच्या नावाखाली होणारी मानसिक छळणूक कशी असते याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. ज्येष्ठ नागरिकांवर कोणत्याही प्रकारचे संकट आल्यास टोल फ्री क्रमांक ११२ वर त्वरित संपर्क साधल्यास ७ ते ८ मिनिटात पोलीस आपल्यापर्यंत पोहोचतील अशी ग्वाही त्यांनी दिली. याप्रसंगी श्रीवर्धन तालुका ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष नरेश पुलेकर, कार्यवाह चंद्रकांत केळस्कर, आनंद जोशी, प्रतिभा कंगणे, शर्मिला जोशी, वालवटकर, नारायण पांढरकामे, श्रीकांत वालवटकर,बाबा मार्कंडे यांसह अनेक ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा

खुली ई-निविदा आमंत्रण सूचना

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडच्या वतीने वरिष्ठ विभागीय अभियंता, रत्नागिरी खालील कामासाठी खुली ई-निविदा आमंत्रित करीत आहेत. **कार्याचे नाव**: वरिष्ठ डीईएन/रत्नागिरी अनुभागांतर्गत बीसीएम द्वारे ट्रॅकची लिफ्टिंग आणि डीप स्क्रीनिंगच्या माध्यमातून क्लीन कुशन बॅलास्टमध्ये सुधारणा. **निविदा सूचना क्र.: केआर-आरएन-डब्ल्यू-2026-28, दिनांक: 25.08.2026. अंदाजित किंमत**: रु. 129,02,502/-. **ईएमडी**: रु. 2,58,100/-. **निविदा ऑनलाइन जमा करण्याची अंतिम तारीख आणि वेळ**: 16.09.2026 रोजी 15:00 वाजेपर्यंत. अधिक माहितीसाठी प्रादेशिक रेल्वे व्यवस्थापक कार्यालय, एमआयडीसी क्षेत्र, मिरजोळे, रत्नागिरी येथील कार्यालयाशी संपर्क साधावा. (वेबसाइट: **https://www.ireps.gov.in**)

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा

खुली ई-निविदा आमंत्रण सूचना

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडच्या वतीने वरिष्ठ विभागीय अभियंता, रत्नागिरी यांच्याकडून खालील कामासाठी खुली ई-निविदा आमंत्रित करण्यात येत आहे. **कामाचे नाव**: वरि. डीईएन/रत्नागिरी विभागाच्या अंतर्गत सीएमएस क्रॉसिंग, एमसीआय इन्सर्ट्स, ओव्हररायडिंग स्विच, क्यूब वेल्ड्स इत्यादींचे रिकंडिशनिंग. **निविदा सूचना क्र.: केआर-आरएन-डब्ल्यू-2026-27, दिनांक: 25.08.2026. अंदाजित किंमत**: रु. 147,74,177/-. ईएमडी: रु. 2,95,500/-. **ऑनलाइन निविदा जमा करण्याची अंतिम तारीख व वेळ**: 16.09.2026 रोजी 15:00 वाजेपर्यंत. अधिक माहितीसाठी प्रादेशिक रेल्वे व्यवस्थापक कार्यालय, कार्यालय, एमआयडीसी क्षेत्र, मिरजोळे, रत्नागिरी यांच्याशी संपर्क साधावा. (वेबसाइट: **https://www.ireps.gov.in**)

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते आहे की, आमचे अशिल खालील वर्णन केलेली सदनिका मिळकत मालक १.श्री.दिपक बळवंत यादव व २.सौ. सुरेखा दिपक यादव यांच्याकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

मिळकतीचे वर्णन

सदनिका क्रं. १०४, ए-१-विंग, सह्याद्री को.ऑप.हौसिंग सोसायटी, (वास्तुरचना संचलिका गोकुळ) रजि. नं.आर जीडी/पीडब्ल्यूएल/एचएसजी/(टीसी)/६००८/२०२४-२५, सर्व्हे नं.१६६/०, मौजे अजिवली, ता.पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र ४१०२२१

वरील वर्णन केलेली सदनिका मिळकतीत यापूर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व सबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदपत्रांसहित व पुराव्यांसहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदरील सदनिका मिळकत निर्वेध, बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दाचा, हक्क व हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारचा हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तमाम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
तारीख : २१/०८/२०२६

सही/-
(ॲड.वर्षा किशोर हजारे)
बी.ए.एलएल.बी
ऑफिस पत्ता-ऑफिस नं.०६, तळमजला
यशोकिरण को.ऑप.हौसिंग
सोसायटी, सावरकर चौक, पनवेल,
ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते आहे की, मौजे-कारिवणे, ता.रोहा, जि.रायगड येथील खालील व्यक्तीचे नावे असलेली ताबेकब्जातील तसेच मालकी हक्काची खालील वर्णनाची रोहा नगरपरिषद हद्दीतील जमिन मिळकत आमचे अशिलांनी कायम स्वरूपात विकत घेण्याचा विचार केलेला आहे.

शेतजमिनीचे वर्णन

मौजे-कारिवणे, ता.रोहा, जि.रायगड येथील सर्व्हे नं.१७/अ/१ मधील एकूण क्षेत्र हे.आर.पॉ.१३-७८-७० पैकी खालील वर्णनाची शेतजमिन

अ. क्रं.	कब्जेदाराचे/ मालकाचे नाव	खाते नं	सर्व्हे नं.	हिस्सा	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार
१.	श्री.संतोष जनार्दन देशमुख	१५९	१७	अ/१	१-६०-००	
२.	श्री.राजेंद्र हरिश्चंद्र पवार				पो.ख.०-४०-००	०.१४
३.	श्री.सचिन वसंत पाटील				एकूण २-००-००	

सबब वर नमुद शेत जमिन मिळकतीवर, वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाच्या आत हक्क, हितसंबंध स्वरूप विशद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात, अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत तक्रार दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर वर नमूद मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल यांची तमाम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

दिनांक : २२/०८/२०२६

सही/-
ॲड.सानिका सचिन शिंदे
ऑफिस-गाळा नं.२८, सिटी पार्क बिल्डींग,
खान्देश हॉटेलसमोर, साई इंटरप्रायझेस, से.१३,
खांदा कॉलनी, नवीन पनवेल(प),
ता.पनवेल-४१०२०६, जि.रायगड

जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक सौ. जान्हवी सागर राणे व श्री.दत्तात्रेय पुरुषोत्तम औटी व श्री. सौ. मृदुला दत्तात्रेय औटी यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

बिनशेती जमिन मिळकतीचे वर्णन
मौजे कशेळे ता कर्जत जि रायगड येथील मिळकत

वरील बिनशेतजमीन मिळकत सर्व्हे नं १४२/४ एकुण ०.०२.६५ गुंठे, सर्व्हे नं १४२/५ एकुण ०.०२.४२ गुंठे, जागा विकत घेणार आहेत. तरी बिनशेतजमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखत, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हित संबध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हित संबध त्यानी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक २३/०८/२०२६

ॲड देविदास यशवंत देवघरे
पत्ता. मु.पो कडाव, ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते आहे की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत त्यांच्या मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

मौजे-पाथरज, तालुका-कर्जत, जि.रायगड येथील जमिन मिळकत

मालकाचे नाव	सर्वे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रू.पै.
अमरलाल टी परवानी	५६	२/ब/२/अ/१	०-२०-०० पो.ख.०-०६-०० एकूण ०-२६-०० गुंठे क्षेत्र मिळकत	०-२४

वर वर्णन केलेली जमिन मिळकतीच्या कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थांचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा कोणत्याही व्यक्तींची अगर संस्थांची आमच्या अशिलांच्या वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत पुराव्यासोबत लेखी स्वरूपात हरकत कळवावी. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील जमिन मिळकतीशी कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थांचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, तसेच कोणत्याही व्यक्तींची आगर संस्थांची आमच्या अशिलांच्या वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत नाही किंवा असल्यास ती हरकत त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेली आहे असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणीही हरकत घेतल्यास ती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि. २२.०८.२०२६

अधिवक्ता
शैलेश दत्तात्रेय पवार
पत्ता घर क्र ३, नेमीनाथ हाईटस शेजारी
मुद्रे बु. कर्जत, ता कर्जत जि. रायगड
मो.९५९५२११८६७

जाहीर नोटीस

या जाहिर नोटीशीद्वारे सर्व संबंधितांना कळविणेत येते की, खालिल नमुद मिळकतीचे मालक श्री.गणेश रामचंद्र वैरागी यांनी त्यांची खालिल नमुद मिळकत आमचे अशिलांना विकत देणेचे ठरविले आहे.

मौजे कोंदिवडे, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत

भुमापन क्रमांक	भुमापन क्र.चा उपविभाग	क्षेत्र हे. आर.	आकार रू. पै.
४	१/ब	०-०१-५०	०-०५

वरील नमूद मिळकत व त्यामधील तदंगभुत हक्कहितसंबंध सुद्धा.

सदर जमिन मिळकतीबाबत विक्री करण्याचा प्रस्ताव असून, सदर मिळकतीबाबत कोणत्याही व्यक्तीचा मालकी हक्क, वारसा हक्क, ताबा, गहाण, बोजा, करार, हक्कसंबंध अथवा अन्य कोणताही दावा/हरकत असल्यास त्यांनी या नोटीसच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून ७ (सात) दिवसांचे आत आवश्यक कागदपत्रांसह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर लेखी स्वरुपात कळवावे.
विहित मुदतीत कोणतीही हरकत अथवा दावा प्राप्त न झाल्यास, सदर मालमत्तेबाबत कोणाचाही दावा/हरकत नाही असे गृहित धरून पुढील विक्री व्यवहार करण्यात येईल. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या कोणत्याही दाव्यास विक्रेता जबाबदार राहणार नाही.

दि. २२ ऑगस्ट, २०२६

सही/-
खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
ॲड.सारिका भास्कर मुने
ऑफिस पत्ता - स्वप्ननगरी, शॉप नं. ९
गुरुनगर रोड, मुद्रे खुर्द, ता.कर्जत, जि.रायगड.
मो.नं.७०३०५४४७८८/८७६६५०३०१९

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की,

मौजे बोर्ली, ता. मुरुड, जि. रायगड येथील भुमापन क्रमांक २०९/४२ क्षेत्र ०-०३-०० (हे.आर.), आकार ० रु. ०० पैसे, ही मिळकत व त्यात असलेले मौजे बोर्ली ग्रामपंचायत घर नंबर ४४ क्षेत्र ७७५ चौ.फुट अशी सर्व मिळकत मिळकतीचे विद्यमान कबजेदार अरुणा शरद गोरेगांवकर, जितेंद्र शरद गोरेगांवकर, विजय रामकृष्ण गोरेगांवकर यांचे मालकीची व ताबा कबजा वहिवाटीची आहे. सदर मिळकत मिळकतीचे वरील विद्यमान कबजेदार यांजकडुन आमचे अशिलांनी विकत घेण्याचे ठरविले आहे. तशी बोलणी मिळकतीचे विद्यमान कबजेदार व आमचे अशिल यांच्यात झालेली आहेत. सदर मिळकतीची मालकी व ताबा कबजा मिळकतीचे वरील विद्यमान कबजेदार यांचाच आहे असा भरवसा त्यांनी आमचे अशिलांस दिलेला आहे.

तरी सदर मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस लीज, फरोक्त अन्न वस्त्राचा बोजा वहिवाटीचा अगर तत्सम प्रकारचा कोणताही हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासुन पंधरा दिवसांचे आत खालील सही करणार ''खरेदीदारा तर्फे ॲडव्होकेट'' यांजकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. या मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास वर वर्णन केलेल्या मिळकतींचा मालकी हक्क व ताबा मिळकतींचे वरील विद्यमान कबजेदार यांचाच आहे, असे समजुन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
ता. २१/०८/२०२६

सही/-
ॲड. श्रद्धा प्रदीप वैद्य
''नागेश्वर भुवन'' गणपती आळी, मु.पो. नागांव,
ता.अलिबाग, जिल्हा रायगड.
(खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट)

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे महसुल, दप्तरी वर्णन केलेली मिळकत आमचे अशिलांनी कोणाचा काही ताबा, कब्जा, वहिवाट, मालकी हक्क, खरेदीखत, साठेकरार, दान, गहाण, बक्षीस, फरोक्तखत, दिवाणी दावा, महसूल दावा, किंवा कुलमुखत्यारपत्र बाबत हरकत, तक्रार किंवा काही अधिकार असल्यास कळवण्याकरीता जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याचे ठरवले आहे. तसेच खालील नमूद मिळकती आमचे अशिल खरेदीखताद्वारे खरेदी करणार आहेत.

मालकाचे नाव : श्री.बाबुराव धर्मा म्हात्रे

मिळकतीचे वर्णन
मौजे वावे ता.पेण जि.रायगड

स. नं.	गट व उपविभाग	क्षेत्र हे.आर.पॉ.	पोट खराबा	आकार रू.पै.
१.	१७७/१/१/ब	००-१८.८०	०.८०	४-७५

सदरहु मिळकती बद्दल कोणाचाही ताबा-कब्जा वहिवाट, मालकीहक्क, खरेदीखत, साठेकरार, दान, गहाण, बक्षीस, फरोक्तखत, दिवाणी दावा, महसूल दावा किंवा कुलमुखत्यारपत्र बाबत हरकत, तक्रार अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत किंवा तक्रार नोंदवावी. वरील मुदतीत कोणाच्याही हरकती किंवा तक्रार न आल्यास सदरहु मिळकत निर्दोष व बोजारहीत असल्याचे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताद्वारे खरेदी करणार आहेत. सदर मुदतीनंतर येणारा हरकतीचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २१.०८.२०२६

सही/-
ॲड.नेहा राठौर
पत्ता-३०३, पार्वती आंगण सी एच एस, सेक्टर २१, प्लॉट नं.६६, कामोठे, खांदेश्वर रेल्वे स्टेशन, क्रिटिकेअर हॉस्पिटल जवळ, ता.पनवेल, जि.रायगड
८६५२५१२८६७ -Email-advrathoreneha@gmail.com

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे पेढांबे, ता. अलिबाग येथील खालील वर्णनाच्या मिळकतीमधील खाली नमुद विद्यमान मालकांचा ३/४ अविभक्त हिस्सा कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	गट नं.	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रु.पै.)
पेढांबे	६७	०-४९-५०	११.१८
		पो.ख. ०-००-८०	
		०-५०-३०	

पैकी १) भालचंद्र दत्तात्रेय ढवळे, २) संध्या लहू बाणे, ३) दिपेंद्र परशुराम ढवळे, ४) नरेंद्र परशुराम ढवळे, ५) महेश परशुराम ढवळे, ६) सुनिता परशुराम ढवळे, ७) ममता जिवराज महाराव, ८) घनश्याम काशिनाथ शिंदे, ९) विनय सुरेश ढवळे व १०) सारिका सुरेश ढवळे यांचा अविभक्त ३/४ हिस्सा,

विद्यमान मालकांचे सदर मिळकतीमधील त्यांचे मालकीहक्क निर्वेध असून त्यांना अविभक्त हिस्सा विकणेचा हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमचे अशिलांस दिला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज लिएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास वर नमुद मिळकतीमधील विद्यमान मालकांचा अविभक्त हिस्सा निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांचा आहे असे गृहित धरून आमचे अशिल सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
ता. २३/०८/२०२६

ॲड विधान अरविंद पाटील
रा.वत्सला, टिळक रोड, स्टेट बँके समोर,
अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड
मो.नं.९४२२३७५११५

जाहीर नोटीस

सर्व संबंधितांस याद्वारे जाहीर करण्यांत येते की, आर्यन दत्तात्रय रौंधळ यांनी खालील परिशिष्टात नमूद जमिन मिळकती ह्या सदर जमिन मिळकतींचे विद्यमान मालक सुरेंद्र हरिष जोशी, राहणार प्रगती हाइट सोसायटी, ओम नगर दसक, जेल रोड नाशिक यांचेकडून खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे परिशिष्ट

अनु. क्र.	गावाचे नाव	गट क्र.व जुना सर्व्हे नंबर	क्षेत्र (हे.आर्स)	आकार (रु.पैसे)
१.	मौजे-वडघर, ता. श्रीवर्धन, जि.रायगड	२३९ जुना सर्व्हे नं ७१ हिस्सा नंबर ३	१-९८-०० पैकी १-०८-००	०.४७/-
२.	मौजे-वडघर, ता. श्रीवर्धन, जि.रायगड	२४० जुना सर्व्हे नं ७१ हिस्सा नंबर २/ब	१-०९-००	०.२८/-

वर परिशिष्टात नमूद जमिन मिळकती ह्या संपुर्णतः जमिन मालकांच्या मालकी व ताबेकब्जा वहिवाटीतील असल्याची हमी माझे अशिलांस जमिनीचे मालकांनी दिलेली असून सदर जमिन मिळकती ह्या पुर्णतः निर्वेध व बोजाविरहीत असून त्याबाबत कोणतेही गहाण, दान, लीज, लीन, फरोक्त खत, मृत्युपत्र अथवा खरेदीखत झाले नसल्याची हमी माझे अशिलांस दिलेली आहे. तरी वर परिशिष्टात नमूद जमिन मिळकतींत अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध, अधिकार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे अवधीत त्यांची लेखी हरकत संयुक्तिक कागदपत्रांसह खाली नमूद पत्त्यावर माझ्याकडे आणून द्यावी. वर नमूद मुदतीत कोणाचीही संयुक्तिक हरकत न आल्यास माझे अशिल सदर जमिन मिळकतींमध्ये अन्य कोणाचेही हक्क नसल्याचे समजून सदरहू मिळकतींचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील यांची संबंधितांनी दखल घ्यावी.

श्रीवर्धन
दिनांक : २३/०८/२०२६

(ॲड.तानिया राजेंद्र गांधी)
छत्रपती शिवाजी महाराज चौक
ता. श्रीवर्धन, जि. रायगड
मो.नं.९८२२२४३५०१

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल

१) शांतनू सहाय व २) कंचन समतानी, रा. मुंबई यांच्या मालकीची मौजे झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड येथे गट नं. ७७/२, क्षेत्र ६८.६०.०० आर स्केअर मिटर्स आकार ६८६ रुपये या वर्णनाची बिनशेती मिळकत आहे.

सदर मिळकतीचे दक्षिण- पुर्वेस लगत श्री. नितीन अरविंद पाटील, सुप्रिया सुनिल पाटील व स्नेहल राजेंद्र भगत यांचे मालकीची मौजे झिराड, गट नं. ७६, क्षेत्र ० हे. ६३ आर, आकार १२.७० ही मिळकत आहे. आमच्या अशिलांच्या मालकीच्या गट नं. ७७/२ या मिळकतीच्या उत्तरेकडे असलेल्या पक्क्या गावरस्त्यापासून सदरचे गट नं. ७६ या मिळकतीमध्ये जाण्या-येण्याकरीता कधीही कोणत्याही प्रकारचा रस्ता उपलब्ध नव्हता. परंतू आमच्या अशिलांनी मिळकत विकत घेतल्यानंतर, श्री. अरविंद नथुराम पाटील यांनी विनंती केल्यावरून त्यांच्या सोईकरीता आमचे अशिलांनी त्यांस गट नं. ७७/२ या मिळकतीमधून शेतीच्या कामाकरीता पायी येण्या-जाण्यासाठी तोंडी परवानगी दिली होती व त्या परवानगीच्या आधारे श्री. अरविंद नथुराम पाटील हे त्यांच्या गट नं. ७६ या मिळकतीमध्ये आमच्या अशिलांच्या गट नं. ७७/२ या मिळकतीमधून ये-जा करीत होते.

अशी वस्तूस्थिती असताना आता आमच्या अशिलांच्या असे निदर्शनास आले आहे की, श्री. अरविंद नथुराम पाटील यांचे वारस श्री. नितीन अरविंद पाटील, सुप्रिया सुनिल पाटील व स्नेहल राजेंद्र भगत यांनी त्यांच्या मालकीची गट नं. ७६ ही मिळकत विकावयास काढली आहे व ते इच्छूक खरेदीदार, इस्टेट एजंट व ब्रोकर यांस गट नं. ७६ या मिळकतीमध्ये जाण्या-येण्याकरीता गट नं. ५७/२ या मिळकतीमधून रस्ता असल्याची बतावणी करीत आहेत. सदरचे त्यांचे कृत्य हे चुकीचे व बेकायदेशीर आहे. त्यामुळे गट नं. ७६ ही मिळकत विकत घेऊ इच्छिणाऱ्या इसमांस वस्तूस्थितीची माहिती व्हावी व मागाहून रस्त्याच्या कारणावरून आमचे अशिल व इच्छूक खरेदीदारांमध्ये कोणत्याही प्रकारचा तंटा बखेडा निर्माण होऊ नये, याकरीता आमचे अशिल सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहेत.

सबब तमाम जनतेस, विशेषत: मौजे झिराड गट नं.७६ ही मिळकत विकत घेऊ इच्छिणाऱ्या व त्या मिळकतीचे खरेदी-विक्रीमध्ये मध्यस्थी करणाऱ्या इसमांस याद्वारे कळविण्यात येत आहे की, मौजे झिराड गट नं.७६ या मिळकतीमध्ये जाण्या-येण्याकरीता आमच्या अशिलांच्या मालकीच्या गट नं. ७७/२ या मिळकतीमधून कोणत्याही प्रकारचा वहिवाटीचा रस्ता कधीही नव्हता, नाही अथवा उपलब्ध होणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
तारीख : २३/८/२०२६

सही/-
ॲड. गणेश गोविंद पाटील
ओ/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को.ऑप.हा.सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग

दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **शुभमुहूर्त प्रथम पुर्नविवाह सर्वजातीय** आंतरजातीय वेबसाईटसह, स्थळांसाठी रोहा पनवेल गणेश महाकाळ ८८८८९३५७७५
- **शुभमुहुर्त विवाहमंडळ** अलिबाग शाखेत सर्व जातीय वधूवरांची नावनोंदणी सुरु. ४६ शाखा, वेबसाईट, ॲप्लीकेशन नावनोंदणीसाठी - ९२२६७६६१२९.
- **जन्मकुंडली-हस्तरेखा-टॅरोकार्ड**-अंकशास्त्र यावरुन ज्योतिषविषयक मार्गदर्शन व उपाय श्री म्हात्रे- ९२२६७६६१२९
- **मेडिकल एजन्सी पिंपळभाट येथे(तत्काळ)** कामासाठी मुले व मुलीसाठी ४ जागा खाली आहेत. शिक्षण १० ते १२ च्या पुढे, अलिबागच्या आजूबाजूच्या ६-८ कि.मी.परिसरातील स्टाफ हवेत. मो. ९६२३३६६७७८
- **मराठी टायपिंगकरिता** मुले व मुली पाहिजेत. संपर्क- ९८५०८११३९१
- **चौल-अलिबागमध्ये कॉटेज** व वाडी २४ तास सांभाळण्यासाठी अनुभवी जोडपे/मुल/मुली पाहिजेत. जेवण करता येण अनिवार्य. संपर्क- ९८२००२९४५८.
- pharmacist पाहिजे न्यू सिद्धांत मेडिकल अलिबाग -९१११२११७०७९
- **चेंढरे येथे सोसायटी/कनव्हेंस** डीड झालेल्या नवीन इमारतीमधील तीन २ बीएचके रेडी पझेशन फ्लॅट विकणे आहेत. संपर्क - ८१८०८६१२३४/८१८०८५१२३४
- **लक्ष्मी नारायण कृपा श्रीबाग नं.२** अलिबाग येथील २५०० स्क्वेअरफूट जागा बँक /ऑफिस/शैक्षणिक क्लासेस/ गेस्ट हाऊसकरीता पार्किंगसह भाड्याने देणे आहे. संपर्क - ८४५४८६२७६७/९२२०८४०३८८.
- १ bhk + balcony फॅमिली साठी फ्लॅट भाड्याने देणे आहे. लोकेशन: इंद्रप्रस्थ भाडे:१५,०००/- (निगोशिएबल) संपर्क: ९६३७२१३३८०

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

राशीभविष्य

- **मेष** : कारकिर्दीला नवी दिशा मिळेल. आर्थिक बाबतीत आमिषाला भूलू नका. विचारपूर्वक निर्णय घ्यावेत.
- **वृषभ** : महत्त्वाची कामं विलंबानं होतील. व्यवसायात अडचणींचा सामना कराल. कौटुंबिक स्वास्थ्य लाभेल.
- **मिथुन** : वाढत्या खर्चाचा ताण राहील. नव्या योजना तुर्तास प्रलंबित राहतील. प्रकृतीच्या तक्रारी राहतील.
- **कर्क** : आर्थिक करार लाभदायक ठरतील. गुंतवणुकीला चालना मिळेल. यांत्रिक क्षेत्रात अनुकूलता राहील.
- **सिंह** : इतरांवर फार विसंबून राहू नका. महत्त्वाचे निर्णय धडाडीने घ्यावेत. आध्यात्मिकतेकडे ओढा राहील.
- **कन्या** : नोकरीत नव्या जबाबदाऱ्या येतील. भागीदारी व्यवसायात लाभ होईल. मानसिक स्वास्थ्य लाभेल.
- **तूळ** : उपजत कला-गुणांना वाव मिळेल. रेंगाळलेली कामं मार्गी लागतील. अपेक्षापूर्तीचं समाधान मिळेल.
- **वृश्चिक** : महत्त्वाची कामं रखडतील. दैनंदिन कामांबाबत अनुत्साह राहील. जुनी दुखणी पुन्हा उद्‌भवतील.
- **धनु** : उत्साहवर्धक घटना घडतील. आर्थिक उलाढाल मनासारखी राहील. धार्मिक कार्याचा आनंद मिळेल.
- **मकर** : आजचा दिवस धावपळीचा राहील. अकारण वाद-विवाद टाळावेत. कर्ज प्रकरणात दिलासा लाभेल.
- **कुंभ** : दूरच्या प्रवासाचे बेत ठरतील. मुलांच्या प्रश्नांबाबत समाधान लाभेल. मोठी खरेदी तुर्तास करू नये.
- **मीन** : मनाजोग्या घटना घडतील. स्थापत्य क्षेत्रात अनुकूलता राहील. आलेल्या संधींचा लाभ घ्यावा.

ब्युटी टॉक

ग्लिटर मेक अप करताय?

सध्या ग्लिटर मेक अपचा ट्रेंड आहे. हा मेक अप योग्य पद्धतीने केला तरच शोभून दिसतो. ग्लिटर म्हणजे चकमक आणि झगमग. त्यामुळे आपला चेहरा खूप चमकदार दिसणार नाही याबाबत दक्ष रहायला हवं. ग्लिटर मेक अप करताना कोणती काळजी घ्यायला हवी यावीषयी...

* चेहऱ्याच्या कोणत्याही एका भागावर ग्लिटर मेक अप करा. म्हणजे तुम्ही ग्लिटर आयलायनर किंवा आयशॅडो लावणार असाल तर स्पार्कली म्हणजेच चकाकत्या लिपग्लॉसचा वापर करू नका. संपूर्ण चेहऱ्यावर ग्लिटर वापरू नका.

* ग्लिटर वापरताना वेळेचं भान ठेवा. सकाळच्या वेळी ग्लिटर शोभून दिसणार नाही. रात्रीच्या वेळी गडद रंगाच्या पेहरावावर ग्लिटर मेक अप शोभून दिसेल.

* बाजारात ग्लिटर मेक अपची बरीच व्हरायटी मिळते. पण नेहमी चांगल्या प्रतीची ग्लिटर उत्पादनं वापरायला हवीत. (क्रमश:)

२३ ऑगस्ट

दिन विशेष

१८३९ : युनायटेड किंग्डमने हाँगकाँगचा ताबा घेतला.
१९४४ : हिंदी चित्रपट अभिनेत्री सायरा बानू यांचा जन्म.
१९५१ : जॉर्डनची राणी नूर यांचा जन्म.
१९९१ : वर्ल्ड वाईड वेब सार्वजनिक उपयोगासाठी सुरू झालं.
२०१५ : जर्मनीमध्ये समुद्रकिनाऱ्यावर १०८ वर्षांपूर्वीचा बाटलीतील जुना संदेश आढळून आला.

स्मार्ट टिप्स

मनोरंजन करणारी धमाल ॲप्स

छोट्यांनो, खास तुम्हा मुलांसाठी तयार करण्यात आलेली बरीच ॲप्स आहेत. ही ॲप्स डाउनलोड केल्यानंतर तुम्हाला एका क्लिकवर गोष्टी, गाणी ऐकता येतील.

* 'निक ज्युनिअर' हे ॲप डाउनलोड केल्यानंतर तुम्ही धमाल व्हिडिओ गेम्स खेळू शकता. गमतीशीर व्हिडिओ बघू शकता. या सोबतच 'निक' वाहिनीवरच्या कार्यक्रमांचे भागही या ॲपवर पाहता येतील. * यू ट्यूबने खास मुलांसाठीचं ॲप तयार केलं आहे. 'यू ट्यूब किड्स' नावाच्या ॲपवर तुम्ही छान छान व्हिडिओ बघू शकता. यात व्हिडिओ, चॅनेल आणि प्ले लिस्टसारखे फीचर्स आहेत. यात व्हिडिओ फिल्टरिंगचाही ऑप्शन आहे. * 'लिव्ह किड्स' हे ॲपही छान आहे. इथे इंग्रजी कविता ऐकता येतील. तसंच कार्टून्सही पहायला मिळतील. * 'नेक्स्ट जी टीव्ही किड्स' या ॲपवर कार्टून्स, विनोदी चित्रपट, गोष्टी आणि वैज्ञानिक प्रयोगांचे व्हिडिओ बघता येतील. * 'माय स्टडी लाईफ' हे ॲपही तुम्हाला खूप उपयोगी पडेल. याच्या मदतीने तुम्ही अभ्यासाचं नियोजन करू शकता. यात अभ्यासाच्या दृष्टीने बरीच उपयुक्त माहितीही यात आहे.

पंचांग

रविवार, २३ ऑगस्ट २०२६
पराभवनाम संवत्सर शके १९४८,
श्रावण शु. ११, चंद्रराशी : धनु,
नक्षत्र : मूळ, योग : प्रीति,
सूर्योदय ६.२४, सूर्यास्त ६.५९

फॉरवर्ड्स

एक़ गुनाह हम रोज़ क़रते हैं...

जहाँ क़दर नहीं वहाँ फ़िक्र क़रते हैं...!

आरोग्यमंत्र

जंतूसंसर्गाकडे दुर्लक्ष नको

जंतूसंसर्ग होणं ही वरकरणी साधी समस्या वाटते. मात्र दुर्लक्ष केल्यास यामुळे सेप्सिस नावाचा रोगही होऊ शकतो. सेप्सिसवर वेळीच उपचार न झाल्यास रूग्णाचा मृत्यू होण्याचीही शक्यता असते.

सेप्सिसमध्ये रक्ताभिसरण प्रक्रियेवर परिणाम होतो. यामुळे शरीरावर सूज येते आणि रक्ताच्या गुठळ्या तयार होतात. सहाजिकच विविध अवयवांना ऑक्सिजन आणि पोषक घटक मिळत नाहीत. म्हणूनच वेळीच लक्ष देऊन सेप्सिसच्या लक्षणांकडे लक्ष द्यावं आणि उपचार करून घ्यावे. असं झालं नाही तर अवयव निकामी होण्याची शक्यता असते. याला



सिव्हियर सेप्सिस असं म्हणतात. त्यापुढच्या टप्प्याला सेप्सिस शॉक असं म्हटलं जातं. यामध्ये रूग्णाचा मृत्यूही ओढावू शकतो. हा धोका टाळण्यासाठी याच्या लक्षणांकडेही लक्ष पुरवायला हवं. प्लेटलेट्स कमी होणं, लघवीचं प्रमाण कमी होणं, सतत अशक्तपणा जाणवणं, शरीराचं तापमान कमी झाल्याने थंडी वाजणं, श्वास घ्यायला त्रास होणं अशी लक्षणं दिसल्यास तातडीने तपासणी करुन घ्यायला हवी कारण ही सेप्सिसची लक्षण आहेत. जंतूसंसर्गामुळे उद्‌भवू शकणाऱ्या या समस्येप्रती सर्वांनीच सजग रहायला हवं. मात्र प्रतिकारशक्ती कमी असल्यास, मधुमेह असल्यास, एचआयव्ही बाधित रूग्णांना तसंच लहान मुलं किंवा ज्येष्ठ नागरिक यांना हा विकार होण्याचा धोका अनेक पटीने वाढतो. म्हणूनच अशा लोकांनी सेप्सिसप्रती अधिक दक्ष राहणं गरजेचं ठरतं.

फॅशन पॅशन

* तुमच्या लॅपटॉपसाठी ट्रेंडी पण वॉटरप्रूफ बॅग खरेदी करा. बाजारात विविध डिझाइन्सच्या लॅपटॉप बॅग्ज मिळतात. बराच काळ टिकणारी, आकर्षक बॅग तुम्ही खरेदी करू शकता.

* कॅज्युअल आउटिंगला शॉर्टस कॅरी करता येईल. हटके प्रिंट्सची शॉर्टस घ्या. त्यावर टी शर्ट घाला आणि मित्रांसोबत भटकंती करा.

* घड्याळ ही स्टायलिश ॲक्सेसरी ठरू शकते. पण पावसाळ्यात वॉटरप्रूफ घड्याळ घ्या. एखादं ट्रेंडी घड्याळ तुमच्या लूकला चार चांद लावेल.

करिअरवाटा

विचारपूर्वक निर्णय घ्या...

निर्णयक्षमता हा गुण असेल तर यशोप्राप्तीतले अडथळे वेगाने दूर होतात याबाबत दुमत असण्याचं कारण नाही. पण घेतले जाणारे निर्णय केवळ वेगानं नव्हे तर विचारपूर्वक घेतले पाहिजेत. घाईगडबडीनं निर्णय घेताना एखाद्या गोष्टीची नकारात्मक प्रतिक्रिया म्हणून आपण असे तडकाफडकी

निर्णय घेत आहोत का, याचा अंतर्मुख होऊन विचार केला पाहिजे. इंग्रजीमध्ये 'वेट ॲन्ड वॉच' असा सल्ला दिला जातो. त्यामध्ये कोणतीही कृती करताना किंवा निर्णय घेताना थोडी वाट पहा आणि निरीक्षण करून नंतरच निर्णय घ्या असं सुचवलं आहे. 'पॉज ॲन्ड डिसाईड' हा देखील पाळावा असा नियम आहे. एखादा वक्ता भाषण करताना काही क्षण थांबतो किंवा एखादं महत्त्वपूर्ण वाक्य उच्चारण्यापूर्वी क्षणभर शांत उभा राहतो आणि नंतर वाक्य उच्चारतो. त्या थांबण्याला, शांत बसण्याला पॉज असं म्हटलं जातं. कोणताही निर्णय घेण्याचा विचार मनात आल्यानंतर अशाच प्रकारे एक पॉज घ्यावा आणि नंतरच निर्णय घ्यावा. या काळात आपण नकारात्मक भावनेतून निर्णय घेत आहोत की आणखी विचार करायला हवा हे स्पष्ट होतं. अशा पध्दतीनं विचारपूर्वक घेतलेला निर्णय केव्हाही हितावह ठरतो.

खेचाखेची

ऑफर

एक माणूस प्रॉब्लेमला म्हणाला, मी तुझा रेग्युलर ग्राहक आहे, काही डिस्काउंट दे ना!

प्रॉब्लेम हसून म्हणाला, डिस्काउंट नाही... पण तुझ्यासाठी खास ऑफर आहे!

'बाय टेन प्रॉब्लेम्स, गेट टू एक्स्ट्रा फ्री'

वेगळं काही

बंगळुरूमधल्या एका शाळेत आर्टिफिशियल इंटेलिजन्स म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्तेवर काम करणारे रोबो आणण्यात आले आहेत. हे रोबो शिक्षक म्हणून काम करतील. हे रोबो माणसासारखेच दिसतात. ते विविध विषय शिकवण्यासोबतच संवाद साधून विद्यार्थ्यांच्या समस्या सोडवण्याचा प्रयत्नही करणार आहेत. हे रोबो सातवी ते नववीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना सात विषय शिकवतात. या रोबोंना महिलेचं रुप देण्यात आलं आहे. ते 'ईगल २.०' या नावाने ओळखले जातात. १७ सदस्यांच्या टीमने या रोबोंची निर्मिती केली आहे. अशा पद्धतीचा एक रोबो बनवण्यासाठी आठ लाख रुपये खर्च आल्याचं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. या रोबोंच्या निर्मितीसाठी दोन वर्षांचा काळ लागला.

रुचिरा

रुचकर काकडीची भजी

आपण काकडीची कोशिंबीर, थालपीठ असे अनेक पदार्थ करतो. सॅलेडमध्येही काकडी हा महत्त्वपूर्ण घटक असतो. पण काकडीची भजीही करता येतात, याचा कधी विचार केलाय? कल्पनाशक्तीला थोडा ताण दिला तर उपवासाला चालणारा हा चटपटीत पदार्थही करता येईल. काकडीची ही भजी जिभेची भूक भागवू शकतात.

साहित्य - एक वाटी शिंगाड्याचं पीठ, दोन टीस्पून सैंधव, अर्धा टी स्पून हिरवी मिरचीचे तुकडे, चिरलेली कोथिंबीर, दोन मोठ्या काकड्यांचे पातळ काप, तेल इत्यादी.

कृती - या भज्यांसाठी शक्यतो मोठी काकडी वापरावी. सर्वप्रथम शिंगाड्याचं पीठ, सैंधव, हिरवी मिरचीचे तुकडे, कोथिंबीर हे सगळं साहित्य एकत्र करून घ्यावं. ते घट्ट होईल इतपत पाणी मिसळावं. एकजीव करुन काही वेळ तसंच ठेवावं. त्यानंतर यात काकडीचे काप बुडवावे आणि तुपात तळून घ्यावेत. आधी काप हाफ बॉईल करावेत. सर्व्ह करण्यापूर्वी पुन्हा एकदा भुऱ्या रंगावर तळून घ्यावेत. यामुळे भजी अधिक क्रिस्पी होतात.

सुडोकू १४३

९		३			१	७		
२				७				५
५			८	३		९		
			३			१		२
		१	२		८	४		
३		४			७			
१				९	५			
४				८				७
		५	४			२		

टीप -

* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्न ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.

* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.

* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

सुडोकू १४२ चे उत्तर

६	१	८	२	३	९	७	५	४
४	९	३	८	५	७	६	२	१
२	५	७	६	१	४	३	८	९
९	७	१	३	६	२	५	४	८
८	६	४	७	९	५	२	१	३
५	३	२	४	८	१	९	६	७
१	२	६	९	७	८	४	३	५
७	४	५	१	२	३	८	९	६
३	८	९	५	४	६	१	७	२

शब्दकोडे क्रमांक १४३



आडवे शब्द :-

१) प्राणत्याग
४) अनेक राजकीय पक्षाची युती
८) चालू दिवस
१०) हवालदार
१२) भुजा आणि हात यांच्या सांध्याचे मागील टोक
१३) निवासस्थान
१५) पैंजण
१७) संतापी
१८) हाताचा तळवा
२०) क्वचित आढळणारे, दुर्मिळ
२१) किंचित आलेली वक्रता
२३) श्रीमंत
२४) जमलेल्या लोकांचा घोळका
२५) श्रीरामाच्या वडिलांचे नाव
२७) अरण्य
२८) राजीवलोचन
३३) पराग, धुळीचा कण
३४) मुलीचा नवरा
३६) कैवारी, मालक
३७) नमुन्यास घेण्यास योग्य, विचित्र, छान
४०) बुटका, दशावरातील एक
४१) कोवळी फांदी
४३) पारद
४४) पडणे
४६) लता
४८) रात्रीचा पाऊस
५०) वचक, भीती
५३) सध्या
५४) एक जुनी लेखणी
५५) पवित्र
५६) राक्षस
५७) मंत्रीमंडळ
५८) एक वेलवर्गीय उन्हाळी फळ
५९) गुणांची चाहा करणारा
६१) निरोप
६२) मान्य करणे
६३) अर्धी ओंजळ
६४) बोकड
६५) नवप्रवेशित
६८) चारही बाजूस पाणी असलेला भूखंड
६९) शिंपला, कालू
७१) बाग
७२) भरभराट
७५) उपविभागाची व्यवस्था पाहणारा
७६) रविवार

उभे शब्द :-

१) सजावट, कृत्रिम देखावा
२) खून, हत्या
३) सोडणे
४) महापालिका
५) चलनवलन
६) शिक्का
७) पुस्तकातील पाठ
८) दिवाळीतील एक आवाजी फटाका
९) सोन्याचा धागा
११) खोडण्याचे साधन
१२) राग
१४) रावण
१६) गांधारीचे पुत्र
१७) बळ, शक्ती
१८) सोने
१९) मसाल्यातील पत्र
२०) पायजमा
२२) एक भारतीय नृत्यप्रकार
२३) धरतीची मुलगी, सीता
२४) ** *** जय किसान
२६) बाण
२९) साय
३०) पुरुष
३१) हद्द
३२) आल्याची वडी
३४) यज्ञोपवीत
३५) अखेर, शेवट
३६) एखाद्या कुटुंबावर बहिष्कार टाकणे,
३८) पवन
३९) बशेचा जोडीदार
४२) मोठी टोपली
४५) झाड
४७) मनाची फिरणारी इच्छा
४९) सरळ नसलेली, वक्र
५०) भीती, धमकी
५१) चेहरा, मुख
५२) अनुमती
५५) साखरेचा रस
५६) मोठा भाऊ
५७) नातेवाईक
५८) कर्णेंद्रिय
६०) पृथ्वी
६१) संध्याकाळ
६२) प्रतिष्ठित
६४) स्थिती, दशा
६६) बडबड्या
६७) तफावत, फरक
६९) गीत
७०) बारीक, मऊ केस
७१) बगळा
७३) सूर्याचे एक नाव
७४) केव्हा (ग्रा)

(उत्तर उद्याच्या अंकात)

मागील शब्दकोड्याचे उत्तर

सांबरकुंड धगधगते अग्निकुंड

सुयोग आंग्रे

पूर्वजांनी कसून ठेवलेली सुपीक जमीन आता कवडीमोल भावाने धरणासाठी संपादित करण्यात येणार आहे. महानवाडी, हान, खैरवाडी, जांभूळवाडी आणि सांबरडोह या वाड्यांमधील शेतकरी कुटुंबे भूमिहीन होणार आहेत या शेतकऱ्यांना आता उर्वरित आयुष्याची पुंजी म्हणून प्रकल्पग्रस्त सांबरकुंड मध्यम प्रकल्पाकडे पाहावे लागणार आहे. प्रकल्पग्रस्तांच्या डोळे पाणावणाऱ्या नजरेचा विचार करून शासनाने सकारात्मक निर्णय घेण्याची गरज निर्माण झाली आहे. शासन दरबारी सांबरकुंड मध्यम प्रकल्पाची करण्यात आलेली नोंद अर्थात तारीख कोणतीही असो पण आपल्या गावाच्या परिसरात धरण उभे राहणार असे सांगणारी चौथी पिढी आता धरणाच्या निर्मितीकडे डोळे लावून बसली आहे. धरण होणार म्हणजे जमिनी जाणार हे समीकरण असते. भूसंपादन करण्यासाठी शासन युद्धपातळीवर प्रयत्न करताना दिसते. सांबरकुंड धरणाच्या निर्मितीसाठी अपेक्षित असणारी जमीन संपादित करण्यासाठी शासनाने तगादा लावला आणि संपादित होणाऱ्या जमिनीच्या सात बारा उताऱ्यावर भूसंपादनात समाविष्ट असा शिक्कादेखील मारण्यात आला.

भूसंपादन शाखा म्हणून काम करणाऱ्या हेटवणे प्रकल्पातील कर्मचाऱ्यांचा या धरण निर्मितीमध्ये सिंहाचा वाटा आहे.या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी शासनाला अपेक्षित असणारे काम मूह मे राम आणि बगल मे छुरी या धोरणाने फत्ते केले. गावात साक्षर असणाऱ्या जनतेला नोटिसाचा धाक दाखवून आणि जमिनीचा मिळणाऱ्या मोबादल्याचे शस्त्र वापरून या सरकारी बाबूंनी आपली कामगिरी फत्ते केली. यासाठी त्यांनी महसूल प्रशासनाचा बेमालूमपणे वापर केला. भूसंपदनाबाबत नोटीस काढली की ती त्या खातेदाराने घेतली तर ठीक नाहीतर शेताच्या बांधावर नोटीस ठोकून ती बजावली जाईल असा अनपेक्षित असा धाक खातेदारांना दाखविण्यात आला. त्यामुळे नोटिसा बजावून शेतकऱ्यांना पुढे काय होणार हे कळेपर्यंत अंतिम निवडा जाहीर केला. तोपर्यंत शेतकऱ्यांना काही कळलेच नाही. जे जाणकार होते त्यांनी प्रत्येक नोटिसवर आपली हरकत नोंदवली आहे. ही जमेची बाजू असलीतरी आता धरण निर्मिती प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली आहे.

सांबरकुंड मध्यम प्रकल्प उभारण्याची घोषणा झाली तेव्हा त्या प्रकल्पाच्या उभारणीची किंमत ऐकून सारेच अवाक झाले होते. कारण त्यावेळी बांधकाम साहित्य अन्य यंत्रणांची लागणारी गरज फारशी खर्चिक नव्हती. कारण त्यावेळी महागाईचा भस्मासुर फोफावलेला नव्हता. २८ सप्टेंबर १९८२ मध्ये या प्रकल्पाच्या ११.७१ कोटींच्या मूळ अंदाजीत खर्चाला मान्यता देण्यात आली. मात्र, त्यानंतर प्रकल्प उभारण्यासाठी आवश्यक हालचाली झाल्या नाहीत. १३ वर्षांनी १९९५ मध्ये २९.७१ कोटी रुपये खर्चाची सुधारित मान्यता घेण्यात आली. आक्टोबर २००१ मध्ये ५०.४० कोटी रुपयांची तृतीय मान्यता घेण्यात आली. त्यानंतर २०१२-१३ मध्ये ३३५.९३ कोटी रुपयांचे प्रस्तावित अंदाजपत्रक तयार करण्यात येऊन ६ मे २०२० रोजी ७४२ कोटींची पाचवी मान्यता देण्यात आली आहे.आता धरण उभारणीसाठी प्रत्यक्ष कामाला गती येण्याचे संकेत मिळत आहेत. २०२० नंतर शासनाच्या हालचाली कूर्मगतीने सुरु राहिल्याने २०२६ मध्ये या प्रकल्पाच्या उभारण्याची किंमत निश्चितपणे १ हजार कोटींच्या पलिकडे जाणार आहे. हे कोण्या ज्योतिषाने सांगण्याची गरज नाही.

प्रकल्प उभारणी करण्यासाठी शासन दरबारी निधीला मान्यता घेण्यात येत आहे. परंतु शेतकऱ्यांच्या भू संपादनाचा मोबदला देण्याची वेळ आल्यावर शासन भू संपादनाचा थेट मोबदला देण्याचा विचार बाजूला सारून सानुग्रह अनुदानावर अधिक जोर देत आहे. सानुग्रह अनुदान म्हणजे भीक नको पण कुत्र आवर अशी परिस्थिती असते. तुम्हाला अधिक मोबदला मिळविण्यासाठी न्यायालयात जाता येणार की नाही याची शाश्वती प्रकल्पग्रस्तांना नसते. सांबरकुंड मध्यम प्रकल्पासाठी जांभूळवाडी, खैरवाडी, सांबरकुंडवाडी, महानवाडी आणि महान गावातील शेतकऱ्यांच्या १०३.८१ हेक्टर जागेचे भूसंपादन करण्यात येणार आहे. यामध्ये खरीप ५२.०९ हेक्टर, वरकस ३९.४६ हेक्टर, पोट खराब १२.२६ हेक्टर जमिनींचा समावेश आहे. प्रकल्पामुळे जांभूळवाडी, खैरवाडी, सांबरकुंडवाडी या तीन वाड्यांवरील २०८ कुटुंबांचे पुर्नवसनही करावे लागणार आहे. यामध्ये विस्थापित होणाऱ्या कुटुंबांमध्ये सार्वधिक घरे आदिवासी बांधवांची आहेत.

शासन खास करून भूसंपादन शाखा यांनी शेतकऱ्यांना संभ्रमात ठेवण्यासाठी टोकाचे प्रयत्न केलेले पाहावयास मिळत आहेत. जमिनीचा मोबदला मिळवायचा असेल तर शासनाला पत्र पाठवावे लागेल. अंतिम निवाडा झाल्यावर काहीही करता येत नाही. तुम्हाला मिळणार जमिनीचा मोबदला घेऊन नंतर नायायालयात जावे लागेल तेव्हा तुमहाला वाढीव मोबदला मिळू शकतो असे अनेक पर्याय शासकीय यंत्रणाच प्रकल्पग्रस्तांना देत आहेत. हे विशेष आणि सांगताना आम्हाला तुमचे नुकसान कायचे नाही असे हळूच बोलत आहेत. भारतीय संविधान आणि अभिव्यती स्वातंत्र्य याचा आधार घेतला तर लोकांनी लोकांसाठी लोकांच्याकरिता चालविलेले राज्य म्हणजे लोकशाही असे आपण ठाम सांगत असू तर कायद्यात थोडा बदल किंवा पळवाट काढता येणे सरकारला सहज जमणारे आहे. त्यासाठी खरेतर लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेऊन सत्तेच्या नावाची पांघरलेली उदासीनतेची शाल बाजूला सारून जनतेसाठी पुढाकार घ्यायला हवा. शेवटी सभागृहात धरणात संपादित होणाऱ्या जमिनीसाठी दिला जाणारा मोबदला वाढविण्यासाठीच्या हालचाली करता येणे शक्य आहे.

धरणाच्या उभारणीसाठी लागणारी यंत्रणा हळूहळू धरणक्षेत्रात येण्यास सुरुवात झाली आहे. परंतु अद्याप प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना जमिनीचा अपेक्षित मोबदला मिळालेला नाही. शेतकऱ्यांना हा मोबाइल मिळवून देण्यासाठी आता अहिंसात्मक कायदेशीर लढा उभारण्यासाठी झटावे लागणार आहे. शासनाला आपले म्हणणे कायद्याच्या चाकोरीत राहून पटवून द्यावे लागणार आहे. या धारण प्रकल्पामध्ये शेकडो शेतकरी भूमिहीन होणार आहेत. ज्यांचा उदरनिर्वाह शेती हाच आहे. त्यांचे जगण्याचे साधनच त्यांच्यापासून हिरावून घेतले तर त्यांना आत्महत्या करणे किंवा भिक्षुकी करणे हाच शेवटचा पर्याय आहे. कारण आजही काही कुटुंबे मोलमजुरी करून आपले पोट भरत आहेत. अचानक शेतीचा सोनार पर्याय त्यांच्यापासून हिरावून घेतला वाजणार आहे. त्याबदल्यात त्यांना मोबदला शासन देणार आहे. परंतु हा मोबदला देताना शेतकऱ्यांच्या भविष्याचा विचार शासनाने करण्याची गरज निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांना उदरनिर्वाहासाठी मिळणार जमिनीचा मोबदला पुरेसा नाही हे शासनाने लक्षात घ्यायला हवे. प्रकल्पग्रस्त असणाऱ्या शेतकऱ्यांना आपले कुटुंब जगवण्यासाठी निश्चितपणे मोलमजुरी करण्यासाठी अन्य ठिकणी स्थलांतर करावे लागणार आहे. म्हणजेच स्वतःच्या घराचे वासे जाळून कोळशाचा व्यापार केल्यासारखा हा प्रकार आहे. प्रकल्पग्रस्तांना आता भूसंपादन मोबदल्याचे वेध लागले आहेत. पण भू संपादनाचा हा मोबदला देताना शासन कोणती वर्गवारी लावणार हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. कागदोपत्री व्यवहार म्हणजे सुरु असलेला रेडीरेकनर दर याचा शासन विचार करणार आणि त्याच्या चार पट मोबदला बाधितांना देणार असा नियम आहे. परंतु रेडीरेकनरच्या दर हा केवळ कागदोपत्री आहे. कागदांच्या पलीकडे ब्लॅकने चालणाऱ्या व्यवहाराचा खरा विचार प्रकल्पग्रस्तांसाठी शासनाने करायला हवा म्हणजे सांबरकुंड माध्यम प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांना १० लाख रुपये गुंठा भूसंपादनाचा मोबदला मिळू शकेल परंतु त्याचा धोरणात्मक निर्णय व्हायला हवा. परंतु नेमके चांगले निर्णय पटलावर येऊन शिक्कामोर्तब होण्यास अवधी लागतो. म्हणजेच पुन्हा सरकारी काम आणि सहा महिने थांब अशीच काहीशी परिस्थिती सांबरकुंड प्रकल्पग्रस्तांची झाली आहे. भूसंपादनाचा वाढीव मोबदला मिळावा अशी मागणी प्रकल्पग्रस्तांनी केली आहे. काही प्रकल्पग्रस्तांनी न्यायालयात याचिका दाखल केली आहे. तर काहींनी प्रशासनामार्फत थेट मुख्यमंत्र्यांच्या दरबारात भूसंपादन मोबदल्याचा विषय चर्चेला आणण्यासाठी महसूल प्रशासनची मदत घेतली आहे. सप्टेंबर महिन्याच्या दुसऱ्या पंधरवाड्यापर्यंत मोबदल्याचा विषय सानुग्रह अनुदानाच्या मधाळ शब्दाने मार्गी लावण्याचा प्रयत्न शासनाचा आहे. प्रकल्पग्रस्त असणाऱ्या खातेदारांपैकी किती जणांना हा सानुग्रह अनुदानाचा मार्ग पचनी पडतो हा संशोधनाचा भाग आहे. मोबदला घ्या आणि न्यायालयात जा असा फंडा अनेकदा शासनाकडून वापरला जातो. परंतु सानुग्रह अनुदान हा शब्द प्रकल्पग्रस्तांच्या मोबदल्याचा लावण्यात आला तर प्रकल्पग्रस्तांना न्याय मागणीसाठी न्यायालयात जाण्याची संधी उपलब्ध असणार कि नाही हे देखील कटाक्षपूर्व पाहणे गरजेचे बनणार आहे.

पूर्वजांनी घाम गाळून तयार केलेली शेती आता कवडीमोल भावाने शासन खरेदी करणार आहे. हे लक्षात आल्याने इतके दिवस मॅच धरणाला विरोध नाही पण आमच्या मागण्या मान्य करा. असा सूर लावणाऱ्या प्रकल्पग्रस्तांनी आता प्रकल्पच नको अशी नकार घंटा वाजविण्यास सुरुवात केली आहे. सांबरकुंड प्रकल्पात पाच गावांमधील शेतकरी बाधित होणार आहेत. तर काही अलिबाग तालुक्यातील अनेक प्रतिष्ठित आणि विचारवंत देखील या प्रकल्पत बाधित होणार आहेत. प्रकल्पाला गती मिळाली तेव्हा सर्व खातेदारांनी भूसंपादन मोबदला वाढीव दराने द्यावा अशी मागणी केली होती. शासनाच्या धोरणांवर प्रकाश पडू लागल्यानंतर भूमिहीन होणाऱ्या शेतकऱ्यांनी दबकून पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. घरांवर नांगर फिरवून तालुका हरित होणार असेलतर त्याला विरोध आहे. अशी ठाम भूमिका भूमिहीन होणाऱ्या शेतकऱ्यांना घ्यावी लागणार आहे. जमिनीच्या बदल्यात जमीन द्या, प्रकल्पात भागीदार करून घ्या, शेतकऱ्यांना शासकीय नोकरदाराप्रमाणे पेन्शन द्या,प्रकल्पग्रस्तांना शासकीय सेवेत नोकरी द्या, आद्योगिक क्षेत्रातील उद्योगांमध्ये कायमस्वरूपी नोकरी द्या, प्रकल्पग्रस्त महिलांना रोजगाराच्या संधी द्या, अशा मागण्या शासनाला ठणकावून सांगाव्या लागणार आहेत. पैसे हि गरज आहे आणि शेती हि उपजीविका आहे शेती हा रोजगार नाही हे लक्षात घेऊन शासनाने सांबरकुंड प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांचा प्राधान्य पूर्वक विचार करायला हवा. कारण शासनाने प्रकल्प जाहीर केला त्या दिवसापासून आम्हाला प्रकल्प हवा आहे फक्त आमच्या मागण्या मान्य करव्या असे बोल पाच गावातील प्रकल्पग्रस्तांचे होते. आजही तेच आहेत. परंतु प्रकल्पग्रस्तांच्या चांगुलपणाचा शासनाने गैरफायदा घेतल्याचे चित्र आहे.

प्रकल्प मंजूर झाला त्या दिवसापासून अंतिम निवाडा होईपर्यंत प्रकल्पग्रस्तांना शासनाबरोबर चर्चा करण्याची संधीच भूसंपादन करणाऱ्या शाखेने दिली नाही असा आरोप शेतकरी करीत आहेत. नोटीस घ्या नाहीतर आमही शेताच्या बांधावर घराच्या भिंतींवर लावून जाऊ आणि तुमचा होकार कळवू अशा भीतीदायक शब्दांनी प्रकल्पग्रस्तांचे प्रशासनाने खच्चीकरण केले. मुळात प्रकल्प यावा अशा सकारात्मक भूमिकेत प्रकल्पग्रस्त असताना त्यांना शाब्दिक खेळात गुंतवण्यात आले. वृत्तपत्रांमध्ये नोटीस प्रसिद्ध झाल्या त्या कधीच प्रकल्पग्रस्त गावांमध्ये वाचून दाखविल्या असतील याची माहिती अनेक शेतकऱ्यांना नाही. येणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी कोणत्या कागदावर स्वाक्षरी घेतली याचा थांगपत्ता अद्याप प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना लागलेला नाही. यामुळे अंतिम निवड कधी झाला याचा मागमूस शेतकऱ्यांना नाही. बोटावर मोजण्याइतक्या वेळा प्रशासन प्रकल्पग्रस्तांच्या दारात आले. मागण्यांचे निवेदन सादर केल्यावर प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी प्रकल्पग्रस्तांकडे पहिलेदेखील नाही. या शासनाच्या धोरणाविरोधात प्रकल्पग्रस्तांनी रान पेटवण्याचा निर्धार केला आहे. आता नाही तर कधीच नाही हि गंभीर बाबा लक्षात घेऊन प्रकल्पग्रस्तांसोबत आता तरुणाई लढण्यासाठी सज्ज झाली आहे. आता प्राण गेले तरी बेहत्तर पण प्रकल्पाला जमीन देणार नाही असा पण क्रांतिदिनाच्या दिवशी प्रकल्पग्रस्तांनी केला आहे. प्रकल्प आणायचा असेलतर प्रकल्पग्रस्तांना सोबत घेऊनच चर्चा करून प्रकल्प उभारणी करावी अन्यथा शासन गो बॅक असा नारा देण्याचा निर्धार करण्याची हीच वेळ आहे. यासाठी प्रकल्पग्रस्तांच्या अस्तित्वाच्या लढाईला एकजुटीने सुरुवात झाली आहे. ●

जिथे जमीन जिरते, तिथेच भविष्य टिकते

प्रियंका सावंत

गेल्या दशकापासून वास्तुकला आणि बांधकाम क्षेत्रात आंतरराष्ट्रीय स्तरावर काम करताना विकासाचे बदललेले वारे मी जवळून अनुभवले आहेत. मुंबई आणि नवी मुंबईचा विस्तार आता वेगाने रायगड आणि पर्यायाने संपूर्ण कोकणच्या भू-दृश्याला कवेत घेत आहे. वेगाने वाढणारे रस्ते, प्रस्तावित रो-रो सेवा आणि वाढती दळणवळणाची साधने यामुळे कोकण आता केवळ पर्यटनस्थळ राहिलेले नाही, तर गुंतवणूक आणि सेकंड होम्सचे नवे केंद्र बनत आहे. मात्र या वेगवान विकासाच्या वाटचालीत निसर्गरम्य कोकण काँक्रिटीकरणाच्या खाली दबला जाऊ नये, याची काळजी घेणे ही केवळ प्रशासनाची किंवा विकासकांची जबाबदारी नाही ती प्रत्येक नागरिकाची आहे. समुद्र, खाड्या, नद्या, मोकळी जमीन, माती आणि भूजलाची नैसर्गिक व्यवस्था जपली, तरच कोकणाचे सौंदर्य आणि भवितव्य टिकेल. कारण घरं आपण उभी करू, पण त्यांना श्वास देणारी माती, पाणी आणि हिरवाई हीच तर कोकणाची खरी ओळख आहे.

२१ ऑगस्ट हा दिवस महाराष्ट्रात 'जलसंवर्धन दिन' म्हणून साजरा केला जातो. माजी मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांनी दिलेला 'पाणी अडवा, पाणी जिरवा' हा मंत्र आज कोकणच्या संदर्भात नव्या स्वरूपात मांडण्याची गरज आहे. कारण, जिथे जमीन जिरते, तिथेच भविष्य टिकते.

कोकणात पाऊस भरपूर पडतो, हे सत्य आहे. वर्षाला साधारण २२००-३६०० mm पर्जन्यवृष्टी होणाऱ्या या प्रदेशात, कोविडनंतर झपाट्याने विकसित झालेल्या भागांमध्ये एप्रिल-मे महिन्यात पाण्याचे टँकर का लागतात? हा प्रश्न केवळ नियोजनाचा नाही; तो आपल्या मानसिकतेचा आहे. आपण विकासाकडे कसे पाहतो, याचा आहे. आपण आपल्या वसाहतींची रचना 'नैसर्गिक परिसंस्था' म्हणून न करता 'यंत्रासारखी' करत आहोत. छतावर पडणारे पाणी पाईपमधून बाहेर, अंगणातील पाणी गटारात आणि जमिनीवर सिमेंटचा थर पाऊस पडतो खरा, पण त्यातील पाणी जमिनीत मुरण्याआधीच आपण ते 'रन-ऑफ' म्हणून दूर वाहून नेतो. पाऊस कमी नाही; आपण त्याला थांबवून ठेवत नाही. आणि म्हणूनच बदलाची सुरुवात कुठल्यातरी यंत्रणेकडून नव्हे, तर आपल्या प्रत्येकाच्या अंगणातून, आपल्या प्रत्येकाच्या विचारातून झाली पाहिजे. वास्तुविशारद म्हणून मी विचारते आपण कसे बांधावे? कायदेतज्ज्ञ म्हणून विचारते आपल्याला काय बांधण्याची परवानगी आहे? पण आज या दोन्ही प्रश्नांच्या पलिकडे जाऊन आणखी एक प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे. बांधकाम झाल्यानंतर त्या जमिनीवर पडणाऱ्या पाण्याचे काय होते?

महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम, २००९ आणि UDCPR मधील तरतुदींनुसार मोठ्या प्रकल्पांमध्ये पावसाच्या पाण्याचे संवर्धन व Rainwater Harvesting यांना महत्त्व दिले गेले आहे. मात्र ही व्यवस्था केवळ नकाशावर किंवा कागदोपत्री राहून उपयोग नाही; तिची प्रत्यक्ष अंमलबजावणी तितकीच महत्त्वाची आहे. मोठ्या प्रकल्पांसाठी असलेली ही संकल्पना जर लहान-मोठ्या प्रत्येक विकासात आपल्या क्षमतेनुसार रुजवली, तर पाण्याची वाढती मागणी आणि उपलब्ध जलस्रोत यांच्यातील समतोल साधणे शक्य होईल. विशेषतः कोकणासारख्या संवेदनशील किनारी प्रदेशात, जिथे भूजलपातळी खालावल्यास समुद्राचे खारे पाणी भूजलात शिरण्याचा धोका असतो, तिथे केवळ 'बिल्डिंग प्लॅन' मंजूर करून घेणे पुरेसे नाही. त्या बांधकामाने जमिनीची पाणी साठवण्याची आणि जिरवण्याची क्षमता किती जपली, हाही विकासाचा महत्त्वाचा निकष झाला पाहिजे.

विकासकांनी पर्यावरणपूरक सुविधा द्याव्यात, यासाठी बाजारात त्यांची मागणी निर्माण झाली पाहिजे. आणि ही मागणी केवळ मोठ्या क्लब हाऊसची, सुंदर लँडस्केपिंगची किंवा काँक्रिटवर मातीचा थर टाकून तयार केलेल्या हिरव्यागार लॉनची नसावी. ग्राहक म्हणून आपण प्रश्न विचारायला सुरुवात केली, तर विकासाची दिशाही बदलू शकते. आपल्या घरासोबत पाणी, माती आणि निसर्गासाठी काय केले आहे, हे विचारणे हीच खरी पर्यावरणीय जबाबदारी आहे.

१. पावसाच्या प्रत्येक थेंबाचा हिशोब आहे का?

कोकणात एका गुंठ्याच्या प्लॉटवर वर्षाला साधारण २.४ लाख लिटर पाऊस पडू शकतो. १०० प्लॉटचा विचार केला, तर हे प्रमाण कोट्यवधी लिटरपर्यंत जाते. हे पाणी छतावरून योग्य प्रकारे संकलित करून गाळून जमिनीत मुरवले किंवा आवश्यकतेनुसार साठवले, तर प्रत्येक प्रकल्प स्वतःची एक छोटी जलव्यवस्था उभी करू शकतो.

२. 'वॉटर बॅलन्स' कुठे आहे?

केवळ पाण्याचे कनेक्शन मिळणे म्हणजे विकास नव्हे. प्रकल्पाला किती पाणी लागणार, किती सांडपाणी निर्माण होणार आणि त्यातील किती पाण्यावर प्रक्रिया करून पुन्हा वापरले जाणार याचा स्पष्ट 'वॉटर बॅलन्स' असणे गरजेचे आहे.

३. जमीन श्वास घेतेय का?

संपूर्ण प्लॉट काँक्रिटने झाकणे म्हणजे स्वच्छ आणि विकसित परिसर असे नाही. उलट, त्यामुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरण्याचा मार्ग बंद होतो. 'पर्मिएबल पेव्हिंग', 'ग्रास पेव्हर्स' आणि मोकळी माती यांचा वापर करून जमिनीला पाणी शोषण्याची संधी दिली पाहिजे.

४. नैसर्गिक प्रवाहांचा आदर केला आहे का?

कोकणभर अनेक नैसर्गिक नाले, ओहोळ आणि पाण्याचे प्रवाह आहेत. विकासाच्या नावाखाली हे

मार्ग बुजवणे किंवा अडवणे म्हणजे पाण्याला त्याचा नैसर्गिक मार्ग नाकारणे आणि भविष्यातील जलसंकट व पूरस्थितीला आमंत्रण देणे होय.

५. ग्राहक म्हणून आपण हा प्रश्न विचारणार का?

फ्लॅट, बंगला, फार्महाऊस किंवा सेकंड होम घेताना आपण किती एफएसआय, किती सुविधा, किती मोठे क्लब हाऊस किंवा किती सुंदर लॉन आहे, हे विचारतो. आता त्यासोबत एक प्रश्न आवर्जून विचारूया या प्रकल्पात पावसाचे पाणी जमिनीत मुरवण्यासाठी आणि पाण्याची बचत करण्यासाठी नेमके काय केले आहे?

कारण ज्या गोष्टीची मागणी ग्राहक करतो, तीच बाजारपेठ पुरवते. आपण निसर्गाची मागणी केली, तर विकासाची व्याख्याही हळूहळू बदलू शकते.

कोकणची खरी संपत्ती त्याचे समुद्रकिनारे, माती, पाणी आणि हिरवाई आहे. जमिनीची पाणी शोषण्याची क्षमता हरवली, तर कोकणचे हे अमूल्य स्वरूपही हरवेल. जर विकासामुळे जलस्रोतांवर ताण येत असेल, नैसर्गिक पाण्याचे प्रवाह अडत असतील किंवा जमिनीची पाणी मुरवण्याची क्षमता हरवत असेल, तर सर्व नियमांचे पालन करून उभी राहिलेली इमारत किंवा झालेला विकासही खऱ्या अर्थाने शाश्वत ठरत नाही. कोकणच्या विकासाला विरोध नाही; पण हा विकास निसर्गाच्या किंमतीवर होऊ नये, एवढाच आग्रह आहे. निसर्गाशी जुळवून घेतलेला विकासच खऱ्या अर्थाने विकास ठरेल. ज्यामुळे उद्याची पिढीही याच कोकणात सुखाने, सुरक्षितपणे आणि निसर्गाच्या सान्निध्यात जगू शकेल.

आणि ही जबाबदारी कुणा एकाची नाही, तर आपल्या प्रत्येकाची आहे! या जलसंवर्धन दिनी, आपणही आपला छोटासा वाटा उचलूया. कारण जिथे जमीन जिरते, तिथेच भविष्य टिकते!

लेखिकेविषयी

प्रियांका सावंत या अलिबागस्थित आर्किटेक्ट, व्हॅल्युअर आणि लँड डेव्हलपमेंट कायदेविषयक रणनीतीकार आहेत. वास्तुकला, जमीनविषयक कायदे आणि पर्यावरणपूरक रिअल इस्टेट विकास यांच्या संगमावर त्या कार्यरत आहेत. दशकाहून अधिक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय अनुभवातून त्या डिझाइन, कायदा आणि जमीन या तिन्ही दृष्टिकोनांना एकत्र आणतात. कोकणातील बदलते भू-दृश्य, किनारी पर्यावरण आणि विकासाच्या वाढत्या गरजा यांचा समतोल साधणाऱ्या कायदेशीरदृष्ट्या सक्षम, पर्यावरणपूरक आणि शाश्वत विकासाचा त्या पुरस्कार करतात. ●

विद्यार्थी शिकण्याची जबाबदारी नेमकी कोणाची?

सुनील गवळी

शिक्षणव्यवस्थेबद्दल चर्चा करताना आपण अनेक प्रश्न विचारतो की शिक्षक योग्य पद्धतीने शिकवतात का? अभ्यासक्रम योग्य आहे का? पालक मुलांकडे पुरेसे लक्ष देतात का? शाळेतील वातावरण चांगले आहे का? परीक्षा पद्धती योग्य आहे का? विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा मिळतात का? हे सर्व प्रश्न निश्चितच महत्त्वाचे आहेत. मात्र या सर्व प्रश्नांच्या केंद्रस्थानी असलेला एक अत्यंत मूलभूत प्रश्न आपण अनेकदा विसरतो की "विद्यार्थ्याच्या शिकण्याची खरी जबाबदारी नेमकी कोणाची?"

या प्रश्नाचे उत्तर केवळ शिक्षक, पालक, शाळा किंवा शिक्षणव्यवस्था यांच्यापैकी कोणत्याही एका घटकावर टाकता येणार नाही. शिक्षण ही सामूहिक प्रक्रिया असली, तरी शिकणे ही विद्यार्थ्याची वैयक्तिक जबाबदारी आहे. शिक्षक शिकवू शकतो, पालक आधार देऊ शकतात, शाळा वातावरण निर्माण करू शकते आणि समाज प्रेरणा देऊ शकतो; पण शेवटी शिकण्याची कृती विद्यार्थ्यालाच करावी लागते. म्हणूनच आपल्या शिक्षणपद्धतीच्या केंद्रस्थानी हा विचार रुजवण्याची गरज आहे.

आपण अनेकदा म्हणतो, "शिक्षकाने खूप चांगले शिकवले." पण त्यानंतर लगेच एक प्रश्न विचारायला हवा की "विद्यार्थ्याने किती शिकले?" कारण शिकवणे ही शिक्षकाची प्रक्रिया आहे; परंतु शिकणे ही विद्यार्थ्याची प्रक्रिया आहे. शिक्षक ज्ञान समोर ठेवू शकतो, उदाहरणे देऊ शकतो, प्रयोग दाखवू शकतो, प्रश्न विचारू शकतो, शंका दूर करू शकतो आणि प्रेरणा देऊ शकतो. परंतु विद्यार्थ्याने स्वतः विचार केला नाही, वाचले नाही, सराव केला नाही, प्रश्न विचारले नाहीत आणि चुका सुधारल्या नाहीत, तर शिक्षणाची प्रक्रिया पूर्ण होत नाही.

म्हणूनच शिक्षणव्यवस्थेचे केंद्र "शिक्षक काय शिकवतो?" यापेक्षा "विद्यार्थी स्वतः काय शिकतो?" या प्रश्नाकडे वळले पाहिजे.

याच ठिकाणी 'जबाबदार धरणे' आणि 'जबाबदारी स्वीकारणे' यातील फरक समजून घेणे आवश्यक आहे. विद्यार्थ्याला अभ्यासासाठी सतत सांगणे, गृहपाठ तपासणे, परीक्षा घेणे, गुण देणे, शिक्षा करणे किंवा बक्षिसे देणे ही बाह्य नियंत्रणाची साधने आहेत. यामुळे विद्यार्थी जबाबदार धरला जाऊ शकतो. परंतु खरे शिक्षण तेव्हा सुरू होते जेव्हा विद्यार्थी स्वतः म्हणतो की "मला हे समजून घ्यायचे आहे. मला हे शिकायचे आहे. मला माझ्यात सुधारणा करायची आहे. माझ्या अपयशासाठी दुसऱ्याला दोष न देता मी स्वतः प्रयत्न करणार आहे."

हीच जबाबदारी स्वीकारण्याची अवस्था आहे. आपल्या शिक्षणव्यवस्थेचे अंतिम उद्दिष्ट विद्यार्थ्याला सतत बाह्य नियंत्रणाखाली ठेवणे नसून त्याच्यामध्ये स्व-अनुशासन, स्व-अध्ययन आणि आत्मजबाबदारी निर्माण करणे असले पाहिजे.

आज ज्ञानाची साधने विद्यार्थ्यांच्या हातात मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. पुस्तके, ग्रंथालये, डिजिटल साधने, शैक्षणिक व्हिडिओ, प्रयोग, तंत्रज्ञान आणि विविध ज्ञानस्रोत यामुळे शिकण्याच्या संधी वाढल्या आहेत. मात्र साधने उपलब्ध असणे आणि त्यांचा प्रभावी वापर करून शिकणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. त्यामुळे शाळांनी विद्यार्थ्याला केवळ अभ्यासक्रम पूर्ण करून देण्याऐवजी स्वतः शिकण्याची पद्धत शिकवली पाहिजे.

विद्यार्थ्याला हळूहळू स्वतःला प्रश्न विचारण्याची

सवय लागली पाहिजे, मला काय शिकायचे आहे? मला ते का शिकायचे आहे? मी ते कसे शिकणार? मला कुठे अडचण येत आहे? ती अडचण दूर करण्यासाठी मी कोणता प्रयत्न केला? मला काय समजले? अजून काय समजून घ्यायचे आहे? माझ्या शिकण्याचे मूल्यांकन मी स्वतः कसे करणार? या प्रश्नांची उत्तरे विद्यार्थी स्वतः शोधू लागला तर शिक्षणाची दिशा बदलू शकते. कारण तेव्हा विद्यार्थी केवळ परीक्षेपुरता विद्यार्थी राहत नाही; तो आयुष्यभर शिकणारा व्यक्ती बनू लागतो.

यामध्ये शिक्षकाची भूमिका कमी होत नाही; उलट ती अधिक व्यापक आणि अधिक महत्त्वाची होते. शिक्षक हा केवळ माहिती देणारा नसून मार्गदर्शक, प्रेरक, प्रश्ननिर्माता, निरीक्षक, समुपदेशक आणि शिकण्याचा सहप्रवासी असला पाहिजे. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर शिक्षकाने देण्याऐवजी विद्यार्थ्याला उत्तर शोधण्यासाठी प्रवृत्त करणे आवश्यक आहे. "याचे उत्तर काय?" याऐवजी "तुला काय वाटते?", "तू स्वतः हे कसे तपासशील?", "दुसरा कोणता मार्ग असू शकतो?" असे प्रश्न विचारले तर विद्यार्थ्याची विचारशक्ती विकसित होते.

शिक्षकाने उत्तर देण्यापेक्षा प्रश्न विचारण्याची संस्कृती निर्माण केली पाहिजे. कारण उत्तर मिळालेला विद्यार्थी एखादा प्रश्न सोडवतो; पण प्रश्न विचारायला शिकलेला विद्यार्थी आयुष्यभर शिकत राहतो.

"किती गुण मिळाले?" या प्रश्नाबरोबर "आज काय नवीन शिकला?", "तुला कोणता प्रश्न पडला?", "कुठे अडचण आली?", "ती अडचण सोडवण्यासाठी तू काय केलेस?" असे प्रश्नही विचारले गेले पाहिजेत. गुणांपेक्षा प्रयत्न, कुतूहल, सातत्य, स्व-अनुशासन आणि शिकण्याची वृत्ती यांचे कौतुक झाले पाहिजे.

पालकांनी मुलासाठी अभ्यास करण्याची गरज नाही; मुलाला स्वतःचा अभ्यास करण्यास सक्षम बनवण्याची गरज आहे.

जबाबदारी ही केवळ भाषणातून शिकवता येत नाही. "जबाबदार बना" असे सांगण्यापेक्षा विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष जबाबदारीची कामे दिली पाहिजेत. वर्गातील पुस्तकांचे व्यवस्थापन, ग्रंथालयाचा वापर, परिसर स्वच्छता, शैक्षणिक साहित्याची देखभाल, वृक्षसंवर्धन, पाण्याची बचत, शाळेतील विविध उपक्रमांचे नियोजन, सहाध्यायांना मदत, समूहकार्य, लहान प्रकल्प आणि सामाजिक उपक्रम यामध्ये विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग असावा.

अशा अनुभवातून मुलाला एक महत्त्वाची जाणीव होते की "माझ्या कृतीचा परिणाम इतरांवर होतो." याच जाणिवेतून सामाजिक जबाबदारी, कर्तव्यभावना आणि नागरिकत्वाची जाणीव निर्माण होते.

विद्यार्थ्यांना स्वतःच्या अभ्यासाचे नियोजन करण्याची सवयही शाळेने लावली पाहिजे. आज मला काय शिकायचे आहे? या आठवड्यात माझे उद्दिष्ट काय आहे? माझ्या कोणत्या विषयात अडचण आहे? मी त्यासाठी कोणती मदत घेणार? माझे उद्दिष्ट पूर्ण झाले का? काय सुधारणा आवश्यक आहे? अशा प्रश्नांच्या माध्यमातून विद्यार्थ्याला स्वतःच्या शिकण्याचे नियोजन आणि स्वमूल्यांकन करता आले पाहिजे.

अभ्यासाचे वेळापत्रक शिक्षकाने दिलेले असण्यापेक्षा ते स्वतः तयार करण्याची सवय विद्यार्थ्याला अधिक सक्षम बनवते.

परीक्षेच्या बाबतीतही आपल्या दृष्टिकोनात बदल करण्याची गरज आहे. परीक्षा म्हणजे केवळ गुण मिळवण्याचे साधन नाही. परीक्षा विद्यार्थ्याला स्वतःकडे पाहण्याची संधी देणारी असावी. मला काय येते? काय येत नाही? मी कुठे चुकलो? माझ्या शिकण्याच्या पद्धतीत काय बदल करायला हवा? या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी परीक्षा उपयोगी पडली पाहिजे.

गुण महत्त्वाचे आहेत; परंतु ते शिक्षणाचे अंतिम उद्दिष्ट नाहीत. एखादा विद्यार्थी चांगले गुण मिळवतो, पण स्वतः विचार करू शकत नाही, निर्णय घेऊ शकत नाही, समस्या सोडवू शकत नाही किंवा नवीन परिस्थितीत शिकू शकत नाही, तर त्याचे शिक्षण अपूर्ण आहे. याउलट एखादा विद्यार्थी स्वतः प्रश्न विचारतो, उत्तर शोधतो, चुका स्वीकारतो, प्रयत्न करतो, अपयशातून शिकतो आणि नवीन गोष्ट आत्मसात करण्याची क्षमता विकसित करतो, तर तो जीवनासाठी अधिक सक्षम होत असतो.

म्हणूनच शिक्षणाचा खरा मापदंड "विद्यार्थ्याला किती माहिती आहे?" एवढाच नसून "विद्यार्थी नवीन माहिती स्वतः किती प्रभावीपणे शिकू शकतो?" हा असला पाहिजे.

शिक्षणातील सर्वांत मोठा बदल विद्यार्थ्याच्या मानसिकतेत घडवून आणण्याची गरज आहे. "शिक्षक मला शिकवतील" याऐवजी "मी शिकणार आहे आणि शिक्षक मला मार्गदर्शन करतील" ही मानसिकता निर्माण झाली पाहिजे. "पालकांनी मला अभ्यासाला बसवावे" याऐवजी "माझ्या अभ्यासाची जबाबदारी माझी आहे" ही जाणीव निर्माण झाली पाहिजे. "परीक्षेसाठी अभ्यास करायचा" याऐवजी "माझ्या भविष्यासाठी मला शिकायचे आहे" हा विचार रुजला पाहिजे.

यासाठी आपल्या शैक्षणिक पद्धतीचे एक सुंदर सूत्र असू शकते ते असे की.....

शिक्षक दिशा देईल.
पालक आधार देईल.
शाळा संधी देईल.
समाज मूल्ये देईल.

आणि विद्यार्थी शिकण्याची जबाबदारी स्वीकारेल. या पाचही घटकांची भूमिका स्पष्ट झाली तर शिक्षणातील अनेक गैरसमज दूर होऊ शकतात.

शेवटी पुन्हा तोच प्रश्न समोर येतो की "विद्यार्थ्याच्या शिकण्याची जबाबदारी नेमकी कोणाची?"

उत्तर असे नाही की फक्त शिक्षकाची. फक्त पालकांचीही नाही. फक्त शाळेचीही नाही. ती सर्वांची आहे; पण प्रत्येकाची भूमिका वेगळी आहे. ●

कष्टाचे मोल...आणि भपकेबाजपणा...!!

धनंजय शेटये

मुलांना पैसा नव्हे, पैशाची किंमत शिकवा
संस्कारांची श्रीमंती हीच खरी जीवनाची शिदोरी!

आजच्या झगमगत्या आणि स्पर्धेच्या युगात प्रत्येक पालकाचे स्वप्न असते "आपल्या मुलांनी आपल्यापेक्षा चांगले जीवन जगावे." हे स्वप्न चुकीचे नाही; उलट ते प्रत्येक आई-वडिलांच्या प्रेमातून जन्माला आलेले असते. पण या प्रेमाला जर विवेकाची जोड मिळाली नाही, तर नकळत आपण मुलांच्या गरजा आणि हट्ट यांच्यातील सीमारेषाच पुसून टाकतो.

आपण कष्टाने कमावलेला पैसा मुलांच्या सुखासाठी खर्च करतो; त्यांच्या प्रत्येक मागणीला होकार देतो; त्यांना हवे ते मिळवून देतो. पण एक प्रश्न आपण स्वतःला विचारला पाहिजे.

"आपण मुलांना सुख देत आहोत की सुखाची सवय लावत आहोत?"

हा प्रश्न आज प्रत्येक पालकाने स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे. मुलांना आपल्या परिस्थितीची जाणीव करून द्या.

आपल्या मुलांना आपल्या कुटुंबाची परिस्थिती, पैसा कमावण्यासाठी केलेले कष्ट आणि त्यामागचा संघर्ष समजायला हवा. याचा अर्थ मुलांना सतत "आम्ही गरीब होतो, आम्ही हे केले, आम्ही ते केले" असे सांगून अपराधी भावना निर्माण करणे नव्हे. तर त्यांना एवढे नक्की शिकवले पाहिजे की, पैसा झाडाला लागत नाही. पैसा कमविण्यासाठी वेळ द्यावा लागतो, श्रम करावे लागतात, जबाबदाऱ्या पेलाव्या लागतात.

आज पालकांच्या हातात मोबाईल, ऑनलाइन व्यवहार आणि सहज उपलब्ध असलेल्या सुखसोयी आहेत. त्यामुळे पैशाचा प्रवास मुलांना दिसत नाही. एखादी वस्तू हवी झाली की ती मागायची आणि काही दिवसांत ती हातात येते. त्यामुळे त्या वस्तूमागे आई-वडिलांनी किती वेळ, श्रम आणि त्याग केला आहे, याची जाणीव अनेकदा होत नाही. म्हणूनच मुलांना पैशाचा उपभोग शिकवण्यापेक्षा पैशाचा सदुपयोग शिकवणे अधिक महत्त्वाचे आहे. गरज आणि हौस यातील फरक शिकवा मुलांनी एखादी वस्तू मागितली की लगेच ती घेऊन देण्यापूर्वी एक छोटासा प्रश्न विचारायला हवा, "ही वस्तू तुला खरंच आवश्यक आहे का?" गरज, इच्छा आणि हट्ट यातील फरक मुलांना बालपणापासून समजला पाहिजे.

कारण आजचा छोटासा हट्ट उद्या मोठ्या अपेक्षेत बदलू शकतो. अपेक्षा पूर्ण झाली नाही की चिडचिड, अस्वस्थता, राग आणि संघर्ष वाढू शकतो. मुलाला प्रत्येक वेळी "हो" म्हणणारा पालक प्रेमळ असतोच असे नाही; कधी कधी योग्य वेळी "नाही" म्हणणारा पालकच खरा दूरदृष्टीचा पालक असतो. कारण मुलांना प्रत्येक गोष्ट मिळवून देणे म्हणजे संस्कार नव्हेत; मिळालेल्या गोष्टीची किंमत समजावून देणे म्हणजे संस्कार.

पैशापेक्षा भावनिक संवाद महत्त्वाचा

अलिकडे घडलेल्या एका अत्यंत दुःखद कौटुंबिक घटनेने समाजमन हादरून गेले. एका तरुणाच्या मनातील ताण, कौटुंबिक मतभेद आणि आर्थिक-संसारीक प्रश्न गंभीर टोकाला गेले आणि एका कुटुंबावर अपरिमित दुःख ओढवले. या घटनेतील तपशीलांपेक्षा त्यातून आपण घेतला पाहिजे तो जीवनाचा धडा अधिक महत्त्वाचा आहे. आपल्या मुलांच्या हातात महागडा मोबाईल आहे की नाही, त्यांच्याकडे महागड्या वस्तू आहेत की नाहीत, यापेक्षा त्यांच्या मनात काय चालले आहे, हे पालकांनी जाणून घेणे आवश्यक आहे. मुलाच्या खोलीत जाण्यापूर्वी त्याच्या मनात जाण्याचा प्रयत्न करा. त्याला रोज विचारा "आजचा दिवस कसा गेला?" "काही त्रास आहे का?" "कशाची चिंता वाटतेय का?" "तुला माझ्याशी काही बोलायचे आहे का?" कधी कधी मुलाला उपाय नको असतो; त्याला फक्त कोणी तरी शांतपणे ऐकून घेणारे कान हवे असतात. वाद झाला म्हणून नाते तुटत नाही पालक आणि मुलांमध्ये मतभेद होणे स्वाभाविक आहे. दोन पिढ्यांचे विचार वेगळे असतात. आजच्या मुलांची दुनिया वेगळी आहे आणि पालकांनी अनुभवलेली दुनिया वेगळी होती. म्हणून प्रत्येक मतभेदाला "अवज्ञा" समजू नका आणि प्रत्येक पालकांच्या निर्णयाला "हुकूमशाही" समजू नका. वाद होऊ शकतो; पण संवाद थांबता कामा नये.

रागाच्या क्षणी शब्द जपून वापरा. कारण रागाच्या भरात उच्चारलेला एक कठोर शब्द कधी कधी समोरच्या व्यक्तीच्या मनावर खोलवर परिणाम करू शकतो. पालकांनी मुलांना समजून घ्यावे आणि मुलांनीही पालकांच्या कष्टांची जाणीव ठेवावी. घरात कोण जिंकले, यापेक्षा घर टिकले पाहिजे. पालकांनीही आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे.

कधी कधी मुलांच्या सर्व इच्छा आपणच पूर्ण करत असतो. त्यांना संघर्षापासून वाचवताना आपण त्यांना संघर्षासाठी तयार करणे विसरतो. आपण स्वतःच्या बालपणीच्या अभावांची भरपाई मुलांच्या आयुष्यात करण्याचा प्रयत्न करतो. "आम्हाला मिळाले नाही, म्हणून माझ्या मुलाला सगळे मिळाले पाहिजे," ही भावना प्रेमातून जन्माला येते.

पण मुलाला प्रत्येक सुख मिळाले म्हणून तो सुखी होईलच असे नाही. अभावातून आलेली जिद्द, कष्टातून आलेली ताकद आणि संयमातून आलेली समृद्धीहीसुद्धा मुलांना द्यावी लागते. त्यांना थोडी वाट पाहू द्या. थोडे कष्ट करू द्या. एखादी इच्छा पुढे ढकलू द्या. स्वतःच्या जबाबदाऱ्या स्वीकारू द्या. कारण जीवनात प्रत्येक गोष्ट आपल्या मनाप्रमाणे घडत नाही, हे शिकणे हीसुद्धा एक मोठी जीवनशिक्षणाची प्रक्रिया आहे.

आई-वडील म्हणजे मुलांचे पहिले सुरक्षित घर मुलांनी जगात कितीही मोठी उंची गाठली, कितीही पैसा कमावला, कितीही प्रसिद्धी मिळवली, तरी मनात एक जागा अशी असावी की जिथे ते न घाबरता आपले दुःख सांगू शकतील. ती जागा म्हणजे आई-वडिलांचे घर. पालकांनी मुलांना एवढा विश्वास द्यावा की "तुझ्याकडून चूक झाली तरी आम्ही तुझ्या विरोधात नाही; चूक सुधारण्यासाठी आम्ही तुझ्या सोबत आहोत." ही भावना मुलाच्या मनाला प्रचंड आधार देते. आपल्या घरात पैशाचे बजेट असू द्या; पण प्रेमाचे बजेट नको मुलांच्या गरजा तपासा. खर्चाचे नियोजन करा. अनावश्यक चैनीला मर्यादा घाला. पण संवाद, प्रेम, वेळ आणि विश्वास यावर कधीही काटकसर करू नका. मुलाला महागडी वस्तू देण्यापेक्षा त्याच्यासोबत दहा मिनिटे मनापासून बोला. त्याच्या हातात पैसे देण्यापेक्षा त्याच्या खांद्यावर विश्वासाचा हात ठेवा.

त्याच्या प्रत्येक चुकीवर ओरडण्यापेक्षा काही चुका समजावून सांगण्याची संधी समजा. कारण घर मोठे असण्यापेक्षा मन मोठे असणे महत्त्वाचे आहे. शेवटी एवढेच त्या दुःखद घटनेचा विचार करताना आपण कोणाला दोष देण्यासाठी नव्हे, तर स्वतःला जागे करण्यासाठी थांबले पाहिजे. आज आपल्या घरात मूल आपल्या समोर आहे, त्याच्याशी बोलण्याची संधी आहे, त्याच्या मनात डोकावण्याची वेळ आहेतर ती वेळ उद्यावर ढकलू नका. आजच त्याला जवळ घ्या. त्याला पैशाची किंमत सांगा. कष्टांची जाणीव करून द्या. गरज आणि हौस यातील फरक समजवा. अपयश स्वीकारायला शिकवा. मतभेदांमध्ये संवाद ठेवायला शिकवा. आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे "कितीही मोठे संकट आले तरी तू एकटा नाहीस; आम्ही तुझ्यासोबत आहोत," हा विश्वास त्याच्या मनात कायमचा रुजवा.

कारण मुलांना आपण देऊ शकणारी सर्वांत मोठी संपत्ती म्हणजे मालमत्ता नाही, पैसा नाही, चैनीच्या वस्तू नाहीत तर संस्कार, संयम, आत्मविश्वास, माणुसकी आणि कुटुंबाचा विश्वास. पैसा संपतो वस्तू जुन्या होतात परिस्थिती बदलते पण योग्य संस्कारांची शिदोरी आयुष्यभर साथ देते. मुलांच्या हातात सुख देण्यापेक्षा, त्यांच्या मनात जीवन जगण्याची ताकद द्या. हीच खरी पालकत्वाची श्रीमंती आणि हीच पुढच्या पिढीला देण्याची खरी जबाबदारी! ●

उद्बोधक

चार्वाक कोण होते?



पुस्तक परीक्षण
प्रा. शाम जोगळेकर
मो. ९२७३३४३१७७

चार्वाक कोण होते? हे जगदीश काबरे लिखित पुस्तक, धुळे येथील विवेक जागर संस्थेने देखण्या रूपात प्रकाशित केले आहे. सुरुवातीला जगदीश काबरे यांनी सविस्तर मनोगत मांडले आहे. 'चार्वाक कोण होते?' हा प्रश्न केवळ एका प्राचीन तत्त्वज्ञानपर पंथाची ओळख करून देणारा नाही, तर भारतीय इतिहासाच्या संपूर्ण रचनेलाच प्रश्न विचारणारा आहे. कारण भारतीय विचार परंपरेचा इतिहास बहुधा आस्तिक, धर्मप्रधान आणि आध्यात्मिक चौकटीतून केला गेला आहे. या चौकटीत जे विचार ईश्वर, आत्मा, परलोक, कर्मकांड आणि पुनर्जन्म या संकल्पनांना प्रश्न विचारतात, ते विचार अनेकदा 'विचलित,' 'अधर्म्य,' 'नाकारण्याजोगे' किंवा 'धोकादायक' ठरवले गेले. चार्वाक हे या प्रक्रियेचे सर्वात ठळक उदाहरण आहेत. भारतीय परंपरेत चार्वाकांचा उल्लेख वारंवार आढळतो, पण तो बहुतेक वेळा विरोधकांच्या लेखनातून, टीकात्मक संदर्भात किंवा उपहासात्मक स्वरूपात येतो. त्यामुळे चार्वाक कोण होते, त्यांनी नेमके काय प्रश्न उपस्थित केले, ते प्रश्न का अस्वस्थ करणारे होते, याचा समतोल आणि स्वतंत्र विचार फार कमी प्रमाणात झालेला दिसतो. हे पुस्तक त्या रिकाम्या जागेत प्रवेश करण्याचा प्रयत्न करते. भारतीय समाजात 'नास्तिक' हा शब्द आजही नकारार्थी अर्थाने वापरला जातो. नास्तिकता म्हणजे नैतिकतेचा अभाव, संस्कृतीचा अपमान किंवा समाजविरोधी वृत्ती, असा एक समज रूढ आहे. या समजाच्या मुळाशी चार्वाकांसारख्या विचारप्रवाहांविषयी पसरवलेले अपप्रचार आहेत. प्रत्यक्षात नास्तिकता ही श्रद्धेला नकार नसून, आंधळ्या श्रद्धेचा केलेला धिक्कार आहे. हे चार्वाक विचार समजून घेतल्यावर स्पष्ट होते, असे जगदीश म्हणतात. पुस्तक तेरा प्रकरणांतून वाचकांसमोर उलगडते. पुस्तकाचे समर्पक, रंगीत मुखपृष्ठ निखिल विल्हेकर, पुणे यांचे आहे.

चार्वाकांचा उदय, या पहिल्या प्रकरणात चार्वाक कोणत्या काळात होऊन गेले असावेत, याची चर्चा केली आहे. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद हे साधारण इ.स.पूर्व १०००- ८०० या काळात विकसित झाले. रामायण, महाभारत या महाकाव्यांची रचना इ.स.पूर्व ७ व्या ते ५ व्या शतकातील. भारतातील चार्वाक किंवा लोकायत तत्त्वज्ञान वैदिक यज्ञसंस्थेवरील सर्वात प्राचीन विरोधापैकी एक मानला जातो.चार्वाक, बौद्ध आणि जैन या विचारधारा वैदिक धर्माला विरोध करणाऱ्या होत्या; परंतु त्यांचे उद्देश भिन्न होते. तिन्हींची लेखकाने तुलना केली आहे. चार्वाक हे सर्वात जास्त क्रांतिकारी होते. त्यांनी धर्म, परलोक, देवकार्य नाकारले. त्यामुळे वैदिकांचा मुख्य संघर्ष बौद्ध-जैनांशी नव्हे, तर चार्वाकांशी झाला. त्यामुळे त्या काळातील सर्वच धर्मांनी चार्वाक तत्त्वज्ञानाचे नकारात्मक चित्रण केले. चार्वाकांचा उदय बौद्ध-जैन धर्मांपूर्वी झाला. भारतीय समाजातील यज्ञाधारित धार्मिक वर्चस्वाला आव्हान देणारी सर्वात जुनी तर्कप्रधान विचारधारा होती. त्यामुळे सामाजिक बंधने, धार्मिक अधिकार, देववाद, कर्मकांड याविषयी तर्काधारित प्रश्न विचारले गेले. धार्मिक संघटनांचे प्रवाह या युद्धात विजयी ठरले. ग्रंथरक्षणाची व्यवस्था नसल्यामुळे विविध काळात त्यांच्यावर झालेल्या टीकेतून चार्वाक/लोकायत विचारसरणी स्पष्ट होते. चार्वाकांचे तत्त्वज्ञान आजही समाजाला सांगते की, अंधश्रद्धेच्या वा देवाच्या भीतीद्वारे चालणारा धर्म हा खरा धर्मच नव्हे; तर बौद्धिक स्वातंत्र्य, प्रत्यक्ष ज्ञान, मानवी स्वातंत्र्य, वैज्ञानिक तर्क हीच खरी मानवी मूल्ये आहेत. म्हणूनच लोकायतची गरज आजही तेवढीच प्रखर आहे. जिथे प्रश्न विचारणे पाप मानले जाते, जिथे अंधश्रद्धा वाढते, जिथे देव आणि धर्माच्या नावाने भीती निर्माण केली जाते, जिथे प्रत्यक्ष अनुभवावर आधारित विज्ञानाला नाकारले जाते, तिथे चार्वाक विचारसरणी गरजेचीच नव्हे, तर अनिवार्य ठरते. नंतर चार्वाक दर्शन व सांख्य-वैशेषिक-बौद्ध-जैन तत्त्वज्ञान यांचा लेखकाने तुलनात्मक अभ्यास उत्तम प्रकारे मांडला आहे. चार्वाक दर्शन : एक पूर्ण नास्तिक दर्शन, या प्रकरणात आणि नंतरच्या प्रकरणांतून चार्वाक तत्त्वज्ञानाची वाचकाला सविस्तर ओळख होते. चार्वाकवादी हे प्राचीन काळातील वैज्ञानिक होते. तर्काच्या कसोटीवरच ते सत्याची पारख करीत. नास्तिक असूनही संयमी होते. जीवनाभिमुख, एक समतोल तत्त्वज्ञान त्यांनी समाजाला दिले.शेती, व्यापार धंदा, नोकरी करून सुखाने जगावे. अर्थ, काम हे पुरुषार्थ साधावे. स्वर्ग नरकादी कल्पनांच्या मागे लागून, धूर्त, लबाड भिक्षुकांच्या वचनांनी फसून देहदंडाचा मार्ग चोखाळू नये. जीवन रसिकतेने जगावे, अशा प्रकारचा उपदेश त्यांनी केला. वर्णभेद, जातिभेद त्यांनी मानले नाहीत. स्त्रियांवरील बंधनांचा तर धिक्कारच केला. राजसत्ता त्यांनी मानली; पण त्या सत्तेच्या वापरातही न्याय आणि विवेक असला पाहिजे, असे सुचविले. हे साधे, सरळ सामान्य माणसाच्या आवाक्यातले बुद्धिनिष्ठ असे तत्त्वज्ञान, चार्वाकवाद्यांनी बुद्धपूर्वकालात प्रस्थापित केले होते. चार्वाक तत्त्वज्ञान हे आजच्या काळातही तंतोतंत लागू पडणारे आहे. चार्वाकांची संकल्पना पूर्णतः वेगळी, धाडसी आणि क्रांतिकारी, पारलौकिक मुक्ती, आत्म्याचे देहत्यागानंतरचे अस्तित्व, पुनर्जन्म किंवा ईश्वराशी ऐक्य यासारख्या संकल्पना नाकारत, चार्वाकांनी मोक्षाची व्याख्या 'स्वातंत्र्य' अशी केली. यामधून जीवनदृष्टीतील आमूलाग्र परिवर्तन दिसून येते. मोक्ष म्हणजे मृत्यूनंतरचे अदृश्य, कल्पनारम्य सुख नसून, जिवंत असताना अनुभवता येणारे, भोगता येणारे, मानवी प्रयत्नांनी साध्य करता येणारे स्वातंत्र्य, अशी त्यांची भूमिका होती. भारतीय अध्यात्म परंपरेतील दुःखवाद, त्यागवाद आणि परलोकवाद यांच्या पार्श्वभूमीवर चार्वाकांचे हे विचार समजून घेणे आवश्यक ठरते. चार्वाकांची मोक्षाची संकल्पना पूर्णतः भौतिकवादी आहे. त्यांनी आत्म्याचे स्वतंत्र अस्तित्व नाकारले. देहच आत्मा आहे, असा देहात्मवाद मांडला. त्यामुळे देह नष्ट झाला की आत्माही नष्ट होतो, असे त्यांचे मत होते. पुनर्जन्म, स्वर्ग, नरक, कर्मफळ यासारख्या संकल्पना स्वीकारल्या नाहीत. या सर्व संकल्पना मानवी भीती आणि आशेवर आधारित आहेत, असे त्यांना वाटे. म्हणूनच त्यांनी वर्तमान जीवनावर प्रेम करण्याची शिकवण दिली. इहलोक हेच एकमेव वास्तव. परलोकाची अपेक्षा ठेवून लोकांकडे दुर्लक्ष करणे, हा मूर्खपणा आहे. चार्वाकांच्या मोक्ष संकल्पनेत ही जाणीव केंद्रस्थानी आहे. त्यामुळे त्यांचा मोक्ष हा केवळ वैयक्तिक, आध्यात्मिक स्थिती नसून सामाजिक आणि राजकीय अर्थांनीही समृद्ध आहे. जनहितवादी राजा हाच खरा देव, असे ते म्हणतात. राजसत्तेचे दैवीकरण केले नसून जनकल्याणाच्या निकषावर राज्यकर्त्यांचे मूल्यमापन करण्याची त्यांची भूमिका आहे. ईश्वर नाकारताना त्यांनी स्वभाववाद मांडला. जगाचे संचालन नैसर्गिक नियमांनी होते. परंतु सामाजिक व्यवस्थेत न्याय, सुव्यवस्था राखण्यासाठी जबाबदार शासन आवश्यक आहे, ही त्यांची व्यावहारिक जाणीव होती. चार्वाकांना जीवनद्वेषी आणि आत्मघाती मार्ग मान्य नव्हते स्वातंत्र्य, प्रयत्न आणि इहलौकिक आनंद या त्रयींवर त्यांची जीवनदृष्टी आधारित होती. सातव्या प्रकरणात लेखकाने वैदिक काळापासून ते दहाव्या शतकापर्यंत चार्वाकांचा नाश का आणि कसा झाला, याचे सविस्तर विश्लेषण केले आहे. दहाव्या शतकापर्यंत चार्वाक विचारांचे उरलेले स्वरूप, केवळ साहित्यिक, विडंबनात्मक आणि उपहासात्मक स्वरूपात आढळते. आज चार्वाक परंपरा मूळ स्वरूपात उपलब्ध नाही. चार्वाक भौतिकवाद, मानवी स्वातंत्र्य आणि धार्मिक अंधश्रद्धांविरुद्ध लढा यातून चार्वाकांची विचारसरणी जिवंत आहे. धर्म आणि विज्ञान, हे प्रकरण विलक्षण वाचनीय आणि विचारप्रवर्तक आहे. चार्वाकांच्या विचारसरणीवर आधारलेले 'विवेकनिष्ठ जीवन' कसे असावे, हे लेखकाने सविस्तरपणे स्पष्ट केले आहे. अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्य, आजच्या अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत, प्रभावीपणे होण्यासाठी, चार्वाक विचार कसा उपयुक्त आणि मार्गदर्शक ठरतो, हे शेवटी, अतिशय उत्तमप्रकारे स्पष्ट करण्यात आले आहे. पुस्तकाचे शेवटी जगदीश काबरे यांच्या जीवनकार्याचा सविस्तर, सचित्र परिचय दिला आहे. महा.अंनिसचे राज्य कार्याध्यक्ष, संजय बनसोडे यांनी पुस्तकाचे सांगितलेले महत्त्व मलपृष्ठावर वाचावयास मिळते. पुस्तकाच्या सुरुवातीच्या काही प्रकरणांत, विचारांची पुनरुक्ती आढळते. जगदीश काबरेलिखित हे पुस्तक वाचनीय, उद्बोधक आणि संग्राह्य झाले आहे. ●

पुस्तकाचे नाव : चार्वाक कोण होते?
लेखक : जगदीश काबरे
९९२०१९७६८०
प्रकाशक : विवेक जागर संस्था, महा अंनि, धुळे ९८६०४३८२०८
प्रथम आवृत्ती : ६.६.२०२६
पृष्ठे : ११२ मूल्य : रु. ११०/-

ज्ञानाचा वटवृक्ष हरपला

भागा वरखडे

अनेक महनीयांचे अस्तित्व एखाद्या पदापुरते मर्यादित रहात नाही. त्यांच्या कामाचा विस्तार काळाच्या पुढे जातो आणि एक परंपरा उभी राहते. डॉ. डी. वाय. पाटील यांनी शिक्षणतज्ज्ञ, सामाजिक कार्यकर्ते आणि राजकारणी म्हणून महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनावर दीर्घकाळ प्रभाव टाकला. अलिकडेच झालेल्या त्यांच्या निधनाने कोल्हापूरच नव्हे, तर महाराष्ट्राच्या शिक्षणविश्वातील एका मोठ्या पर्वाला पूर्णविराम मिळाला.

डॉ. डी. वाय. पाटील यांचा प्रवास हा एका ग्रामीण, कृषिप्रधान पार्श्वभूमीतून सुरू झालेला प्रवास होता. कोल्हापूरच्या कसबा बावडा परिसराशी त्यांचे नाते अखेरपर्यंत कायम राहिले. शिक्षण हे केवळ शहरातील किंवा आर्थिकदृष्ट्या सक्षम वर्गाचे साधन न राहता ग्रामीण आणि निमशहरी समाजापर्यंत पोहोचले पाहिजे, ही भूमिका त्यांच्या कार्यामागे होती. त्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तन घडवण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या संस्थांच्या विस्ताराकडे पाहिले तर या संकल्पनेची व्याप्ती लक्षात येते. अभियांत्रिकी, वैद्यकीय, व्यवस्थापन, तंत्रज्ञान, औषधनिर्माण, कृषी अशा अनेक शाखांमध्ये शिक्षणसंस्था उभारण्याचे काम त्यांनी केले. डॉ. डी. वाय. पाटील समूहाच्या अधिकृत माहितीनुसार, त्यांच्या प्रारंभीच्या प्रयत्नांपैकी एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे १९८३ मध्ये नवी मुंबईतील रामराव आदिक इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीची स्थापना. पुढे या प्रयत्नाचे रूपांतर मोठ्या शैक्षणिक समूहात झाले. महाराष्ट्रातील उच्च शिक्षणाचा इतिहास पाहिला, तर १९८० आणि १९९० च्या दशकात एक मोठा बदल घडताना दिसतो. सरकारी आणि अनुदानित शिक्षणसंस्थांची क्षमता वाढत्या विद्यार्थीसंख्येच्या तुलनेत अपुरी पडत होती. व्यावसायिक शिक्षणाची मागणी झपाट्याने वाढत होती. अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि व्यवस्थापन शिक्षणासाठी विद्यार्थ्यांची धावपळ सुरू होती. अशा काळात खासगी शिक्षणसंस्थांनी मोठी जागा निर्माण केली. या परिवर्तनाचे डॉ. डी. वाय. पाटील हे महाराष्ट्रातील प्रमुख चेहरा ठरले. त्यांच्या नेतृत्वाखाली उभ्या राहिलेल्या संस्थांनी हजारो विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणाची संधी दिली.

आज डॉ. पाटील यांच्या समूहाच्या विविध संस्थांमध्ये मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. काही संस्थांनी विद्यापीठाचा दर्जाही प्राप्त केला. त्यामुळे डॉ. पाटील यांचे सर्वात मोठे योगदान कोणते, असा प्रश्न विचारला तर त्याचे उत्तर त्यांच्या राजकीय पदांपेक्षा त्यांनी उभारलेल्या शैक्षणिक पायाभूत सुविधांमध्ये शोधावे लागेल. डॉ. पाटील यांची ओळख केवळ शिक्षणक्षेत्रापुरती नव्हती. त्यांच्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात कोल्हापूरच्या स्थानिक राजकारणातून झाली.

१९५७ मध्ये त्यांनी कोल्हापूर नगरपालिका निवडणुकीत प्रवेश केला आणि पुढे राज्याच्या राजकारणातही सक्रिय भूमिका बजावली. काँग्रेसशी त्यांचे दीर्घकाळ राजकीय नाते राहिले. राजकारणात दीर्घकाळ काम केल्यानंतर राज्यपालपदापर्यंत पोहोचणे ही त्यांच्या सार्वजनिक जीवनातील महत्त्वाची पायरी होती. त्यांनी त्रिपुरा, बिहार आणि पश्चिम बंगाल या राज्यांचे राज्यपाल म्हणून जबाबदारी सांभाळली. घटनात्मक पदावर काम करताना पक्षीय राजकारणापेक्षा संविधानिक जबाबदारी महत्त्वाची असते. एका सक्रिय राजकारण्याने राज्यपालपदासारख्या घटनात्मक पदावर जाऊन काम करणे ही स्वतःमध्ये संक्रमणाची महत्वपूर्ण प्रक्रिया असते. राज्यपाल म्हणून त्यांची भूमिका त्यांच्या सार्वजनिक जीवनाला वेगळे परिमाण देणारी ठरली. महाराष्ट्राच्या राजकारणातून देशातील विविध राज्यांच्या घटनात्मक जबाबदारीपर्यंत त्यांचा प्रवास झाला. ही वाटचाल त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील व्यापक सार्वजनिक स्वीकाराचे द्योतक होती.

डॉ. पाटील यांना अनेकजण प्रेमाने 'दादा' म्हणत. हा संबोध केवळ कौटुंबिक किंवा राजकीय जवळिकीचा नव्हता. मोठ्या प्रमाणावर लोकांशी संपर्क ठेवणाऱ्या त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची ही ओळख होती. कोल्हापूरच्या राजकीय आणि सामाजिक जीवनात त्यांचा प्रभाव दीर्घकाळ जाणवत राहिला. त्यांच्या कार्याची एक वैशिष्ट्यपूर्ण बाजू म्हणजे शिक्षण समाजकारणाशी जोडणे. शाळा-कॉलेज म्हणजे केवळ इमारत आणि वर्गखोल्या नव्हेत, तर सामाजिक परिवर्तनाची केंद्रे आहेत, या भूमिकेतून त्यांनी संस्था उभारल्या. शिक्षण आणि आरोग्य या दोन क्षेत्रांना त्यांनी विशेष महत्त्व दिले. शिक्षणाबरोबरच आरोग्यसेवांच्या विस्तारालाही त्यांनी प्राधान्य दिले. याच कारणामुळे त्यांच्या कार्याचा प्रभाव केवळ विद्यार्थ्यांपुरता राहिला नाही. शिक्षक, प्राध्यापक, डॉक्टर, अभियंते, व्यवस्थापन क्षेत्रातील व्यावसायिक आणि विविध क्षेत्रांमधील हजारो माजी विद्यार्थी त्यांच्या संस्थांच्या माध्यमातून समाजात कार्यरत आहेत. एका व्यक्तीने उभारलेली संस्था पिढ्यानपिढ्या मानवी भांडवल निर्माण करू लागते, तेव्हा तिचे महत्त्व त्या व्यक्तीच्या आयुष्यापलीकडे जाते. आज भारतात खासगी शिक्षणाचा विस्तार मोठ्या प्रमाणावर झाला आहे. वैद्यकीय आणि अभियांत्रिकी शिक्षणापासून व्यवस्थापन आणि तंत्रज्ञानापर्यंत खासगी क्षेत्राची भूमिका निर्णायक झाली आहे. या परिवर्तनात डॉ. पाटील यांच्यासारख्या शिक्षणप्रवर्तकांचे योगदान नाकारता येणार नाही; पण त्याचबरोबर शिक्षणाच्या वाढत्या खर्चाचा प्रश्नही दुर्लक्षित करता येत नाही.

डॉ. पाटील यांच्या व्यक्तिमत्त्वाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे ते आपली मुळे विसरले नाहीत. कोल्हापूर हा त्यांच्या सार्वजनिक जीवनाचा केंद्रबिंदू राहिला. महाराष्ट्राच्या सामाजिक आणि शैक्षणिक इतिहासात कोल्हापूरला महत्त्वाचे स्थान आहे. राजर्षी शाहू महाराजांच्या सामाजिक न्याय आणि शिक्षणाच्या विचारांची परंपरा या भूमीत आहे. या परंपरेत शिक्षणाचा प्रसार हा सामाजिक उन्नतीचा मार्ग मानला गेला. डॉ. पाटील यांनी आपल्या पद्धतीने या परंपरेला पुढे नेण्याचा प्रयत्न केला. त्यांची कार्यपद्धती वेगळी होती. त्यांनी मोठ्या प्रमाणावर संस्था उभारल्या, आधुनिक व्यावसायिक शिक्षणाच्या गरजा ओळखल्या आणि शिक्षणाला उद्योग, तंत्रज्ञान व आरोग्याशी जोडले. म्हणूनच त्यांचा वारसा केवळ एका कुटुंबाचा किंवा एका संस्थेचा विषय नाही. तो महाराष्ट्रात शिक्षणाच्या बदलत्या स्वरूपाचा एक महत्त्वाचा अध्याय आहे. सार्वजनिक जीवनात राजकीय पदे येतात आणि जातात. आमदार, मंत्री, खासदार किंवा राज्यपाल ही पदे एखाद्या व्यक्तीच्या आयुष्यातील विशिष्ट काळापुरती असतात; पण शिक्षणक्षेत्रात उभारलेली संस्था अनेक दशके कार्यरत राहू शकते. डॉ. पाटील यांच्या बाबतीतही हेच घडले. राजकारणात त्यांनी प्रवेश केला. पक्ष बदलले. विविध राजकीय टप्पे अनुभवले; परंतु त्यांच्या नावाशी सर्वाधिक दृढपणे जोडले गेले ते शिक्षण. २०१८ मध्ये त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता; त्यापूर्वी ते दीर्घकाळ काँग्रेसशी संबंधित होते. त्यांच्या राजकीय भूमिकांमध्ये बदल झाले असले, तरी शिक्षणक्षेत्रातील काम सातत्याने पुढे गेले. यातून एक धडा स्पष्ट होतो, तो राजकारणाचा प्रभाव तात्कालिक असतो; पण ज्ञाननिर्मितीचा प्रभाव दीर्घकालीन असतो.

कोल्हापूरच्या मातीतून उगवलेला हा ज्ञानवृक्ष आता सावली देत राहणार आहे. त्याच्या फांद्या कितीही दूरवर पसरल्या, तरी त्याची मुळे शिक्षण, समाजसेवा आणि सार्वजनिक जीवनाच्या त्या मातीतच राहतील. डॉ. डी. वाय. यांचे खरे स्मारक एखादी भव्य वास्तू नसून, त्यांच्या नावाने शिक्षण घेऊन समाज घडवणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याच्या यशात उभे राहील. त्यांच्या निधनाकडे एका ज्येष्ठ व्यक्तिमत्त्वाच्या अंतापेक्षा एका मोठ्या शैक्षणिक पर्वाच्या संक्रमणाच्या रूपात पहावे लागेल. ज्ञानाचा दीप मालवला आहे; पण त्यातून पेटवलेल्या असंख्य ज्योती आता पुढचा मार्ग उजळत राहणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. ●

महिला हॉकी संघाची उपांत्य फेरीसाठी कसोटी

|| पेनल्टी कॉर्नरवरुन केले दोन्ही गोल || ऑस्ट्रेलियाला हरवणं आवश्यक

| मस्टेलवीन | वृत्तसंस्था |

महिला हॉकी विश्वचषकाच्या दुसऱ्या फेरीत, भारतीय महिला हॉकी संघाला गतविजेत्या ऑलिम्पिक आणि विश्वविजेत्या नेदरलँड्सकडून ०-२ असा पराभव पत्करावा लागला आहे.

मस्टेलवीन येथे झालेल्या सामन्यात यजमान संघाने दोन्ही गोल पेनल्टी कॉर्नरद्वारे केले. नेदरलँड्सकडून जानसेनने सामन्याच्या दुसऱ्या मिनिटाला पेनल्टी कॉर्नरचे गोलमध्ये रूपांतर करून संघाला सुरुवातीलाच आघाडी मिळवून दिली. त्यानंतर ३८ व्या मिनिटाला

फ्रेडरिक माटलाने आणखी एका पेनल्टी कॉर्नरचे गोलमध्ये रूपांतर करून यजमान संघाची आघाडी ०-२ अशी वाढवली.

भारतीय संघाने पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला, परंतु डच संघाच्या मजबूत बचावाला भेदण्यात ते अपयशी ठरले. भारत शेवटपर्यंत एकही गोल करू शकला नाही आणि सामना ०-२ ने गमावला.

या पराभवामुळे भारतीय संघाचा उपांत्य फेरीचा मार्ग कठीण झाला आहे. आता भारताला रविवारी होणाऱ्या दुसऱ्या फेरीतील अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाला हरवावे लागेल. उपांत्य फेरी गाठण्याची आशा जिवंत ठेवण्यासाठी भारतीय संघासाठी हा सामना अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.

शुक्रवारी ऑस्ट्रेलिया आणि चीन यांच्यात खेळला गेलेला दुसऱ्या फेरीतील आणखी एक सामना १-१ असा बरोबरीत संपला. या निकालामुळे भारतासाठी समीकरण अधिकच महत्त्वाचे बनले आहे.

आपल्या शेवटच्या पूल सामन्यात इंग्लंडविरुद्ध गोलशून्य बरोबरी साधल्यानंतर भारताने दुसऱ्या फेरीत आपले स्थान निश्चित केले आहे.

आता भारतीय संघाचे लक्ष ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या निर्णायक सामन्यावर आहे, या निकालामुळे भारतासाठी समीकरण अधिकच महत्त्वाचे बनले आहे. आपल्या शेवटच्या पूल सामन्यात इंग्लंडविरुद्ध गोलशून्य बरोबरी साधल्यानंतर भारताने दुसऱ्या फेरीत आपले स्थान निश्चित केले. भारतीय संघ पूल डीमध्ये चीननंतर दुसऱ्या स्थानावर राहिला. आता भारतीय संघाचे लक्ष ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या निर्णायक सामन्यावर आहे, ज्यात विजय मिळवल्यास संघ उपांत्य फेरीच्या शर्यतीत टिकून राहू शकतो.

रविवारी होणाऱ्या सामन्यावर लक्ष

भारतीय संघाचा उपांत्य फेरीपर्यंतचा मार्ग कठीण झाला आहे. आता भारताला रविवारी होणाऱ्या दुसऱ्या फेरीतील अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाला हरवावं लागेल. उपांत्य फेरीत पोहोचण्याची आशा जिवंत ठेवण्यासाठी भारतीय संघासाठी हा सामना अत्यंत महत्त्वाचा असेल. शुक्रवारी ऑस्ट्रेलिया आणि चीन यांच्यात खेळला गेलेला दुसऱ्या फेरीचा आणखी एक सामना १-१ असा बरोबरीत संपला. या निकालामुळं भारतासाठी समीकरण अधिकच निर्णायक बनले आहे.

मेस्सीची अनिश्चित काळासाठी विश्रांती

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

अर्जेंटिना आणि इंटर मियामीचा स्टार फुटबॉलपटू लिओनेल मेस्सीने त्याचे वडील जॉर्ज मेस्सी यांच्या निधनानंतर स्पर्धात्मक फुटबॉलमधून अनिश्चित काळासाठी विश्रांती घेतली आहे. मेस्सी आपल्या कुटुंबासोबत राहण्यासाठी अर्जेंटिनाच्या रोझारियो शहरात परतला आहे. इंटर मियामीने त्याला पूर्ण पाठिंबा दिला असला तरी, त्याच्या परत येण्याची कोणतीही निश्चित वेळ सांगितलेली नाही. तो मैदानावर कधी परत येईल हे अस्पष्ट आहे. मेस्सीचे वडील जॉर्ज मेस्सी यांचे निधन झाले. इंटर मियामीचा कर्णधार खासगी विमानाने आपल्या मूळ गावी रोझारियोला गेला. आणि त्याने आपल्या कुटुंबासोबत एका खासगी अंत्यविधीला हजेरी लावली. त्यावेळी मेस्सी दक्षिण फ्लोरिडामध्ये इंटर मियामीच्या आगामी लीग्स कप सामन्याची तयारी करत होता. वडिलांच्या निधनाची बातमी मिळताच, त्याने

तात्काळ अर्जेंटिनाला परतण्याचा निर्णय घेतला. इंटर मियामीने मेस्सीला पूर्ण पाठिंबा दिला असून त्याला बिनशर्त रजा मंजूर केली आहे. क्लबने अद्याप मेस्सीच्या परत येण्याची तारीख निश्चित केलेली नाही. याचा अर्थ असा की, फुटबॉलमध्ये परत येण्यासाठी तयार होईपर्यंत मेस्सी अर्जेंटिनामध्ये आपल्या कुटुंबासोबत राहू शकतो. त्याचे संघात पुनरागमन आणि निवड पूर्णपणे त्याच्या वैयक्तीक परिस्थितीवर आणि तयारीवर अवलंबून असेल. जॉर्ज मेस्सी यांनी आपल्या मुलाच्या कारकिर्दीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्याच्या सुरुवातीच्या दिवसांपासून त्यांनी त्याचे व्यवस्थापक, प्रतिनिधी आणि सल्लागार म्हणून काम केले. रोझारियोमधील त्याच्या युवा कारकिर्दीत आणि जागतिक फुटबॉलच्या शिखरापर्यंतच्या त्याच्या प्रवासात ते मेस्सीच्या सोबत होते. त्यामुळे, त्यांचे निधन हे मेस्सीसाठी वैयक्तिक आणि व्यावसायिक अशा दोन्ही स्तरांवर एक मोठे नुकसान आहे. मेस्सीने फुटबॉलमधून घेतलेली ही विश्रांती अशा वेळी आली आहे, जेव्हा तो आपला प्रभावी फॉर्म पुन्हा मिळवत होता. त्याने अलीकडेच लीग्स कपमध्ये टलेटिको सॅन लुईस विरुद्ध दोन गोल केले होते. पण, वडिलांच्या निधनानंतर, मेस्सीसाठी फुटबॉलशी संबंधित सर्व ध्येये मागे पडली आहेत. सध्या त्याचे प्राधान्य आपल्या कुटुंबासोबत असण्याला आहे.

काजल ढोचकचा ऐतिहासिक पराक्रम

नवी दिल्ली : भारतीय महिला कुस्तीपटू काजल ढोचकने अंडर-२० कुस्ती विश्वचॅम्पियनशिपमध्ये ७६ किलो वजनी गटात उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक जिंकले. काजलने अंतिम सामन्यात चीनच्या जिंगरू सनचा ७-० ने पराभूत करून विश्वविजेतेपद पटकावले. यासह, ती सलग दुसऱ्यांदा अंडर-२० विश्वविजेती बनणाऱ्या निवडक भारतीय महिला कुस्तीपटूंच्या गटात सामील झाली आहे.१८ वर्षीय काजलने संपूर्ण स्पर्धेत वर्चस्व गाजवले आणि एकाही लढतीत एकही गुण गमावला नाही. अंतिम सामन्यात, तिने चीनच्या जिंगरू सनला सुरुवातीपासूनच दबाव निर्माण केला. तिने शेवटपर्यंत आपली आघाडी कायम ठेवत ७-० ने हा सामना जिंकला. काजलने अंतिम सामन्याच्या सुरुवातीलाच स्टेप-आउट करून एक गुण मिळवला.

लुसाने डायमंड लीगमध्ये नीरज दुसऱ्या स्थानी

| लुसाने | वृत्तसंस्था |

भारताचा नीरज चोप्रा लुसाने डायमंड लीग २०२६ च्या पुरुष भालाफेक स्पर्धेत दुसऱ्या स्थानी राहिला. तो पुन्हा एकदा श्रीलंकेच्या फॉर्मात असलेल्या रोमेश पाथिरागेच्या मागे पडला. नीरजची ८८.०५ मीटरची सर्वोत्तम कामगिरी रोमेश पाथिरागेच्या ८८.१४ मीटरच्या सर्वोत्तम कामगिरीपेक्षा केवळ ०.०९ मीटरने कमी होती. पहिल्या फेरीनंतर पाथिरागे आघाडीवर होता, पण दुसऱ्या फेरीत नीरजने आघाडी घेतली. पण, पाथिरागेने तिसऱ्या फेरीत पुन्हा आघाडी मिळवली आणि शेवटपर्यंत ती कायम ठेवली. ग्रेनेडाचा अँडरसन पीटर्स ८६.६९ मीटरच्या सर्वोत्तम कामगिरीसह तिसऱ्या स्थानी राहिला. नीरज आणि पीटर्स या दोघांनीही या हंगामातील आपली सर्वोत्तम कामगिरी केली. पण त्यांची कामगिरी राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा २०२६ चा सुवर्णपदक विजेता पाथिरागेला सलग तिसऱ्यांदा डायमंड लीग स्पर्धा जिंकण्यापासून रोखण्यासाठी पुरेशी ठरली नाही.

अव्वल ३ खेळाडूंची कामगिरी रुमेश पाथिरागे (श्रीलंका) सर्वोत्तम फेक ८८.१४ मीटर, नीरज चोप्रा (भारत) सर्वोत्तम फेक ८८.०५ मीटर (हंगामातील सर्वोत्तम फेक) अँडरसन पीटर्स (ग्रेनेडा) सर्वोत्तम फेक ८६.६९ मीटर, नीरज चोप्राने आपल्या दुसऱ्या प्रयत्नात ८८.०५ मीटर भाला फेकला, जी त्याची हंगामातील सर्वोत्तम फेकही होती.

हेडिंग्ले कसोटीत इंग्लंडची पाकिस्तानवर मात

| लंडन | वृत्तसंस्था |

हेडिंग्ले येथे पाकिस्तानची फलंदाजी पुन्हा एकदा उघडी पडली. पाकिस्तानी फलंदाज इंग्लंडच्या वेगवान गोलंदाजांसमोर इतके पूर्णपणे शरण गेले की पहिला कसोटी सामना अवघ्या तीन दिवसांतच संपला. इंग्लंडने दुसऱ्या डावात पाकिस्तानला केवळ १३५ धावांवर सर्वबाद करून, त्यांना एक डाव आणि १०३ धावांनी पराभूत केले आणि तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. ऑली रॉबिन्सन, जोश टंग आणि जोफ्रा आर्चर या वेगवान त्रिकुटासमोर दोन्ही डावांमध्ये पाकिस्तानची फलंदाजी पूर्णपणे हतबल दिसत होती. पहिल्या डावात पाकिस्तानचा संघ अवघ्या १७१ धावांवर सर्वबाद झाला. प्रत्युत्तरात, इंग्लंडने ४०९ धावांची भक्कम धावसंख्या उभारून २३८ धावांची मोठी आघाडी घेतली.

तिसऱ्या दिवशी इंग्लंडचा डाव ४०९ धावांवर संपल्यानंतर, सामना किमान चौथ्या दिवसापर्यंत नेण्यासाठी पाकिस्तानला एका झुंजार खेळीची गरज होती, पण त्यांच्या फलंदाजांनी पुन्हा एकदा निराशा

केली. इंग्लंडच्या चार वेगवान गोलंदाजांनी उत्कृष्ट गोलंदाजी करत पाकिस्तानच्या फलंदाजांवर दबाव कायम ठेवला. जोफ्रा आर्चरने नव्या चेंडूने पाकिस्तानच्या दोन्ही सलामीवीरांना बाद केले. ऑली रॉबिन्सनने आणखी तीन बळी घेतले. जोश टंग गोलंदाजीसाठी आला आणि त्याने ताशी सुमारे १४३ किमी वेगाने तीन बळी घेतले. टकिन्सननेही उत्कृष्ट गोलंदाजी करत पाकिस्तानचा सर्वाधिक धावा करणारा फलंदाज रिझवानची विकेट घेतली. रॉबिन्सन आणि टंग यांनी सामन्यात प्रत्येकी आठ बळी घेतले, तर पहिल्या डावात त्यांनी प्रत्येकी पाच बळी घेतले होते. जूनमध्ये न्यूझीलंडकडून १-२ ने मालिका गमावल्यानंतर इंग्लंड आता एका नव्या युगात प्रवेश करत असल्याचे या विजयातून दिसून येते.

प्रिशाची बुद्धिबळ स्पर्धेत चमकदार कामगिरी

| सिन्नर | प्रतिनिधी |

सॅक्रेड हार्ट पब्लिक स्कूल, सिन्नरची प्रतिभावान युवा बुद्धिबळपटू प्रिशा प्रवीण घोलप हिने प्रतिष्ठेच्या ३९ व्या राष्ट्रीय अंडर-११ ओपन अँड गर्ल्स बुद्धिबळ स्पर्धा २०२६ मध्ये उल्लेखनीय कामगिरी करत द्वितीय उपविजेतेपद पटकावले. तिच्या या यशामुळे सॅक्रेड हार्ट पब्लिक स्कूलसह सिन्नरच्या शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. न्यू मंगळुरू पोर्ट अथॉरिटी यांच्या सौजन्याने

आयोजित करण्यात आलेल्या या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेचे आयोजन दक्षिण कन्नड बुद्धिबळ संघटनेतर्फे करण्यात आले होते. देशभरातील विविध भागांतून प्रतिभावान युवा बुद्धिबळपटूंनी स्पर्धेत सहभाग घेतला. खेळाडूंना आपली रणनीती, एकाग्रता आणि स्पर्धात्मक कौशल्य दाखवण्यासाठी या स्पर्धेने महत्त्वाचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले.

प्रिशाने संपूर्ण स्पर्धेत जिद्द, आत्मविश्वास आणि सातत्यपूर्ण कामगिरीचे दर्शन घडवले. आपल्या उत्कृष्ट खेळाच्या जोरावर तिने द्वितीय उपविजेतेपदावर शिक्कामोर्तब केले. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल प्रिशाला चषक आणि ५० हजार रुपये रोख पारितोषिक प्रदान करण्यात आले. प्रशाचे हे यश तिच्या युवा क्रीडा कारकिर्दीतील महत्त्वपूर्ण टप्पा मानले जात आहे. तिच्या या कामगिरीबद्दल सॅक्रेड हार्ट पब्लिक स्कूल, सिन्नरच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. तिची मेहनत, समर्पण, शिस्त आणि बुद्धिबळावरील प्रेम यांचे शाळेच्या वतीने विशेष कौतुक करण्यात आले. मुख्याध्यापक, शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांनी प्रिशाचे मनःपूर्वक अभिनंदन करून तिच्या आगामी बुद्धिबळ स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.

केट क्रॉसची निवृत्तीची घोषणा

नवी दिल्ली : इंग्लंड महिला क्रिकेट संघाची वेगवान गोलंदाज क्रॉसने प्रोफेशनल क्रिकेटमधून निवृत्तीची २१ ऑगस्टला घोषणा केली आहे. क्रॉस गेल्या १५ वर्षांपासून आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये इंग्लंडचे प्रतिनिधित्व करत होती. ३४ वर्षीय खेळाडू २०२६ च्या हंगामाच्या अखेरीस क्रिकेटच्या सर्व प्रकारातून निवृत्त होईल.

भारत-बांगलादेश मालिकेवर अनिश्चितेचे सावट

| ढाका | वृत्तसंस्था |

भारत-बांगलादेश यांच्यामधील क्रिकेट मालिकेवर अनिश्चिततेचे सावट निर्माण झाले आहे. बांगलादेश क्रिकेट मंडळाचे प्रमुख तमिम इक्बाल यांच्याकडून याबाबतचेसंकेतदेण्यातआलेआहेत. बांगलादेश क्रिकेट मंडळाकडून या मोसमातील वेळापत्रक पुन्हा एकदा तयार करण्यात येणार आहे. तसेच आर्थिक नुकसान झालेली

बांगलादेश प्रीमियर लीगही या मोसमात होणार नाही.

बांगलादेश क्रिकेट बोर्ड २८ ऑगस्ट ते ९ सप्टेंबरदरम्यान शेर-ए-बांगला नॅशनल क्रिकेट स्टेडियमवर गेम डेव्हलपमेंट स्पर्धा आयोजित करणार आहे. या स्पर्धेत १७ वर्षांखालील, १९ वर्षांखालील आणि २३ वर्षांखालील खेळाडू सहभागी होतील. तसेच भारताविरुद्धच्या मालिकेबाबत चर्चा सुरू आहे. तिच्या तारखांमध्ये बदल होऊ शकतो. भारताविरुद्धची मालिका निश्चित झाल्यानंतर त्यानुसार वेळापत्रक तयार केले जाणार आहे.

निवडक

सिया गुरुवाणीचे तायक्वांदोमध्ये रौप्यपदक

यवतमाळ : माउंट लिट्रा झी स्कूलमध्ये इयत्ता सातवीत शिकणारी सिया गुरुवाणी या विद्यार्थिनीने तायक्वांदो या राज्यस्तरीय सीबीएसई साउथ झोन स्पर्धेत रौप्यपदक प्राप्त करून राज्यात द्वितीय क्रमांक प्राप्त केला. तसेच मीनल गुरुवाणीनेसुद्धा कांस्य

पदक मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त केला. स्पर्धा वरोरा जिल्हा चंद्रपूर येथे आयोजित करण्यात आल्या होत्या. सिया गुरुवाणी या विद्यार्थिनीची निवड हरियानातील पानिपत येथे होणाऱ्या राष्ट्रीय तायक्वांदो क्रीडा स्पर्धेसाठी झाली आहे. या विद्यार्थिनींना मार्गदर्शन संध्या तिवारी व सौरभ नवघनकर यांनी केले. विद्यार्थीनींनी प्राप्त केलेले यश हे शाळेसाठी व पुसद तालुक्यातील नागरिकांसाठी अभिमानाची गोष्ट आहे. त्याचे कौतुक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व सर्व संचालक मंडळ, शाळेचे ॲकॅडमिक डायरेक्टर, मुख्याध्यापक, शाळा समन्वयक, प्रशासन अधिकारी, सर्व क्रीडा प्रशिक्षक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कौतुक केले.

साखर शाळेत क्रीडा गणवेश वाटप

अलिबाग : अलिबाग तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद शाळा साखर येथील सर्व विद्यार्थ्यांना साखर गावातील प्रफुल्ल बानकर यांच्यातर्फे क्रीडा गणवेशांचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांना खेळाबद्दल आवड निर्माण व्हावी हा त्यामागील मुख्य उद्देश आहे. विशेष म्हणजे प्रत्येक वर्षी ते साखर शाळेतील विद्यार्थ्यांना क्रीडा गणवेश वाटप करतात. शाळेतील रंगरंगोटी मध्ये देखील त्यांचा विशेष हातभार लागला आहे. शाळेतील विद्यार्थ्यांच्या प्रगतीबद्दल त्यांनी शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे कौतुक केले. परीक्षेत उत्तम कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना देखील त्यांनी बक्षीस जाहीर केले आहे.सदर कार्यक्रमासाठी प्रफुल्ल बानकर, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य हरेश्वर गोतकर, देवदत्त मुंढे, पालक प्रतिक्षा निवेंडकर, मनिषा गुरव, मुख्याध्यापक राजेंद्र पाटील, स्मिता चिखले तसेच सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

गुणवंत खेळाडूंचा सत्कार

छत्रपती संभाजीनगर : राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त हिंगोली जिल्ह्यातील राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर पदक प्राप्त करणाऱ्या गुणवंत खेळाडूंचा २९ ऑगस्ट रोजी मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे. तसेच २८ ते ३० ऑगस्टदरम्यान विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन हिंगोली जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, लिंबाळा मक्ता येथे आयोजन करण्यात आले आहे, असे जिल्हा क्रीडा अधिकारी आत्माराम बोथीकर यांनी कळवले आहे. जिल्ह्यातील राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर पदक प्राप्त खेळाडूंनी त्यांच्या प्रमाणपत्रांची छायांकित प्रत २५ ऑगस्ट २०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, हिंगोली येथे सादर करावी. या स्पर्धांमध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या खेळाडूंनी तसेच सत्कारासाठी पात्र खेळाडूंनी २५ ऑगस्टपर्यंत आपली नावे नोंदवावीत, असे आवाहनही त्यांनी केले आहे. महान हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी २९ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा केला जातो. त्यानिमित्त क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, हिंगोली यांच्यावतीने हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे.

विवानचा पाच तास स्केटिंगचा थरार

कोल्हापूर : एखाद्या गोष्टीची आवड लागली तर त्यामध्ये परिपूर्णता मिळवण्यासाठी वेळ लागत नाही. तसेच अशाप्रकारची काही गोष्ट साध्य करण्यासाठी वयाचंही बंधन नसते, हे अवघ्या तीन वर्षांच्या

विवान साव्यानावर यानं सिद्ध केले आहे. विवानने सलग ५ तास रोलर स्केटिंग करण्याचा चित्तथारक पराक्रम करत जागतिक विक्रमाला गवसणी घातली आहे. कोल्हापूरच्या या चिमुकल्याच्या कामगिरीनं संपूर्ण देशाचे लक्ष वेधून घेतले असून, क्रीडा विश्वात त्याचे कौतुक होत आहे. कर्नाटकच्या बेळगाव येथील शिवगंगा रोलर स्केटिंग क्लब आणि एमआयटी पुणे विश्वशांती गुरुकुल स्कूल, सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने 'वन नेशन मेनी ड्रीम्स' या मल्टी-लोकेशन स्केटिंग मॅरेथॉनचं आयोजन करण्यात आलं होतं. भारताच्या विविध भागांतील सुमारे १०० स्केटिंगपटूंनी या उपक्रमात सहभाग नोंदवला होता. 'एक राष्ट्र, अनेक स्वप्ने' या संकल्पनेतून आयोजित या मॅरेथॉनमध्ये विवानने सलग पाच तास स्केटिंग करत ही ऐतिहासिक कामगिरी पूर्ण केली.

बांगलादेशचा पहिला डाव ६४ धावांवर सर्वबाद | ऑस्ट्रेलियाकडे माफक आघाडी

मॅके कसोटीत पहिल्या दिवशी १८ बळी

| मॅके | वृत्तसंस्था |

बांग्लादेशविरुद्धच्या दुसऱ्या कसोटीच्या पहिल्या दिवशी ऑस्ट्रेलियाने माफक आघाडी घेतली. दिवसाचा खेळ संपला तेव्हा ऑस्ट्रेलियाने आपल्या पहिल्या डावात ८ गडी गमावून १६५ धावा केल्या होत्या आणि १०१ धावांची आघाडी घेतली होती. दिवसाचा खेळ संपला तेव्हा कॅमेरॉन ग्रीन ५१ धावांवर आणि नॅथन लायन १० धावांवर खेळपट्टीवर होते. तत्पूर्वी, दुसऱ्या सत्रात बांगलादेशचा पहिला डाव ६४ धावांवर सर्वबाद झाला होता. पण, शोरिफुल इस्लामने ऑस्ट्रेलियाला एकापाठोपाठ एक धक्के देत संघाला पुनरागमन करण्यास मदत केली.

बांग्लादेशला स्वस्तात बाद केल्यानंतर ऑस्ट्रेलियाची सुरुवात खराब झाली. शोरिफुल इस्लामने ऑस्ट्रेलियाला एकापाठोपाठ एक धक्के देत त्यांचा डाव डगमगवला. सुरुवातीच्या धक्क्यांनंतर, स्टीव्ह

स्मिथ आणि कॅमेरॉन ग्रीन यांनी ऑस्ट्रेलियाचा डाव सावरला आणि संघाला आघाडी मिळवून दिली. स्मिथ ४२ धावांवर बाद झाला आणि त्याची ग्रीनसोबतची भागीदारी तुटली. एका बाजूने विकेट्स पडतच राहिल्या, पण ग्रीनने खेळपट्टीवर टिकून आपले अर्धशतक पूर्ण केले.

बांग्लादेशकडून शोरिफुलने सहा बळी घेतले, तर तस्किन अहमद आणि मेहिदी हसन मिराज यांनी प्रत्येकी एक बळी घेतला. तत्पूर्वी, ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. वेगवान गोलंदाजमिचेलस्टार्कनेबांगलादेशला एकापाठोपाठ एक धक्के देत आपला निर्णय योग्य ठरवला. पहिल्याच सत्रात बांगलादेशच्या सहा विकेट्स पडल्या. मिचेल स्टार्कने पहिल्या डावात उत्कृष्ट गोलंदाजी करत सुरुवातीपासूनच बांगलादेशवर दबाव टाकला. स्टार्कने पहिल्याच चेंडूवर शादमन इस्लामला बाद केले आणि त्यानंतर पुढच्याच षटकाच्या पहिल्याच चेंडूवर तन्झिद हसन तमीमला खाते न उघडता बाद केले. पुढच्याच चेंडूवर नाझमुल होसेन शांतो स्टार्कचा तिसरा बळी ठरला. मात्र, स्टार्कला आपली हॅट-ट्रिक पूर्ण करता आली नाही. त्यानंतर स्टार्कने मोमिनुल हकचा कॅमेरॉन ग्रीनकरवी झेल घेतला, जो नऊ धावांवर बाद झाला. स्टार्कचा पाचवा बळी लिटन दास होता, जो एकही बळी न घेता बाद झाला. दुसऱ्या सत्रात जोश हेझलवूड आणि कमिन्सने आपली ताकद दाखवत प्रत्येकी दोन बळी घेतले आणि बांगलादेशला आणखी अडचणीत आणले.

पहिल्या सत्रात कांगारुंचे वर्चस्व

स्टार्कने बांगलादेशचा डाव खिळखिळा करण्यासाठी कोणतीही कसर सोडली नाही. स्टार्कसमोर बांगलादेशची फलंदाजी पत्त्यांच्या घराप्रमाणे कोसळली. त्यानंतर पॅट कमिन्सने मुशफिकुर रहीमला बाद करून पहिल्या सत्रात बांगलादेशला सहावा धक्का दिला. बांगलादेशने २१ धावांत सहा गडी गमावले. दुपारच्या जेवणापर्यंत बांगलादेशची धावसंख्या ३५ धावांवर सहा गडी अशी होती.

यानिक सिनरची यूएस ओपनमधून माघार

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी असलेला टेनिसपटू यानिक सिनरने दुखापतीमुळे आगामी यूएस ओपनमधून माघार घेतली आहे. सिनरच्या टीमने शुक्रवारी ही घोषणा केली आहे. यापूर्वी तो सिनसिनाटी ओपनमध्येही खेळला नव्हता. सिनरच्या या निर्णयामुळे त्याच्या प्रभावी २०२६ च्या हंगामाला मोठा धक्का बसला आहे. यूएस ओपनमधून माघार घेणे हा सिनरच्या कारकिर्दीतील एक महत्त्वपूर्ण बदल आहे. २०१९ मध्ये ग्रँड स्लॅममध्ये पदार्पण केल्यापासून तो पहिल्यांदाच एखाद्या ग्रँड स्लॅम स्पर्धेला मुकत आहे. सिनरनं २०२४ मध्ये यूएस ओपनचे विजेतेपद पटकावले होते. गेल्या वर्षी तो अंतिम फेरीत पोहोचला होता. २५ वर्षीय सिनरने २०२६ मध्ये एटीपी टूरवर उत्कृष्ट कामगिरी केली आहे.



त्याने वर्षातील पहिल्या पाच एटीपी मास्टर्स स्पर्धांमध्ये इंडियन वेल्स, मियामी, मॉंटे कार्लो, माद्रिद आणि रोम सलग विजेतेपदे पटकावली. या हंगामात सिनरची ४४-३ अशी विजय-पराजय नोंद आहे आणि त्यानं आतापर्यंत सहा विजेतेपदं पटकावली आहेत. सिनरचा शेवटचा सामना विम्बल्डनमध्ये झाला, जिथे त्याने विजेतेपद पटकावले होते.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)